



# जनमाध्यम

epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार १४ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





## 25 हजाराची लाच घेतांना झिरवळांच्या लिपिकाला पकडले

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते आणि राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री



नरहरी झिरवाळ अडचणीत सापडले आहेत. त्यांच्यामंत्रालयातील कार्यालयामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) छापा टाकत दोन कर्मचा-यांना ताब्यात घेतले आहे. या घटनेनंतर याचे पडसात आता राजकीय वर्तुळात उमटताना दिसत आहेत. विरोधकांकडून जोरदार टीका केला जात आहे. महायुती सरकारच्या काळात मंत्रालयात खुलेआम लाचखोरी सुरू असल्याचा आरोप ठेवत नरहरी झिरवळ यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत मुख्यमत्र्यांकडे मागणी केली आहे. लातूरमधील एका औषध दुकानदाराच्या रद्द केलेल्या परवान्याचे नुतनीकरण करण्यासाठी मंत्री झिरवळ यांच्या मंत्रालयातील कार्यालयात लिपिक राजेंद्र ढेरंग (पान २ वर)

## माझ्याशी संबंध सिद्ध झाले तर राजीनामा देईन

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते आणि राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या मंत्रालयातील कार्यालयात



लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने छापा टाकत दोन कर्मचा-यांना ताब्यात घेतल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. या प्रकरणात कार्यालयातील कारकून राजेंद्र ढेरंग याने ५० हजार रुपयांची लाच मागून त्यातील ३५ हजार रुपये स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. या कारवाईनंतर आता मंत्री नरहरी झिरवाळ यांनी या संपूर्ण प्रकरणावर आपली स्पष्ट भूमिका मांडली आहे. झिरवाळ सध्या दिल्ली दौ-यावर असून, तेथे त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. एसीबीच्या कारवाईबाबत प्रतिक्रिया देताना झिरवाळ म्हणाले, मी मागील दोन दिवसांपासून दिल्लीत आहे. काल जी घटना घडली, ती अत्यंत चुकीची आहे आणि असे व्हायला नको होते. राजेंद्र ढेरंग हे लिपिक म्हणून कार्यरत होते. (पान २ वर)

## मंत्रालयातील कार्यालय सील

**मुंबई :** राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या मंत्रालयातील मुख्य इमारतीच्या तिस-या मजल्यावर असलेल्या कार्यालयामध्ये गुरुवारी रात्री लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) छापा टाकला. मंत्री कार्यालयातील दोघांना ताब्यात घेतले असून कार्यालय सील केले आहे. लातूर मधील एका औषध दुकानदाराचा परवाना रद्द करण्यात आला होता. रद्द परवाना नूतनीकरण करण्याचे अधिकार संबंधित विभागाच्या मंर्त्याला असतात. त्यासंदर्भात मंत्री सुनावणी घेतात व निर्णय देतात. रद्द परवान्याचे नूतनीकरण करण्यासाठी मंत्री झिरवाळ यांच्या कार्यालयातील लिपिक आलोसे राजेंद्र ढेरंग याने संबंधिताकडे ५० हजार रुपयाची मागणी केली होती. त्यातील ३५ हजार रुपये आज देण्याचे ठरले होते. हे पैसे ढेरंग स्वीकारत असताना त्याला रंगेहात पकडण्यात आले. ढेरंग याच्यासोबत मंत्री झिरवाळ यांच्या कार्यालयातील आणखी एकास ताब्यात घेण्यात आले आहे. आपण लाचेची रक्कम मंत्री झिरवाळ यांचे खाजगी सचिव रामदास गाडे यांच्या सांगण्यानुसार घेतली, असे ढेरंग याने पोलिसांना सांगितले आहे. (पान २ वर)

# 'जुन्या इमारती गुलामगिरीच्या प्रतीक होत्या'

## पीएम मोदींनी केले सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवनचे उद्घाटन



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज(दि.१३) राजधानी दिल्लीतील नवीन PMO सेवा तीर्थ, तसेच कर्तव्य भवन-१ आणि कर्तव्य भवन-२ या प्रशासकीय संकुलांचे उद्घाटन केले. यावेळी बोलताना पंतप्रधानांनी हा क्षण भारताच्या विकास यात्रेतील नवा अध्याय असल्याचे सांगत, गुलामीच्या प्रतीकांपासून मुक्तहोत देश नव्या इतिहासाची निर्मिती करत असल्याचे अधोरेखित केले.

**इतिहास घडताना आपण पाहतोय- पंतप्रधान मोदी**

पंतप्रधान मोदी म्हणाले, आपण आज इतिहास घडताना पाहत आहोत. साउथ ब्लॉक हा ब्रिटिश राजवटीचे प्रतीक होता. आता गुलामीची चिन्हे दूर केली जात आहेत. राजपथ आज कर्तव्य पथ म्हणून ओळखला जातो. मुघल गार्डनचे अमृत उद्यान झाले, तर जुन्या संसद भवनाचे संविधान भवन नामकरण करण्यात आले.

पंतप्रधानांनी स्पष्ट केले की, नार्थ ब्लाक आणि साउथ ब्लाक या इमारती ब्रिटिश साम्राज्याच्या मानसिकतेचे प्रतीक होत्या. ते म्हणाले, स्वातंर्त्यानंतर याच इमारतींमधून देशासाठी महत्त्वाचे निर्णय झाले, धोरणे आखली गेली. पण या इमारती भारताला गुलामीच्या जाळ्यात ठेवण्यासाठी उभारल्या गेल्या होत्या. आज हा दिवस भारताच्या विकास यात्रेत नव्या सुरु वातीचा साक्षीदार ठरत आहे.

**विकसित भारतच्या संकल्पासह नवा प्रवेश**

पंतप्रधान मोदींनी सांगितले की, आज आपण विकसित भारतच्या संकल्पासह सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवनात प्रवेश करत आहोत. ईश्वरी आशीर्वादामुळे आपली उद्दिष्टे साध्य करण्याची ताकद आपल्याला मिळत आहे. विक्रम संवत २०८२, फाल्गुन कृष्ण पक्षातील विजया एकादशीच्या शुभमुहूर्तावर हा कार्यक्रम झाल्याचे नमूद करत त्यांनी सांगितले की, शास्त्रांनुसार या दिवशी घेतलेला संकल्प विजयाकडे घेउन जातो. आज भारत रिफार्म एक्सप्रेसवर स्वार आहे; नवे व्यापार करार संधींची दारे उघडत आहेत. अशा वेळी सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवन देशाच्या उद्दिष्टपूर्तीत मोठी भूमिका बजावतील.

**नार्थ-साउथ ब्लाक होणार संग्रहालय**

या बदलांदरम्यान जुन्या इमारतींचे ऐतिहासिक महत्त्व जपले जाईल, असेही पंतप्रधानांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, जुन्या इमारतींमध्ये घेतलेले निर्णय आणि त्या परिसरातील आठवणी कायम राहतील. त्यामुळे नार्थ आणि साउथ ब्लाकचे रूपांतर राष्ट्रीय संग्रहालयात करण्याचा निर्णय घेतला आहे.

**सेवा तीर्थ, नव्या प्रशासकीय युगाची ओळख-** सेवा तीर्थचा अर्थ सेवेचे स्थान असा असून, याचे आधीचे नाव एक्झिक्युटिव्ह एन्क्लेव्ह होते. २ डिसेंबर २०२५ रोजी त्याचे नामकरण सेवा तीर्थ असे करण्यात आले. हे संकुल नवी दिल्लीतील दारा शिकोह रोड परिसरात आहे.

### कर्तव्य भवन-1 आणि 2 मध्ये कोणती मंत्रालये?

- वित्त मंत्रालय
- संरक्षण मंत्रालय
- आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय
- कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय
- शिक्षण मंत्रालय
- संस्कृती मंत्रालय
- विधी व न्याय मंत्रालय
- माहिती व प्रसारण मंत्रालय
- कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय
- रसायन व खत मंत्रालय
- जनजातीय कार्य मंत्रालय

## बांगलादेशमध्ये BNP च्या विजयानंतर पंतप्रधान मोदींचा तारिक रहमान यांना फोन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बांगलादेशात झालेल्या १३ व्या ऐतिहासिक सार्वत्रिक निवडणुकीत



बांगलादेश नॅशनल पार्टीने दोन-तृतीयांश बहुमतासह दणदणीत विजय मिळवला आहे. या मोठ्या विजयानंतर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बीएनपीचे अध्यक्ष तारिक रहमान यांच्याशी संवाद साधून त्यांचे अभिनंदन केले. शेख हसीना यांची सत्ता गेल्यानंतर झालेल्या या पहिल्याच मोठ्या निवडणुकीतील विजयाला दक्षिण आशियाई राजकारणातील एक महत्त्वाचे वळण मानले जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर या ऐतिहासिक विजयाबद्दल आनंद व्यक्त केला. 'मिस्टर तारिक रहमान यांच्याशी संवाद साधून खूप आनंद झाला. बांगलादेशातील जनतेने दिलेल्या या कौलाचे आम्ही स्वागत करतो. दोन जवळचे शेजारी (पान २ वर)

## बांगलादेशात BJP ने खाते उघडले; NCP चा ५ जागांवर विजय, सायकल, हत्तीचा सुपडा साफ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बांगलादेशात शेख हसीना यांचे सरकार कोसळल्यानंतर युनूस मोहम्मद यांच्या नेतृत्त्वाखाली अंतरिम सरकार राज्य कारभार सांभाळत होते. अखेर दीड वर्षांनी सार्वत्रिक निवडणूका झाल्या ज्यात तारिक रहमान यांच्या पक्षांने मोठ यश मिळवले आहे. अनेक पक्षांचा सुपडा साफ झाला आहे. भारतातील पक्षांशी नावे चिन्ह मिळते जुळते असणारे पक्षही निवडणुकीच्या मैदानात होते. ज्यांच्या यशा अपयशाची सर्वत्र चर्च आहे.

बांगलादेशात झालेल्या निवडणुकीत BJP म्हणजेच बांग्लादेश जातीय पार्टीने एक जागेवर विजय मिळवला आहे. या



पक्षाचं चिन्ह हे बैल आहे. तेथील ऱ्क्ष पक्षानेही ५ जागांवर विजय संपादन केला आहे. ऱ्क्ष म्हणजे नॅशनल सिटीझन पार्टी होय. ज्यांनी २०२४ मध्ये शेख हसीना सरकारविरोधात आंदोलन केले होते अशा युवकांचा NCP आहे. ५ जागांवर विजय मिळाला तरी एनसीपीला अपेक्षित अशी कामगिरी करता आली नाही.

**काही चिन्हांचं कनेक्शन-** हत्ती चिन्ह असणारी बांगलादेश रिपब्लिकन पक्ष आणि सायकल चिन्ह असणा-या जातीय पार्टीचं खाते उघडले नाही. भारतात हत्ती हे चिन्ह मायावती यांचा पक्ष बहुजन समाज पार्टीचे आहे. तर अखिलेश यादव यांच्या समाजवादी पक्षाचे चिन्ह सायकल आहे. बांगलादेश मुस्लिम लीग या पक्षाचं चिन्ह कंदील चिन्ह असणारा पक्ष खातं उघडू शकला नाही. भारतात लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाचं चिन्ह कंदील आहे. (पान २ वर)




### उज्जैनला जाताना अपघात
## 4 भाविक ठार

**परभणी :** देवदर्शनासाठी उज्जैनकडे निघालेल्या भाविकांच्या वाहनाचा जिंतूर-चारठाणा रोडवरील अकोली पुलाजवळ बुधवारी मध्यरात्री भीषण अपघात झाला. या अपघातात ४ जणांचा जागीच मृत्यू झाला तर एक जण गंभीर जखमी झाला. ही दुर्दैवी घटना मध्यरात्रीच्या सुमारास घडली. चौघेही परभणी जिल्ह्यातील आहेत. त्यामुळे जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथील ५ भाविक उज्जैन येथील धार्मिक तीर्थस्थळी देवदर्शनासाठी गंगाखेडहून जिंतूरमार्गे संभाजीनगरकडे जात होते. जिंतूर शहरापासून सुमारे २ किलोमीटर अंतरावरील अकोली पुलाजवळ वाहन चालकाचा ताबा सुटल्याने भीषण दुर्घटना झाली. अपघात इतका भीषण होता की, वाहनाचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. या अपघातानंतर जखमींना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. त्यानंतर डॉक्टरांनी तपासणी करून चौघांना मृत घोषित केले. यामध्ये बालाजी आश्रोबा औटी (२८), बालाप्रसाद उत्तमराव घोरपडे (३०), कृष्णा बालाजी गुट्टे (२८), रोहन संजय राठोर (२७) अशी मृतांची नावे आहेत तर गोपाळ गणेश रोकडे (२८) गंभीर जखमी झाले.

## आमच्या पक्षात लुडबूड नको : हसन मुश्रीफ

**मुंबई/प्रतिनिधी :** रोहित पवार यांच्या काकांचे विमान अपघातात निधन झाले. त्यांना जितके दुःख झाले त्यापेक्षा जास्त दुःख आम्हाला झाले आहे. आमच्या मनात काही शंका आहेत त्या आम्ही मुख्यमंर्त्यांकडे व्यक्त केल्या आहेत. आमच्या पक्षातील अंतर्गत गोष्टीमध्ये रोहित पवारांनी भाग घेउ नये असे हसन मुश्रीफ म्हणाले. हसन मुश्रीफ म्हणाले की, विलीनीकरणाचा मुद्दा मी अनेकवेळा मांडलेला आहे. अजित पवार त्यासंदर्भात चर्चा करत होते, राष्ट्रवादी काँग्रेसचा कोणताही नेता त्या चर्चेत नव्हता. त्यामुळे त्यांची चर्चा झाली नाही असा काही आमचा दावा नाही. दादा गेल्यावर परिस्थिती बदललेली आहे, आपल्याला भाजपला विश्वासात घ्यावे लागेल. त्यांचे यावर काय मत आहे हे बघावे लागेल. सुनेत्रा पवार यांना काय वाटते ते यापुढे पक्षात होईल. हसन मुश्रीफ म्हणाले की, आमदार रोहित पवार यांनी मुंबई आणि दिल्लीमध्ये अजित पवार यांच्या विमान अपघाताबद्दल काही प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की लोकांच्या मनातील शंका गेल्याच



पाहिजेत. विमान अपघात प्रकरणी सखोल चौकशी करण्यात येत आहे, फडणवीसांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले आहे. हसन मुश्रीफ म्हणाले की, अजित पवार,सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांची एकवेळा भेट झाली असेल का? त्यांची अनेक वेळा भेट झाली असेल. प्रफुल्ल पटेल हे राष्ट्रवादी काँग्रेसचे पवार साहेबांपासून कार्याध्यक्ष आहेत. अजित पवार यांच्यानंतर तेच आमचे प्रमुख आहेत. सुनेत्रा पवारांना अध्यक्ष केल्यानंतरही ते कार्याध्यक्ष राहणार आहेत. तर सुनील तटकरे हे प्रदेशाध्यक्ष आहेत. हे दोघे व्हिलन कसे असू शकतात, त्यांना टार्गेट कसे करता येउ शकते. विनाकारण त्यांना टार्गेट करण्याचा प्रयत्न सुरू असून आमच्या पक्षात लुडबूड करत आहेत. हसन मुश्रीफ म्हणाले की, विलीनीकरणाच्या चर्चेत मी नव्हतो पण ही मंडळी म्हणत आहे की शरद पवार यांनी थांबायचे आणि अजित पवार यांच्या हाती सूत्रे द्यायची. शशिकांत शिंदे हे त्या चर्चेत असायचे. स्थानिकसाठी एका चिन्हावर लढा असे आम्हाला सांगण्यात आले होते पण विलीनीकरणाबद्दल आम्हाला काही माहिती नव्हती.

### व्हॅलेटाईन डेवरुन कपलमध्ये जोरदार भांडण;
## तरूणीची हॉटेलच्या खोलीतून उडी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पूर्व दिल्लीतील विश्वास नगरातील संतोष रेसिडेन्सी नावाच्या हॉटेलमधून उडी मारुन एका तरुणीनं जीव देण्याचा प्रयत्न केला. तरुणीनं चौथ्या मजल्यावरुन उडी मारली. तिला जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आलं. तिच्यावर सध्या उपचार सुरु आहेत. दुपारी सव्वा एकाच्या सुमारास तरुणीनं हॉटेलच्या चौथ्या मजल्यावरुन आत्महत्येचा प्रयत्न केला. तरुणी दुपारी १२ च्या सुमारास एका तरुणासोबत हॉटेलला पोहोचली होती. काही वेळानंतर तो तरुण हॉटेलमधून निघून गेला. तेव्हा तरुणीनं चौथ्या मजल्यावरुन उडी घेतली. तरुणीनं उडी का घेतली, यामागचं कारण अद्याप समोर आलेलं नाही. पोलिसांकडून याबद्दलचा तपास सुरु आहे. खाली असलेल्या दुकानात काम करणा-या एका तरुणामुळे तरुणीचा जीव वाचला. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, तरुण-तरुणीमध्ये व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यावरुन वाद झाला. (पान २ वर)







## भारत-पाकिस्तान वर्ल्डकप सामन्यात पावसाची शक्यता

**मुंबई/प्रतिनिधी :**भारत-पाकिस्तान वर्ल्डकप सामन्याचा आनंद पाउस खराब करू शकतो. टी-२० वर्ल्ड कपच्या ग्रुप स्टेजमध्ये दोन्ही संघ १५ फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्ये भिडणार आहेत, परंतु या दिवशी शहराच्या ६०% भागांमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे. जर असे झाले तर चाहते क्रिकेटची मोठी स्पर्धा पाहण्यापासून वंचित राहतील. टीम इंडिया आज (१३ फेब्रुवारी) रात्री ९.३० वाजता कोलंबोमध्ये पोहोचेल. तर पाकिस्तान संघ आपले सर्व सामने कोलंबोमध्येच खेळत (पान २ वर)

e paper www.janmadhyam.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# कठोरा नाक्यावर सराफा व्यापाऱ्याचे ८० तोळे सोने लुटले

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावतीच्या गाडगे नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या कठोरा नाका परिसरात आज दिवसाढवळ्या एक मोठी लूट झाल्याची घटना समोर आली आहे. अज्ञात लुटारूंनी एका सोन्याच्या व्यापाऱ्याला गाठून त्याच्याकडून तब्बल ८० तोळे सोने लंपास केले आणि घटनास्थळावरून पळ काढला. या धाडसी चोरीमुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे.

सराफा व्यापारी सुशांत मनोहर शेरेकर (रा.बालाजी नगर) यांनी गाडगे नगर पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, लुटारूंनी त्यांच्याकडून सुमारे ८० तोळे सोने जबरदस्तीने हिसकावून नेले. ही घटना घडताच गाडगे नगर पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून, पोलीस आयुक्त ओला यांच्या मार्गदर्शनात या हायप्रोफाईल चोरीचा तपास युद्धपातळीवर सुरू करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित सुवर्ण व्यावसायिक दागिने घेऊन जात असताना लुटारूंनी त्यांच्यावर हल्ला केला. या लुटीची माहिती मिळताच गाडगे नगर पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस आयुक्त ओला हे स्वतः आपल्या विशेष पथकासह घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी तपासाची चक्रे फिरवली आहेत. भरवस्तीत आणि वर्दळीच्या ठिकाणी ही लूट झाल्याने नागरिक आणि व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलीस सध्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत असून शहराच्या सर्व नाक्यांवर नाकाबंदी करण्यात आली आहे. लुटारूंना पकडण्यासाठी गुन्हे शाखेची पथकेही रवाना झाली आहेत.

# अकोला बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड.अजय वाघमारे विजयी

## सहसचिवपदी प्रमोद कोरडे, शितल गवई व विजय भांबेरे उपाध्यक्ष

**अकोला/प्रतिनिधीः-**
अकोला न्यायालय परिसरात शुक्रवारी झालेल्या अकोला बार असोसिएशनच्या (२०२६-२७) सार्वत्रिक निवडणुकीत चुरशीची लढत पाहायला मिळाली. अध्यक्षपदासाठी ॲड. अजय वाघमारे आणि ॲड. हेमसिंग मोहता यांच्यात थेट सामना रंगला. अखेर ४९ मतांच्या निसटत्या आघाडीने ॲड. वाघमारे यांनी विजय मिळवत पुन्हा एकदा अध्यक्षपदाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली.

अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ॲड. अजय वाघमारे यांना ६८२ मते, तर ॲड. हेमसिंग मोहता यांना ६३३ मते मिळाली. या गटात ६ मते अवैध ठरली. विशेष म्हणजे ॲड. संजय देशमुख यांचे नामांकन सुरुवातीला दाखल झाले होते; मात्र महाराष्ट्र ॲंड गोवा बार कॉन्सिलच्या

निर्देशानुसार एआयबीई ( AIBE ) परीक्षा उत्तीर्ण नसल्यामुळे त्यांनी निवडणुकीपूर्वीच माघार घेतली. तरीही मतदार यादीत नाव छापील असल्याने त्यांना ११ मते पडली; परंतु ती मते अंतिम निकालात ग्राह्य धरली गेली नाहीत. यापूर्वीही अध्यक्षपद भूषविलेल्या ॲड.वाघमारे यांच्या पुनरागमनामुळे बारमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, समर्थकांनी जल्लोष केला. नवीन पदाधिकाऱ्यांवर आता बारमधील शिस्त, सदस्यांच्या प्रश्नांचे निराकरण आणि न्यायालयीन कामकाजातील सुसूत्रता राखण्याची जबाबदारी असणार आहे. निवडणुकीनंतर न्यायालय परिसरात विजयी उमेदवारांच्या समर्थकांकडून जल्लोष करण्यात आला.

**महिला उपाध्यक्षपदी शितल गवई-** महिला उपाध्यक्षपदासाठी पाच उमेदवार रिंगणात होत्या. या चुरशीच्या लढतीत ॲड. शितल गवई यांनी ५५२ मते मिळवून बाजी मारली. त्यांना ॲड. शारदा मल्होत्रा (३७८),ॲड. मंजू सावरकर (१६३), ॲड. निर्मला नागदेवे (१५२) आणि ॲड.संगिता गावंडे



(७६) यांनी टक्कर दिली. या गटात ११ मते अवैध ठरली.

**पुरुष उपाध्यक्षपदी विजय भांबोरे-** पुरुष गटातील उपाध्यक्षपदासाठी तीन उमेदवारांमध्ये रंगलेल्या लढतीत ॲड. विजय भांबेरे यांनी ६७५ मते मिळवत ३०० मतांची आघाडी घेत विजय मिळविला. ॲड.राहुल वानखडे यांना ३७५ तर ॲड.सुमेध डोंगरदिवे यांना २६४ मते मिळाली.

**सहसचिवपदी प्रमोद कोरडे यांची सरशी-** सहसचिव पदासाठी झालेल्या निवडणुकीत ॲड. प्रमोद कोरडे यांनी सर्वाधिक ७०० मते मिळवत २०३ मतांच्या आघाडीने विजय संपादन केला. ॲड.आकाश भगत (४९७) आणि ॲड. पवनेश अग्रवाल (१२१) यांना पराभव पत्करावा लागला. या गटात १४ मते अवैध ठरली.

**१३३२ सदस्यांनी बजावला मतदानाचा हक्क-**
या निवडणुकीत एकूण १३३२ सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावला. दिवसभर शांततेत मतदान पार पडले. सायंकाळी मतमोजणीनंतर निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. उदय नाईक यांनी अधिकृत निकाल जाहीर केला.

पान १ व १० वरून

## 25 हजाराची लाच घेतांना

याला २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले. लाचेची ही रक्कम खासगी सचिव रामदास गाडे यांच्या सांगण्यावरून घेतल्याचे ढेरंग यांनी पोलिसांना सांगितले. दरम्यान यामुळे झिरवळ यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

***नाना पटोलेंची संपूर्ण पोस्ट-*** लातूरमधील एका औषध दुकानदाराचा रद्द झालेला परवाना पुन्हा नूतनीकरण करून देण्यासाठी ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या मंत्रालयातील कार्यालयात कार्यरत लिपिक राजेंद्र ढेरंगे याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले. ही रक्कम खासगी सचिवांच्या सांगण्यावरून घेतल्याचे ढेरंगे याने पोलिसांना कबूल केल्याची माहिती समोर आली आहे.

या भ्रष्टाचाराच्या साखळीत सध्या फक्त एक प्यादा पकडला गेला असला, तरी या साखळीचे धागेदोरे वरपर्यंत पसरलेले असल्याचा संशय आहे. महायुतीचे सरकार सत्तेत आल्यापासून मंत्रालयात पैशांशिवाय फाईल हलत नाही, अशी चर्चा सर्वसामान्यांमध्ये सुरू आहे. अनेक अधिकारी मंत्र्यांना पैसे द्यावे लागतील, अन्यथा काम होणार नाही असे सांगून लाखो रुपयांची आगाउ मागणी करतात अशीही तक्रार वारंवार पुढे येत असताना या घटनेमुळे त्यावर शिक्कामोर्तब झाला आहे.

सरकारने मंत्रालयातील दलालांवर करडी नजर आणि भ्रष्टाचारमुक्त शासन अशा घोषणा केल्या मात्र मंत्रालयातील खासगी सचिव आणि कर्मचा-यांनीच या दाव्यांची पोलखोल केली.जनतेसाठी मंत्रालय खरोखरच पारदर्शक आणि भ्रष्टाचारमुक्त व्हावे यासाठी या प्रकरणाची सखोल चौकशी होणे अत्यावश्यक आहे. मुख्यमंत्र्यांनी झिरवळ यांचा तात्काळ राजीनामा घेउन निष्पक्ष चौकशीस मार्ग मोकळा करावा ही आमची ठाम मागणी आहे. सध्या दिल्ली दौ-यावर असलेल्या झिरवळ यांनी या प्रकारानंतर प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, मी दोन दिवसांपासून दिल्लीत आहे. काल जो काही प्रकार झाला, तो अतिशय चुकीचा होता. असे व्हायला नको होते. राजेंद्र ढेरंग हे लिपिक म्हणून काम करतात. सुनावणीचे कागदपत्र तयार करण्याचे काम त्यांच्याकडे आहे. ते मुळचे अन्न व नागरी पुरवठा विभागाचे कर्मचारी आहेत. त्यांना ऊसनवारीवर या विभागात घेतले होते. त्यांच्याकडून हा प्रकार घडला. या प्रकाराला कुठेही पाठिशी घालणार नाही. तुमच्यापर्यंत या प्रकरणाचे धागेदोरे येत असल्याचा आरोप विरोधक करत आहेत, असा प्रश्न विचारला असता मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले की, तसे जर माझ्यापर्यंत धागेदोरे येत असतील आणि ते सिद्ध होत असेल तर त्याची जबाबदारी घेण्यास मी तयार असेन. या भ्रष्टाचाराचे माझ्याशी संबंध असल्याचे सिद्ध झाले तर मी राजीनामा देईन, असेही मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले.

## माझ्याशी संबंध सिद्ध झाले

सुनावणीसंबंधी कागदपत्रे तयार करण्याचे काम त्यांच्याकडे होते. ते मूळचे अन्न व नागरी पुरवठा विभागाचे कर्मचारी असून, ऊसनवारीवर या विभागात नियुक्त करण्यात आले होते. त्यांनी केलेल्या गैरप्रकाराला कुठेही पाठिशी घातले जाणार नाही, असे त्यांनी सांगितले.

सरकारी कर्मचा-याने पैसे घेणे चुकीचेच

सदर कर्मचा-याचा पूर्वेतिहास माहिती होता का, या प्रश्नावर उत्तर देताना झिरवाळ म्हणाले, माझ्यासमोर या कर्मचा-याविरोधात यापूर्वी कोणतीही तक्रार आली नव्हती. लाचेची रक्कम कितीही असो, सरकारी कर्मचा-याने पैसे घेणे चुकीचेच आहे. पैसे घेतले असतील, तर त्याची शिक्षा संबंधित व्यक्तीला भोगावीच लागेल असे त्यांनी म्हटले. या प्रकरणाचे धागेदोरे तुमच्यापर्यंत येत असल्याचा आरोप विरोधकांकडून होत असल्याबाबत विचारले असता झिरवाळ यांनी ठाम भूमिका घेतली. जर या भ्रष्टाचाराचे धागेदोरे माझ्यापर्यंत येत असल्याचे सिद्ध झाले, तर त्याची जबाबदारी घेण्यास मी तयार आहे. या प्रकरणाशी माझा थेट संबंध असल्याचे सिद्ध झाल्यास मी राजीनामा देईन असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले. तर सुनेत्रा पवार यांच्या उपमुख्यमंत्रिपदावर नियुक्ती आणि विलीनीकरणाच्या बाजूने भूमिका घेतल्यामुळे आपल्याविरोधात कट रचला जात आहे का, या प्रश्नावर झिरवाळ म्हणाले माझ्याविरोधात कुणी कट रचेल असे मला वाटत नाही. माझा स्वभाव तसा नाही. जे घडले आहे, त्याची चौकशी होईल आणि सत्य समोर येईल अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

## मंत्रालयातील कार्यालय सील

खाजगी सचिव हे मंत्री कार्यालयाचे प्रमुख असतात. त्यामुळे मंत्री झिरवाळ यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. यासंदर्भात मंत्री झिरवाळ यांच्याशी संपर्क साधला असता, आपण सध्या दिल्ली दौ-यावर आहोत. माझ्यासोबत माझे खाजगी सचिव आणि विशेष कार्य अधिकारी आहेत. माझ्या मंत्रालयातील कार्यालयात छाप्याच्या घडलेल्या प्रकाराची मला काही कल्पना नाही. तसेच आपला त्याच्याशी सुतराम संबंध नाही, असे मंत्री झिरवाळ यांच्या वतीने त्यांचे स्वीय सहायक यांनी सांगितले. मंत्री नरहरी झिरवाळ हे जिल्हा नाशिक मधील दिंडोरी विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार ) आमदार आहेत. त्यांनी यापूर्वी विधानसभेचे उपाध्यक्ष पद भूषविले आहे. सध्या त्यांच्याकडे अन्न व औषध प्रशासन हा विभाग आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री आणि पक्षाध्यक्षपद द्यावे, अशी सर्वप्रथम झिरवाळ यांनीच मागणी केली होती.लाचलुचपत प्रतिबंध विभाग हा पोलिस विभागाचा भाग आहे. यापूर्वी काँग्रेसचे राजेंद्र दर्डा आणि भाजपचे एकनाथ खडसे या दोन मंत्र्यांच्या मंत्रालयातील कार्यालयामध्ये खंडणीप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई झाली होती. मंत्री झिरवाळ हे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई होणारे तिसरे मंत्री आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुती सरकारसाठी ही नामुष्कीची बाब आहे.

## बांगलादेशमध्ये BNP च्या विजयानंतर

म्हणून भारत आणि बांगलादेशचे ऐतिहासिक व सांस्कृतिक संबंध अत्यंत दृढ आहेत. बांगलादेशातील जनतेची प्रगती, शांतता आणि समृद्धीसाठी भारत सदैव कटिबद्ध राहील,‘ असं पंतप्रधान मोदींनी म्हटले. विकासाची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी रहमान यांच्यासोबत काम करण्यास आपण उत्सुक असल्याचेही पंतप्रधान मोदींनी नमूद केले. पंतप्रधान मोदींच्या या पुढाकाराचे बांगलादेश नॅशनल पार्टीने स्वागत केले आहे. बीएनपीच्या स्थायी समितीचे सदस्य नजरुल इस्लाम खान यांनी मोदींचे आभार मानताना, ‘लोकशाही देशाने जनतेच्या निकालाचा सन्मान करणे ही आनंदाची बाब आहे. पंतप्रधान मोदींनी तारिक रहमान यांना दिलेले अभिनंदन आणि या जनादेशाला दिलेली मान्यता कौतुकास्पद आहे. यामुळे येणा?या काळात दोन्ही देशांमधील संबंध अधिक मजबूत होतील, असा आम्हाला वि□ास आहे,‘ असं म्हटलं.

**१७ वर्षांनंतर बीएनपीची सत्तावापसी-** सुमारे १७ वर्षांनंतर बांगलादेश नॅशनल पार्टीने सत्तेत जोरदार पुनरागमन केले आहे. ३०० जागांच्या संसदेत बीएनपी आणि त्यांच्या मित्रपक्षांनी २१० हून अधिक जागांवर विजय मिळवत बहुमताचा आकडा पार केला. मायदेशी परतलेले तारिक रहमान दोन मतदारसंघातून निवडून आले आहेत. या निवडणुकीत जमात-ए-इस्लामी हा मुख्य विरोधी पक्ष म्हणून समोर आला आहे.

**चीन आणि पाकिस्तानचीही भूमिका-** बांगलादेशातील या सत्तापालटाची दखल जागतिक स्तरावरही घेतली जात आहे. चीनने म्हटले आहे की, ते बांगलादेशच्या देशांतर्गत अजेंड्याला पाठिंबा देतात आणि स्ट्रॅटेजिक को-ऑपरेटिव्ह पार्टनरशिप पुढे नेण्यासाठी ढाकासोबत काम करण्यास तयार आहेत. दुसरीकडे, पाकिस्तानचे राष्ट्रपती आसिफ अली झरदारी आणि पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनीही तारिक रहमान यांचे अभिनंदन केले असून व्यापार, संरक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रात सहकार्य वाढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

## बांगलादेशात BJP ने खाते

**तारिक रहमान-** बीएनपी पक्षानं निवडणुकीत दोन तृतीयांश बहुमत मिळवले आहे. तारिक रहमान हे लवकरच पंतप्रधान पदी विराजमान होणार आहेत. त्यांच्या आई बांगलादेशच्या पहिल्या महिला पंतप्रधान होत्या. २००० च्या दशकात त्यांना अटक करण्यात आली होती. असे सांगितले जाते की राजकारणात सक्रिय न होण्याच्या अटीवर त्यांची सुटका केली होती. त्यानंतर त्यांनी १७ वर्षांपूर्वी रहमान यांनी देश सोडला होता. काही महिन्यांपूर्वीच ते देशात परतले होते. आईच्या आजारपणात आणि निधनानंतर त्यांनी पक्षाची धूरा सांभाळली आणि पक्षाला मोठे यश मिळवून दिले. चार वर्षाचे असताना त्यांनी तुरुंगवास भोगला होता आज तेच देशाचं नेतृत्व करणार आहेत.

## तरूणीची हॉटेलच्या

तरुणीची दोन तरुणांशी मैत्री होती. एका मित्रासोबत तरुणी हॉटेलला गेली होती. त्याच सुमारास दुसरा मित्र त्यांच्या मागोमाग तिथे पोहोचला. त्याच्यावरुन दोघांमध्ये कडाक्याचं भांडण झालं. आपलं बिंग फुटेल या भीतीनं तरुणीनं हॉटेलच्या खोलीच्या खिडकीतून उडी मारली. त्यात ही तरुणी जखमी झाली आहे. तिच्यावर उपचार सुरु आहेत. तरुणी आणि तिचे मित्र एका मॉलमध्ये काम करतात. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तरुणी सुंदर नगर परिसरात वास्तव्यास आहे. तरुणी ज्या तरुणासोबत हॉटेलला गेली होती, तो उत्तर प्रदेशच्या बुलंद शहरातील बुगरासीचा रहिवासी आहे. त्याचं नाव ओंकार आहे. चौथ्या मजल्यावरुन उडी मारणारी तरुणी मुस्लिम आहे. खाली उभ्या असलेल्या आशिष नावाच्या तरुणामुळे तिचा जीव वाचला. तरुणी उडी मारणार हे लक्षात येताच त्यानं प्रसंगावधान राखलं. जवळच असलेल्या दुकानातील मोठमोठे डबे त्यानं लगेच रस्त्यावर पसरले. तरुणी याच डब्यांवर पडली. त्यामुळे तिचा जीव थोडक्यात वाचला. डब्यांवर पडल्यानं तरुणीला गंभीर इजा झाली नाही. पण ती बेशुद्ध पडली. जवळच्या लोकांनी पोलिसांना कळवलं. पोलीस थोड्याच वेळात पोहोचले. त्यांनी रुग्णवाहिका बोलावली आणि तरुणीला रुग्णालयात दाखल केलं. तिला शुद्ध आल्यावर तिची चौकशी केली जाईल.

## भारत–पाकिस्तान वर्ल्डकप

आहे. संघाने अमेरिका आणि नेदरलँड्सला सुरुवातीच्या सामन्यांमध्ये हरवले. तर भारताने अमेरिका आणि नामिबियाला हरवले.

**१५ फेब्रुवारी रोजी २४ तास पाउस-** १५ फेब्रुवारी रोजी पूर्ण २४ तास पावसाची शक्यता आहे. सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत ६०ऽ ते ५०ऽ पर्यंत पाउस पडू शकतो. सामन्यादरम्यान संध्याकाळी ७ ते रात्री १२ वाजेपर्यंत देखील १० ते २०ऽ पर्यंत पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

कोलंबोमध्ये सामन्याच्या एक दिवस आधी, १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत ३५ऽ पावसाची शक्यता आहे. संध्याकाळी ६ वाजेपर्यंत २५ऽ भागांमध्ये पाउस पडू शकतो. तर रात्री १२ वाजेपर्यंत केवळ १०ऽ पावसाची शक्यता आहे.

**कोलंबोमध्ये पावसाचे वातावरण आहे का?-** श्रीलंकेत पाउस २ भागांमध्ये पडतो. मे ते सप्टेंबर दरम्यान दक्षिणेकडील कोलंबो, याला आणि नीगोंबो या भागांमध्ये पाउस पडतो.

डिसेंबर ते फेब्रुवारी दरम्यान उत्तरेकडील जाफना, पुत्तालम आणि कालपिटिया या भागांमध्ये पावसाची शक्यता असते.

सध्या वारे उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहत आहेत, त्यामुळे कोलंबोमध्येही पावसाची शक्यता वाढली आहे. हवामानातील बदलांमुळे पावसाच्या शक्यतांचा अंदाज लावणे अनेकदा कठीण होते. टीम इंडिया आज रात्री ९.३० वाजेपर्यंत कोलंबोमध्ये पोहोचेल. भारताने मुंबईत अमेरिकेला पहिला सामना हरवला, तर दिल्लीत नामिबियाविरुद्ध विजय मिळवला. पाकिस्ताननेही २ सामने जिंकले आहेत. आता १५ फेब्रुवारीचा सामना जिंकणारी टीम पाइंट्स टेबलमध्ये नंबर-१ वर आपले स्थान मजबूत करेल.

## मादी बिबट मृतावस्थेत आढळल्याने

वन विभागाला पूर्वसूचनाही दिली होती. मात्र, आता थेट बिबट्या मृत अवस्थेत आढळल्याने परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे. बिबट्याचा मृत्यू नैसर्गिक आहे की घातपात, याबाबत गुढ कायम असून वन विभागाच्या तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## नांदगाव बाजार समितीत

सुरुवातीलाच नवीन मालाची आवक झाल्याने बाजार समितीचे सभापती प्रभात पाटील ढेपे यांच्या हस्ते काटा पूजन करण्यात आले आणि सभापतीच्या हस्ते शेतकरी वैभव मुंडवाईक यांना शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळेस बाजार समितीचे संचालक डॉ. राजेंद्र पांडे, प्रमोद ठाकरे, पंकज ठाकरे, विवेक वैष्णव, जितेश जांगडा, अडते व्यापारी नंदकिशोर लड्डा, सतीश शिरभाते, अक्षय ब्राह्मणवाडे, गजानन गिड्डे, जावेद भाई, बाजार समितीचे सचिव अमित मोहोड व शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

## ओव्हरलोड ट्रकचा विद्युत

पवार, गणेश नागापुरे, विवेक वानखडे, ऋषिकेश पालखेडे हे तातडीने धावून आले. त्यांनी ट्रक चालकाला खडसावले तसेच तुटलेल्या तारांबाबत झालेले नुकसान भरून देण्यास सांगितले. यादरम्यान ट्राफिक पोलीस कर्मचारी राजू मेसरे व त्यांचे सहकारी कासदेकर घटनास्थळी आले. त्यांना सुद्धा मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड असलेला ट्रक दिसून आला. या ट्राफिक पोलीस कर्मचाऱ्यांनी ट्रक नंबर चा फोटो काढून त्याला चालान दिल्याचे समजते.

**कारवाईची गरज-**
कापसाच्या रुईच्या गठाणाने मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड असलेला ट्रक या जड वाहनाविरुद्ध कडक कार्यवाही करणे ट्राफिक पोलिसांनी गरजेचे होते. अशी नागरिकांमध्ये चर्चा होती. सदर ओव्हरलोड ट्रकमुळे मोठी घटना होणार होती. ट्रकला मोठी आग सुद्धा लागली असती. उपस्थित नागरिकांनी आरडाओरोड केल्यामुळे ट्रकचालक सावध झाला.

**बोराळा रस्त्यावर जड वाहनांची वाहतूक-**
बोराळा येथील गणेश मंदिराकडे जाणारा रस्ता हा लहान आहे. या रस्त्यावरून श्री.गणेश मंदिराकडे आबाल ,वृद्ध, स्त्री पुरुष दर्शना करिता पायी जातात. काही भाविक दुचाकी वाहनाने जातात तसेच सदर रोडने बोराळा गावाकडे जाणारे येणारे प्रवासी सुरू असतात. सदर रोडवर जिनिंग प्रेसिंग आहेत. त्यामुळे या रोडवर सर्रासपणे जड वाहतूक सुरू झाली आहे. या जड वाहतुकीमुळे रस्ता सुद्धा खराब होत आहे. भविष्यात या रोडवर अशा या जड वाहनांमुळे मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पोलिसांनी याकडे वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे.

## सुपर हॉस्पिटलमधील

आय मशीन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये लावण्यात आली. मात्र अद्याप एमआरआय मशीन सुरू करण्यात आली नाही. यामुळे सर्वसामान्य रुग्णांना खाजगी निदान केंद्रामध्ये जावे लागत आहे. येथे त्यांना अधिक खर्च करावा लागत आहे. गरीब रुग्णांना वेळेवर निदान न मिळाल्यास उपचारात उशीर होऊन जीवावर बेतू शकते. दीर्घ काळापासून बंद असलेली एमआरआय मशीन तातडीने तंत्र तज्ञ नियुक्त करून सर्वसामान्य लोकांच्या सेवेसाठी उपलब्ध करण्यात यावी अन्यथा प्रहार स्टाईलने तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी छोटू महाराज वसू ,बंटी रामटेके, अतुल शिंगण, प्रशांत देशमुख, सुधीर उगले, प्रशांत शिरभाते, इमरान शाह, गोलू पाटील आदि उपस्थित होते.

## मनपाची पहिली आमसभा

वा सदस्य बसपा शिवसेना शिंदे गटातून येणार आहे.

**८ स्वीकृत सदस्य-** शहरी विकास मंत्रालयाच्या निर्णयानुसार पक्ष संख्येच्या आधारावर दहा टक्के पेक्षा कमी स्वीकृत सदस्य निवडून येणार आहे. २०२३ चा नियम येथे राहणार आहे. यामुळे मनपा मध्ये आठ नगरसेवक स्वीकृत राहणार आहे.

## रब्बीसाठी ३१ हजार हेक्टर

वीज केंद्रासाठी २५.००० दलघमी आणि संभाव्य औद्योगिक पाणीपुरवठ्यासाठी २.५० दलघमी असे एकूण ८९.४११ दलघमी पाणी आरक्षित करण्यात आले आहे. बिगर सिंचन ग्राहक पाणीपुरवठा योजनेची थकबाकी मोठ्या प्रमाणात असल्याचे निदर्शनास आल्यामुळे, संबंधित यंत्रणांनी मार्च २०२६ पूर्वी ही थकबाकी वसूल करावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.

या बैठकीला दूरदृष्य प्रणालीद्वारे विधानपरिषद सदस्य दादारावजी केचे उपस्थित होते. सर्व लाभधारकांना विहित वेळेत पाणी पोहोचण्याबाबत नियोजन करण्याचे त्यांनी निर्देश दिले. बैठकीस उर्ध्व वर्धा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता अनिकेत सावंत, जिल्हा कृषी अधिकारी राहुल सातपुते, महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक एस. पी. देशमुख, कार्यकारी अभियंता अमोल गुरव, गु. उमप यांच्यासह उर्ध्व वर्धा सिंचन मंडळाचे सर्व उपविभागीय अभियंता उपस्थित होते.

## तलवार घेऊन दहशत

त्याला तलवारसह ताब्यात घेतले.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ, सहाय्यक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहायक निरीक्षक महेश इंगोले, गजानन ढेवले ,मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, मंगेश परिमल, विशाल वाकपांजर, मिर्झा नईम बेग, विकास गुडधे, सागर ठाकरे, योगेश पवार यांनी केली.

## शेगाव नाका परिसरातील

एकच खळबळ उडाली. मोहम्मद साद घाणेवाले यांनी याची माहिती अग्निशमन विभागाला दिली. अग्निशमन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पथकाने आगीवर नियंत्रण मिळविण्यास सुरुवात केली. साधारणतः ४० मिनिटाच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण आणले. तो पर्यंत दुकानातील पूर्ण माल जळून दोन्ही दुकानाचे २ लाखांचे नुकसान झाले होते. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. वेळेवर अग्निशमन पथक पोहोचल्यामुळे आजूबाजूच्या स्टॉल व दुकानातील चप्पल बूट व सँडल वाचविण्यात यश आले.

पुढील तपास गाडगे नगर पोलीस स्टेशनचे पीआय करत आहे. अग्निशमन विभागाचे पाळी प्रमुख सुनील काकडे यांच्या आदेशानुसार फायरमॅन अमोल साळुंखे ,विकी हिवराळे ,चालक संतोष डोईफोडे यांनी आग नियंत्रणासाठी प्रयत्न केले.

## तापडिया मॉलमध्ये दहशतवाद

अजय जाधव यांच्या निर्देशाने पथकातील कमांडो यांनी अत्यंत कुशलतेने आणि चपळतेने कारवाई पार पाडली. यामध्ये जलद प्रतिसाद पथकाचे अधिकारी कमांडो, डॉग स्कॉट, बीडीएसची पोलीस निरीक्षक सोनाली गुल्हाने , उपनिरीक्षक नरवणे , एटीबीचे पोलीस निरीक्षक दाताळकर, राजापेठचे प्रभारी पोलीस निरीक्षक पुनीत कुलट, उपनिरीक्षक जाधव, हिवरे, आरसीपी पथक ,तापडिया मॉलचे मॅनेजर आशिष ढालकरी व सुरक्षा अधिकारी कोमलनाथ तायडे व त्यांच्या पथकाने सहभाग घेतला. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त श्याम घुगे, गणेश शिंदे, रमेश धुमाळ, सहाय्यक आयुक्त संजय खताळे यांच्या निर्देशानुसार यशस्वीरित्या मॉक ड्रिल घेण्यात आला.

## अकॅडमी ग्र्याउंड परिसरात

केली असता त्याच्याकडून एमडी जप्त करण्यात आली. जप्त केलेल्या अमली पदार्थाची किंमत मोठी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपीविरुद्ध अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून हा साठा कुठून आणला व कोणाकडे पुरवठा होणार होता, याचा तपास सुरू आहे. शहरातील अमली जाळ्याचा उलगडा करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी चौकशीची व्याप्ती वाढविली आहे. अलीकडेच डीआरआयने केलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर अमरावती पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून शहरात विशेष गस्त आणि तपासणी मोहीम हाती घेतली आहे. संशयित ठिकाणांवर लक्ष ठेवून अमली पदार्थांची आवक थांबविण्यासाठी समन्वित प्रयत्न सुरू आहेत.

## डॉराजेंद्र गोडे शैक्षणिक

करण्यात येते. शिक्षणाबरोबरच संस्कार, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास यांची जडणघडण होणे अत्यंत आवश्यक आहे, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

असीस कौर या बॉलीवूडमधील एक सुप्रसिद्ध आणि बहुचर्चित पार्श्वगायिका असून, आपल्या मधुर, भावपूर्ण आणि आत्मीय आवाजामुळे त्यांनी संगीतविश्वात एक विशेष स्थान निर्माण केले आहे. ‘बोलना’, ‘वी माही’, ‘रातां लंबियां’, ‘मखना’ यांसारख्या अनेक लोकप्रिय गाण्यांमुळे त्या घराघरात पोहोचल्या आहेत. त्यांच्या आवाजात असलेली कोमलता, भावनांची खोली आणि सुरेलतेची जादू श्रोत्यांच्या मनाला थेट स्पर्श करते. रोमँटिक, भावगीत किंवा उत्साही गाणे असो, प्रत्येक प्रकारात त्यांनी आपल्या गायकीची वेगळी छाप उमटवली आहे.

या विशेष कार्यक्रमात असीस कौर आपल्या काही गाजलेल्या आणि प्रेक्षकप्रिय गाण्यांसह नव्या व खास सादरीकरणांची मेजवानी देणार आहेत.

या कार्यक्रमामुळे अमरावतीतील विद्यार्थी आणि संगीतप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि स्थानिक नागरिक या मैफलीची आतुरतेने वाट पाहत आहेत. कॉलेज प्रशासनाने सर्व संगीतप्रेमींना या कार्यक्रमाचा आनंद घेण्याचे आवाहन केले आहे.

डॉ. राजेंद्र गोडे शैक्षणिक परिसराचे अध्यक्ष योगेंद्र गोडे आणि संस्थेच्या सचिव तन्वी गोडे यांनी सांगितले की, ‘विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा आमच्या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच उत्कृष्ट कामगिरी करावी असे नाही, तर कला, संस्कृती आणि संगीत अशा विविध क्षेत्रांतही त्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत.

कार्यक्रमाला डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिटयूट ऑफ टेकनॉलॉजी ॲंड रिसर्च चे प्राचार्य डॉ. सागर जिरापुरे, डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेज चे डायरेक्टर डॉ. एस. एस. हटकर, डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेज च्या डीन डॉ. सुधा जैन, डॉ. राजेंद्र गोडे आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल ॲंड रिसर्च सेंटर च्या प्राचार्या डॉ. उज्वला साखरकर, डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ. प्रमोद बुरकले, डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ. हरीगोपाल सावरकर, डॉ. राजेंद्र गोडे नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या प्रा. मीनल बायस्कर, डॉ. राजेंद्र गोडे पॉलिटेक्निक च्या समन्वयक प्रा. दिपाश्री देशमुख विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहतील.

## बैलबंडीला दुचाकीची धडक

तत्काळ दोघांनाही ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी विशालला तपासून मृत घोषित केले. शुभमवर प्राथमिक उपचार करण्यात आले असून त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले जाते. या प्रकरणी बेनोडा पोलिसांनी अपघाताची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# पोकरा घोटाळ्याने उघड केली भ्रष्टाचाराची पोलखोल ; शेतक-यांची विहीर मंजूर होऊनही रद्द!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**जिल्ह्यात खळबळ उडवून देणारे रिसोड तालुक्यातील शेलुखडसे पोकरा प्रकरणाने आता नवे वळण घेतले आहे. शेतकऱ्यांच्या अडानीपणाचा फायदा घेत सबंधित कृषीसहाय्यक व कृषीअधिकारी यांनी स्वतःसाठी आर्थिकमाया मिळावी म्हणून पात्र लाभार्थ्यांना डावलून अपात्र लाभार्थ्यांना नियमबाह्य विहिरीचा लाभ दिला असल्याचे स्पष्ट होत आहे. याबाबत येथील शेतकरी रवि अर्जुन खडसे यांनी पुराव्यासहित, राज्याचे कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मा. दत्तात्रय भरणे व प्रशासनातील वरिष्ठ स्तरावर तक्रार दाखल केली आहे.**



रवी खडसे यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, त्यांची नेर शिवारात स्वतःच्या मालकीची जमीन असून सदर शेतात पोकरा योजनेतून विहीर मिळावी म्हणून सर्वातआधी प्रस्ताव दाखल केला होता. दि.३० जानेवारी २०२० मध्ये दाखल केलेल्या माझ्या अर्जाचा ऑनलाईन संकेतांक 531360/A3.3.4/9517 हा आहे. या अर्जानुसार मला रितसर विहिरीसाठी पूर्वसंमती सुद्धा मिळाली होती. मात्र लगेचच दुसऱ्या दिवशी माशी कुठे शिंकली काय माहीत ? मला कळविण्यात आले की, तुम्ही याआधी पोकरा योजनेतील एका घटकाचा लाभ घेतला आहे. त्यामुळे तुम्हाला दुसरा लाभ घेता येणार नाही. म्हणून तुमची विहीर रद्द करण्यात आली आहे. याबाबत मी अधिक विचारपूस केली असता, मला कृषीसहाय्यक शिंदे, खाडे, भिसडे आणि राऊतकर यांच्या कडून वेगवेगळी कारणे सांगण्यात आली होती.त्यामध्ये पाहिले सांगण्यात आले की तुमच्या अर्जात चूक झाली असून ती मुंबईवरून दुरुस्त करून आणावी लागेल. दुसरे कारण तुम्ही तुषार संचाचा लाभ घेतला आहे. त्यामुळे या योजनेतून एका लाभार्थ्याला कुठल्याही एका घटकाचा लाभ घेतला तर दुसरा लाभ घेता येत नाही. आणि सरतेशेवटी सांगितले की, तुमचे नेर शिवार या योजनेत समाविष्ट नाही. अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन कृषी विभागातील सर्वांनीच माझी दिशाभूल करून माझ्यावर खुप मोठा अन्याय केला आहे. मला विहिरीच्या लाभापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवून माझ्या भविष्यातील स्वप्नांचा चुराडा केला आहे. आणि याला सर्वस्वी जबाबदार कृषीसहाय्यक व कृषीअधिकारी हेच आहेत. कारण नेर शिवार जर पोकरा योजनेत समाविष्ट नाही तर ईतर लाभार्थ्यांना याच शेतशिवारात विहिरीसहीत अनेक लाभ देण्यात आले आहेत. शिवाय मला जे घटक माझ्या ऐपतीबाहेर असल्याने नको होते, त्या घटकांची मला पूर्वसंमती देण्यात आली होती. मग विहीरच का रद्द केली? अशी माझी तक्रार आहे. कारण माझ्या नंतर खुप उशिराने आलेले विहिरीचे प्रस्ताव मंजूर करून त्यांना लाभ देण्यात आला आहे. तर काहींना अपात्र असून देखील नियमबाह्य विहीर घटकाचा लाभ देण्यात आला आहे. मग माझ्यावरच अन्याय का ? हीच माझी गंभीर तक्रार आहे. या गंभीर गैरप्रकरणात आर्थिक देवाण घेवाण करून कुठे तरी पाणी मुरले असल्याचे स्पष्ट होत आहे. या गंभीर प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी माझी मागणी आहे. त्यासाठी आपण राज्याचे कृषीमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.दत्तात्रय भरणे साहेब, विभागीय कृषी सहसंचालक अमरावती आणि जिल्हाधिकारी साहेब वाशिम यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. पहिलेच संपूर्ण जिल्ह्यात गाजत असलेल्या शेलुखडसे येथील पोकरा योजनेतील या गैरप्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून चौकशी सुरू आहे.

# कारंजा (लाड) येथे जीवघेणे रस्ते
## नागरिकांची एसडीओंकडे तातडीची धाव

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शुक्रवारी (दि. १३ फेब्रुवारी) रोजी कारंजा (लाड) येथील माळीपुरा परिसरातील धोकादायक रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी नागरिकांनी मा. उपविभागीय अधिकारी (SDO) यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली. 'रस्ता दुरुस्ती बाबत तातडीची तक्रार' या विषयाखाली देण्यात आलेल्या निवेदनात परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे नमूद करण्यात आले आहे.



एकवीरा मंदिरासमोरील पुलापासून बोरी नाका–ऐतिहासिक चोर आंबा मार्गे संभाजीनगर–नागपूर राज्य महामार्गाला जोडणारा मुख्य रस्ता अक्षरशः खड्ड्यांनी भरला असून काही ठिकाणी रस्त्याची एक बाजू पूर्णतः खचली आहे. खचलेल्या भागालगत मोठा व खोल खड्डा निर्माण झाल्याने येथे भीषण अपघात होण्याची दाट शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

या मार्गावरून दररोज शेतकरी व सामान्य नागरिकांची मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. वारंवार छोटे-मोठे अपघात घडत असून काही दिवसांपूर्वी सोयाबीन वाहतूक करणारा ट्रॅक्टर-ट्रॉली पलटी होऊन शेतकरी जखमी झाल्याची घटना घडल्याचे निवेदनात नमूद आहे.

तसेच माळीपुरा बोरी नाका ते दारव्हा रोडवरील स्मशानभूमीपर्यंतचा रस्ताही अत्यंत खड्डेमय झाला असून नागरिक व शेतकरी प्रचंड त्रास सहन करत आहेत. त्यामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तात्काळ पाहणी करून दुरुस्तीचे काम हाती घ्यावे, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनाची प्रत नगर परिषद कारंजा (लाड) चे मा. मुख्याधिकारी यांनाही देण्यात आली आहे. 'अपघात होण्यापूर्वी उपाययोजना करा' असा इशारा देत नागरिकांनी प्रशासनाकडून तातडीच्या कार्यवाहीची अपेक्षा व्यक्त केली आहे. आता प्रशासन या गंभीर तक्रारीवर कितपत वेगाने प्रतिसाद देते, याकडे संपूर्ण कारंजा (लाड) परिसराचे लक्ष लागले आहे.

# आचार्य श्री १०८ समयसागरजी महाराज यांचा चातुर्मास शिरपूर (जैन) येथे होण्यासाठी आचार्यश्रींना निवेदन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

विश्ववंदनीय युग श्रेष्ठ, उत्तम समाधीस्त, संत शिरोमणी आचार्य भगवंत १०८ विद्यासागजी महामुनीराज यांचे परम प्रभावक शिष्य विद्यमान पट्टाचार्य १०८ समयसागरजी महामुनिराज मुनी संघासह सिद्धक्षेत्र मुक्तागिरी येथे विराजमान आहेत. मुक्तागिरी येथे जाऊन श्री दिगंबर जैन महासमितीचे विदर्भ अध्यक्ष अभिनंदन पेंढारी, महासमितीचे उपाध्यक्ष प्रा. प्रशांत गडेकर, वाशीम जिल्ह्याचे अध्यक्ष प्रमोद मानेकर, प्रांजल जैन,अरुण आहाळे, वेरूळ चे संजय महाजन, शशिकांत महाजन यांचेसह सर्व पदाधिकाऱ्यांनी व गुरुभक्त परिवारांनी,आचार्य श्री समयसागजी महाराजांचे दर्शन घेऊन श्रीफळ गुरुचरणी अर्पण केले. आचार्य भगवंतांचा आशीर्वाद घेऊन गुरुदेवांनी सहसंघ, वर्ष २०२६ मधील

शितकालीन वाचना वेरूळ येथे व चातुर्मास शिरपूर (जैन)येथे व्हावा म्हणून अमरावती , अनसिंग,मालेगाव,वाशीम, डोणगाव, सिंदखेड राजा, देऊळगाव राजा, जालना, संभाजीनगर ,वेरूळ व शिरपूर (जैन) येथे येण्यासाठी श्रीफळ चढवून येण्याचे निवेदन दिले. सोबत वेरूळ येथे माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन आचार्य भगवंत समयसागरजी महाराजजी यांच्या उपस्थितीमध्ये व परम आशीर्वादामध्ये व्हावे ही भावना माजी विद्यार्थी, प्राचार्य प्रशांत गडेकर, शशिकांत महाजन, निवृत्त शिक्षक संजय महाजन व समस्त गुरुकुलच्या माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. गुरुदेव समय सागरजी महाराज यांनी याबाबत अनुकूलता दर्शवली असून उपस्थित सर्व गुरुभक्त परिवारांनी भक्ती बेकरार है आनंद अपार है ,आजाओ प्रभू समयसागरजी आपका इंतजार है म्हणत भक्तीगीत सादर केले.

आचार्य भगवंत यांची अमरावती विभाग आगमनी प्रित्यर्थ नवीन उत्साह व वातावरणात स्वागताची जय्यत तयारी केल्या जाईल याबाबत विदर्भ अध्यक्ष पेंढारी, विदर्भ उपाध्यक्ष प्राचार्य गडेकर यांनी मत व्यक्त केले. तर कारंजा येथून राजाभाऊ डोणगावकर यांनी देखील कारंजात जय्यत तयारी समस्त जैन समाजाकडून केली जाईल म्हणून समाज बांधवांना सोबत सभा आयोजित करून आनंद व्यक्त केला. समस्त गुरुभक्त परिवाराने श्रीफळ अर्पण केले. शिरपूर जैन ची प्रस्तावना बालब्रह्मचारी तात्या भैया यांनी केली.

सोबत ट्रस्टचे अध्यक्ष सचिव व संघर्ष समितीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बालब्रह्मचारी पंकज भैया यांनी शिरपूरची विशेषता व कमतरता बाबत आचार्य भगवंत यांच्या आगमनाने कमतरतेत सुधारणा होऊन विशेषता बाबत संबोधन केले. याप्रसंगी विद्यासागर महाराज की जय समय सागर जी महाराज की जय चा जयघोष करण्यात आला. या प्रसंगी आचार्य समयसागरजी महाराजांनी उपस्थितांकडून पूर्ण माहिती घेतली.

# समाजाला संत विचारांची दिशा मिळावी - आमदार सई डहाके

■ प्रतिनिधी | कारंजा ■

आज समाज दिशाहीन झाला आहे. संस्काराचे भान नसल्याने आचार विचार विकृत झाले आहे.आपसातील हेवेदावे वाढत आहे. यामुळे विकासाऐवजी समाजाची अधोगती होत आहे. अशा परिस्थितीत समाजाला संत विचारांची दिशा मिळणे गरजेचे आहे.असे प्रतिपादन कारंजा मानोरा संघाच्या आमदार श्रीमती सईताई डहाके यांनी व्यक्त केले. कृष्ण सहारा कॉलनीतील हनुमान मंदिर संस्थान येथे संतोषी माता महिला भजनी मंडळाच्या वतीने दि.१२ फेब्रुवारी रोजी आयोजित केलेल्या 'संत स्मृती दिन व मासिक सत्संग' सोहळ्यात त्या उद्घाटक म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नवनिर्वाचित नगरसेविका शालिनीताई ठाकरे होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून श्याम सवाई, प्रशांत ठाकरे, सुनीलभाऊ दशमुखे, ज्योतीताई उगले, निलेश सोमानी, राधाताई मुरकुटे, विजयराव महल्ले, पवन श्रीनाथ, नेमाने पाटील, रमेश श्रीवास्तव इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



प्रारंभी सुनील दशमुखे यांनी आपल्या प्रास्ताविकातून गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्याची विस्तृत माहिती दिली. श्याम सवाई हे महिलांच्या संस्काराविषयी बोलताना म्हणाले की, लहान मुले हे आईचे अनुकरण करतात आईने जर मोबाईल मधून डोकं काढले तर मुले पुस्तकात डोकं घालतील.तेव्हा स्त्रियांनी सजग राहून संस्कार करावे. पवन श्रीनाथ म्हणाले की ग्रामगीता ही आजच्या युगातील संजीवनी आहे जो ती वाचेल त्याचा तरणोपाय झाल्याशिवाय राहणार नाही..आईचे कार्य आणि वर्तन यामुळे मुलांचे भविष्य उज्वल बनते असे विचार ज्योतीताई उगले यांनी व्यक्त केले.

तालुका सेवाधिकारी आशा व्यवहारे यांनी आपल्या मंडळाच्या विविध उपक्रमाचा आढावा घेतला. याप्रसंगी निलेश सोमानी, प्रशांत ठाकरे, नेमाने पाटील यांची ही समोयोचित भाषणे झाली . आज आमदार सईताई डहाके यांचा वाढदिवस असल्याने विविध महिला मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गुरुदेव सेवा परिवारातील गोपाल साखरकर यांची नामांकित बँकेत निवड झाल्याने त्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी विविध महिला भजनी मंडळांनी भजन सेवा सादर केली. प्रबोधन सत्रात पवन श्रीनाथ यांनी 'तुकडोजी महाराजांच्या विचारांचा स्त्रियांच्या जीवनावरील प्रभाव 'यावर विचार व्यक्त केले. सायंकाळी पुरुष भजनी मंडळाने सामुदायिक प्रार्थना म्हटली. कार्यक्रमाचे संचलन हर्षाताई अंधारे यांनी केले. विद्या चंदनकार यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी साठी संतोषी माता महिला मंडळ व छावा मित्र मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# अकोल्यात जिल्हास्तरीय 'सरस प्रदर्शन'

**अकोला :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) मार्फत महिला स्वयंसहाय्यता समूहांचे सबलीकरण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून स्वयंसहाय्यता समूहांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या उत्पादनांची विक्री वाढविणे तसेच समूहांच्या आर्थिक जीवनमानात वाढ करणे या उद्देशाने जिल्हास्तरीय 'सरस प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

हे प्रदर्शन दि. २० फेब्रुवारी ते दि. २४ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत लाल बहादुर शास्त्री स्टेडियम, सुंदराबाई खंडेलवाल टॉवर चौक, रेल्वे स्टेशन रोड, अकोला येथे भरविण्यात येणार आहे.

# १६ ते २५ फेब्रुवारी दरम्यान निवासी शाहिरी प्रशिक्षण शिबिर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या आयोजनातून येथील जुन्या नगर परिषदेजवळील पत्रकार भवनात १६ ते २५ फेब्रवारी दरम्यान वय १५ ते ३० या वयोगटातील युवकांसाठी विनामूल्य निवासी शाहिरी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणासाठी प्रवेशाची मर्यादा केवळ २० असून, लोककलेत आपले भवितव्य घडवू इच्छिणाऱ्या युवकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिबिर संचालक शाहीर संतोष खडसे यांनी केले आहे.

लोककलेचा वारसा जपणाऱ्या या उपक्रमामध्ये महाराष्ट्रातील दिग्गज व अनुभवी शाहीर तसेच विविध लोककलांमध्ये पारंगत असलेल्या कलावंतांचे मार्गदर्शन प्रशिक्षणार्थींना लाभणार आहे. यामध्ये सांस्कृतिक कार्य संचालनालय विभाग भांडवली व प्रयोग अनुदान समिती सदस्य शाहीर धनंजय खुडे (पुणे), राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शाहीर बजरंग अंबी, शाहीर अनंतकुमार साळुंके , राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती पुरस्कारप्राप्त शाहीर रामदास धुमाळ , शाहीर नानाभाऊ परीहार, शाहीर विजय पांडे , शाहीर सज्जनसिंग राजपूत, राष्ट्रीय कीर्तनकार गुलाबराव महाराज , डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कारप्राप्त शाहीर ईश्वर मगर (बुलढाणा), शाहीर संतोष खडसे, शाहीर प्रज्ञानंद भगत, शाहीर धम्मानंद उर्फ उत्तम इंगोले, शाहीर निरंजन भगत, शाहीर कविनंद गायकवाड व शाहीर शेषराव मेश्राम यांचा समावेश आहे.

# उपोषणाला यश; सत्यमेव जयते फाउंडेशनची मागणी मान्य

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सामाजिक प्रश्नांवर ठाम भूमिका घेत जनतेच्या मागण्यांसाठी लढणाऱ्या सत्यमेव जयते फाउंडेशनच्या वतीने १० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू करण्यात आलेले आमरण उपोषण अखेर यशस्वी ठरले. संबंधित विभागाने मागण्या मान्य केल्याचे लेखी पत्र दिल्यानंतर उपोषणाची अधिकृत सांगता करण्यात आली.

फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष परमेश्वर अंभोरे यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी १० फेब्रुवारीपासून जिल्हा परिषद वाशिम कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. जिल्ह्यातील नागरिकांच्या हिताशी संबंधित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा लढा उभारण्यात आला होता. उपोषणाच्या काळात मोठ्या संख्येने सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच नागरिकांनी उपस्थित राहून पाठिंबा दर्शविला.

**वाशिम जिल्हा परिषद कार्यालयासमोरील आमरण उपोषणाची लिंबूपाणी पाजून सांगता**



प्रशासनाशी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी मागण्या मान्य केल्याचे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते परमेश्वर अंभोरे यांना लिंबूपाणी पाजून उपोषणाची सांगता करण्यात आली.

या प्रसंगी प्रदीपभाई अंभोरे, संस्थापक अध्यक्ष, भूमिमुक्ती मोर्चा महाराष्ट्र, गोपाळराव गुरुजी (ज्येष्ठ नेते), दीपकसिंग साळुंखे (विस्तार अधिकारी, पंचायत समिती वाशिम), अजय बिटोडे (उपसरपंच, सावरगाव जिरे), अमोल देशमुख(सरपंच, वाकद), सोनाजी इंगळे (सचिव, वंचित बहुजन आघाडी वाशिम) तसेच हरिदास बनसोड (कृषी तज्ञ, वाशिम) यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय अनेक कार्यकर्ते, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपोषण स्थळी जिल्ह्यातील विविध प्रतिष्ठित व्यक्ती, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि कार्यकर्ते शेकडोच्या संख्येने भेट देऊन पाठिंबा दर्शवत होते. नागरिकांच्या न्याय्य मागण्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या या लढ्याला अखेर यश मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. परमेश्वर अंभोरे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, 'ही लढाई केवळ एका व्यक्तीची नसून सर्वसामान्य जनतेच्या हक्कांची होती. प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत मागण्या मान्य केल्याबद्दल आम्ही आभारी आहोत. भविष्यातही जनहिताच्या प्रश्नांवर आमचा लढा सुरू राहील.' या यशस्वी उपोषणामुळे सामाजिक नवसंजीवनी मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# श्री गुरु तेग बहादुर यांचे ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्ष

**अकोला:** 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर सहिब जी यांच्या ३५० वी शहिदी समागम शताब्दी महोत्सवानिमित्त नवी मुंबई येथील खारघर येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी आयोजिण्यात आला आहे. त्यानिमित्त शासनातर्फे विविध जिल्ह्यात अनेक उपक्रम घेण्यात येत असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्रामध्ये यापूर्वी नागपूर व नांदेड येथे श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त भव्य कार्यक्रम पार पडले असून, आता खारघर येथे होणारा हा कार्यक्रम ऐतिहासिक ठरणार आहे.


## जाहिरनामा

या जाहीरनाम्याव्दारे सर्वत्र लोंकाना कळविण्यात येते की, उपरोक्त विषयी संदर्भिय अर्जान्वये अर्जदार श्री दत्ता विठ्ठल सुर्वे व इतर रा पिंप्री खु ता मंगरुळपीर जि वाशिम यांचा अर्जान्वये सुरु करण्यात आले आहे. प्रकरणात अर्जदार यांची मौजे पिप्री खु येथील सर्वे क्र/गट क्र १८९ मधील एकुण क्षेत्र २.३४ हे आर पैकी १.१४ हे आर शेत जमीन असुन सदर शेतजमीन अर्जदार यांचे ताब्यात व वहीतीत आहे. सदर जमीनीचे ७/१२ वर इतर अधिकार मध्ये संरक्षित कुळ पांडु रावजी १९५१-५२ प्रमाणे या नावाचे कुळ दर्शविलेले आहे. सदर कुळाचा बोझा कमी करण्यासाठी अर्जदार यांनी विनंती अर्ज सादर केला आहे.

सदर प्रकरणात कोणाला काही आक्षेप/ हरकती दाखल करावयाच्या असल्यास त्यांनी सदरच्या जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून (कार्यालयीन सुटीचे दिवस सोडून) १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात आपल्या हरकती/ आक्षेप सादर करावे. मुदती नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी

स्थळ - मंगरुळपीर
दिनांक - ३०/०९/२०२५

शिक्का

**तहसिलदार**
मंगरुळपीर


# आदिवासी भागात 'तोतया डॉक्टर'चा सुळसुळाट

## अर्धांगवायू-कॅन्सर बरा करण्याच्या भूलथापा देत लुबाडणूक

*पातुर : पातुर तालुक्यातील आदिवासी बहुल भागात एका तोतया बोगस डॉक्टरकडून सर्रास उपचार सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना केवळ कंपाउंडरचा अनुभव असल्याचा दावा करून हा भामटा सकाळ-सायंकाळ गावोगावी फिरत रुग्ण शोधत असल्याची माहिती आहे.*

बोडखा, चिंचखेड, माळ राजुरा, कोसगाव, दुधानी, गोंधळवाडी, सावरखेड या परिसरात मोठ्या प्रमाणावर शेतकरी व मजूर वर्गातील आदिवासी समाज वास्तव्यास आहे. याच भोळ्या-भाबड्या नागरिकांना लक्ष्य करून संबंधित व्यक्ती 'अर्धांगवायू, कॅन्सर १०० टक्के बरा करतो' अशा गोड बोलण्याच्या भूलथापा देत उपचाराच्या नावाखाली मोठी रक्कम उकळत असल्याची चर्चा आहे.



गावात भंगार गोळा करणाऱ्यासारखा फिरत 'कोणी रुग्ण आहे का?' अशी चौकशी करून तो घराघरांत जातो. त्यानंतर पोपटासारखे बोलून रुग्ण व कुटुंबीयांचा विश्वास संपादन करतो आणि कोणतीही वैद्यकीय पात्रता नसताना इंजेक्शन-औषधांचा मारा करतो. चुकीच्या उपचारांमुळे काहींना गंभीर दुष्परिणाम भोगावे लागल्याचीही चर्चा गावकऱ्यांत आहे.

या गंभीर प्रकाराकडे तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांचे जाणूनबुजून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

आदिवासी नेत्यांनीही या प्रकरणाची दखल घेत संबंधित तोतया डॉक्टरविरुद्ध तातडीने गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात अकोला जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, पातुर तहसीलदार व गटविकास अधिकारी यांच्याकडे कारवाईची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, आदिवासी भागातील निष्पाप रुग्णांचे होणारे शोषण थांबवण्यासाठी आरोग्य विभागाने तत्काळ पथक पाठवून चौकशी करावी व संबंधितावर कडक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### अशी आहे शिक्षेची तरतूद

बोगस व्यावसायिकांवर लगाम घालण्यासाठी शासनाने महाराष्ट्र वैद्यकीय अधिनियम १९६१ मधील कलम ३३ व ३८ मध्ये सुधारणा केली आहे. १३ मार्च २००१ पासून लागू असलेल्या सुधारित तरतुदीनुसार अनधिकृतपणे वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल होतो. प्रथमच दोषी आढळल्यास किमान दोन वर्षांपासून ते तीन वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकते.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ८० ■ शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## प्रेमाच्या जाळयात अडकवून तरुणीवर अत्याचार; पाच महिन्यांची गर्भवती

### -विवाहाचे आमिष, वारंवार शोषण; आरोपी फरार

### रामनगर पोलिसांत गुन्हा दाखल

**वर्धा जनमाध्यम :** कराटे क्लासमधील ओळख, प्रेमाचे गोड बोल आणि विवाहाचे स्वप्न पण या सगळ्यामागे दडला होता फसवणुकीचा क्रूर चेहरा विवाहाचे आमिष दाखवून २० वर्षीय तरुणीवर वारंवार अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. तरुणी पाच महिन्यांची गर्भवती असल्याचे समोर आल्यानंतर प्रकरणाची पोलिसांत तक्रार करण्यात आली. या प्रकरणी रामनगर पोलिस ठाण्यात आरोपी युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रामनगर हद्दीत राहणारी तरुणी कराटे प्रशिक्षणासाठी जात होती. तेथे तिची २५ वर्षीय युवकासोबत ओळख झाली. पुढे या ओळखीचे प्रेमसंबंधात रूपांतर झाले. आरोपीबाबत ठोस माहिती नसतानाही तरुणीने त्याच्यावर विश्वास ठेवला. जून २०२४ मध्ये आरोपीने तिला आपल्या राहत्या खोलीवर बोलावून प्रथम अत्याचार केल्याचा आरोप आहे. त्यानंतर सप्टेंबर २०२५ पर्यंत विवाहाचे आश्वासन देत तिचे वारंवार लैंगिक शोषण करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

#### गर्भधारणेनंतर उघडकीस प्रकार

काही काळानंतर दोघांमध्ये दुरावा निर्माण झाला. तरुणीचा मोबाईल बंद पडल्याने संपर्क तुटला. आरोपीनेही राहते घर बदलून संपर्क टाळल्याचे समोर आले आहे. दरम्यान, तरुणीची प्रकृती खालावल्याने वैद्यकीय तपासणी करण्यात आली असता ती पाच महिन्यांची गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तिने धैर्य एकवटून पोलिसांत धाव घेतली.

रामनगर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक अलीम शेख करीत आहेत.

या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून विवाहाचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईची मागणी होत आहे.

## मुख्य बाजारपेठेत सांडपाण्याचा पूर

# नाल्या तुंबल्याने नागरिक संतप्त; घंटागाडी रोखून प्रशासनाविरोधात आंदोलन

**आष्टी शहीद । जनमाध्यम :** आष्टी शहराच्या मुख्य बाजारपेठेत तुंबलेल्या नाल्यांमुळे सांडपाणी थेट रस्त्यावर वाहू लागल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. संतप्त नागरिकांनी घनकचरा वाहून नेणारी घंटागाडी तब्बल दोन तास अडवून आष्टी नगरपंचायत प्रशासनाचा तीव्र निषेध नोंदवला.

सोनू भार्गव यांच्या घरासमोरील नाला गेल्या महिनाभरापासून चोकअप झाला असून घाणपाणी सिमेंट रस्त्यावर साचत आहे. हा भाग मुख्य बाजारपेठेतील वर्दळीचा रस्ता असल्याने व्यापारी, ग्राहक व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दुर्गंधी आणि डासांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे आरोग्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.



२०१४ साली नगरपंचायत अस्तित्वात आल्यानंतर प्रथमच काँग्रेसच्या हाती सत्ता देण्यात आली. २०१४ ते २०१९ या कालावधीत तत्कालीन आमदार अमर काळे यांच्या कार्यकाळात अपेक्षित विकास झाला नाही, अशी टीका नागरिक करत आहेत. २०२२ च्या निवडणुकीनंतर अपक्षांच्या मदतीने पुन्हा सत्ता स्थापन झाली; मात्र शहराचा विकास अजूनही कोसो दूर असल्याची भावना व्यक्त होत आहे. सत्ता आहे, पण विकास कुठे असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. शहरात केवळ एकच घंटागाडी आणि दोन मजूर घरोघरी कचरा संकलन करतात. १३ फेब्रुवारी रोजी सकाळी नागरिकांनी घंटागाडी अडवून 'नाल्या तात्काळ उपसा अशी मागणी केली. मुख्याधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून कळवूनही कोणी घटनास्थळी दाखल न झाल्याने नागरिकांचा संताप आणखी वाढला. गेल्या दोन महिन्यांपासून नाल्यांची साफसफाई न झाल्याने घाणीचे थर साचले आहेत. शहरात मच्छर-डासांचे प्रमाण वाढले असून साथरोगांचा धोका निर्माण झाला आहे. आष्टी तालुका शहीदवीरांचा आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक म्हणून ओळखला जातो; मात्र स्वच्छतेच्या प्रश्नावर प्रशासनाची उदासीनता नागरिकांना चटका लावत आहे.

दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून नगरपंचायत प्रशासनाला समज द्यावी आणि स्वच्छता व्यवस्थेत सुधारणा करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

## 'आरटीई'ला जिल्ह्यात मर्यादित प्रतिसाद

# २५ टक्के आरक्षणाची अंमलबजावणी जिल्ह्यात ११३ शाळांचा सहभाग

### -१३७६ जागांसाठी लवकरच ऑनलाईन अर्ज प्रक्रिया

**वर्धा जनमाध्यम :**बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यानुसार (Right to Education – RTE) दरवर्षी खासगी शाळांमध्ये २५ टक्के जागा आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात येतात. मात्र यंदा वर्धा जिल्ह्यात 'आरटीई' प्रक्रियेसाठी केवळ ११३ शाळांनी नोंदणी केल्याचे चित्र समोर आले आहे.

या नोंदणीमुळे २०२६-२७ या शैक्षणिक सत्रात १३७६ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेशाची संधी उपलब्ध होणार आहे. वरिष्ठ पातळीवरून सूचना मिळताच पालकांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येणार असून प्रवेश प्रक्रिया पारदर्शक सोडत पद्धतीने राबविण्यात येणार आहे.

'आरटीई' नोंदणी करताना शाळांना मागील तीन वर्षांतील प्रवेशाची सविस्तर आकडेवारी सादर करावी लागते. तसेच आवश्यक शैक्षणिक व प्रशासकीय माहिती भरावी लागते. संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या लॉगिनवरून या माहितीची पडताळणी केल्यानंतरच शाळांची नोंदणी ग्राह्य धरली जाते. मध्यंतरी ही प्रक्रिया पूर्ण झाली असून जिल्ह्यातील आठही तालुक्यांतील शाळांनी सहभाग नोंदविला आहे. आता विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अर्ज प्रक्रियेची प्रतीक्षा आहे. सोडत पद्धतीने शाळांची निवड झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे.

**यंदा 'आरटीई'च्या १३७६ जागा-** जिल्ह्यातील ११३ शाळांमध्ये एकूण १३७६ जागा उपलब्ध असून या जागांवर आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना २०२६-२७ सत्रात प्रवेश दिला जाणार आहे.





**तालुकानिहाय शाळांची नोंदणी-**

वर्धा : ४२
आर्वी : १२
आष्टी : ०४
देवळी : १३
हिंगणघाट : १८
कारंजा : ०६
समुद्रपूर : ०६
सेलू : १२

जिल्ह्यातील काही तालुक्यांत नोंदणीचे प्रमाण तुलनेने कमी असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आगामी काळात अधिकाधिक शाळांनी 'आरटीई' प्रक्रियेत सहभागी व्हावे, अशी अपेक्षा पालकवर्गातून व्यक्त होत आहे.

## बोधगया मुक्तीच्या हाकेला वर्ध्याची साथ

### -दिल्लीतील धरणे आंदोलनात खा.काळे सहभागी

**वर्धा । जनमाध्यम :** तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारपथावर उभ्या असलेल्या देशभरातील बौद्ध समाजाचे लक्ष सध्या दिल्लीतील बोधगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाकडे लागले आहे. जागतिक वारसा स्थळ असलेल्या महाबोधी महाविहारच्या प्रशासनावरील पूर्ण मालकी हक्कासाठी सुरू असलेल्या या आंदोलनाला वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांनी प्रत्यक्ष धरणे आंदोलनात सहभागी होत जाहीर पाठिंबा दिला.



१२ फेब्रुवारी २०२५ पासून सुरू असलेल्या या आंदोलनात बौद्ध भिक्खू आणि अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. बोधगया मंदिर कायदा १९४९ (BTA) रद्द करून महाविहाराचे पूर्ण प्रशासन बौद्ध समाजाकडे सोपविण्याची आंदोलकांची प्रमुख मागणी आहे. ही केवळ मंदिराची नव्हे, तर स्वाभिमानाची लढाई आहे, असे मत व्यक्त करत खा. काळे यांनी सर्व न्यायोचित मागण्यांना समर्थन दर्शविले.

धरणे स्थळी उपस्थित राहून त्यांनी आंदोलनकर्त्यांशी संवाद साधला आणि लोकप्रतिनिधी म्हणून आपल्या बांधिलकीची जाणीव करून दिली. यावेळी भंडाऱ्याचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे तसेच महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाशी संबंधित विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

बोधगया मुक्ती आंदोलनाला देशभरातून वाढता प्रतिसाद मिळत असून, या ऐतिहासिक लढ्याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

## सोमवारी जनता दरबार

### नागरिकांना निवेदने, समस्या, प्रश्न सादर करण्याचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांचे प्रशासनाशी निगडित असलेले प्रश्न सोडविण्यासाठी सोमवार दि.१६ रोजी फेब्रुवारी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार, खनिकर्म राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली जनता दरबार आयोजित करण्यात आला आहे.



जिल्ह्यातील नागरिकांचे प्रशासनाशी निगडित असलेले प्रश्न, प्रलंबित विषय सोडविण्यासाठी या जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर हे सर्वसामान्य नागरिकांची निवेदने, समस्या, प्रश्न समजून घेतील आणि ते सोडविण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना निर्देश देतील. जनता दरबार मध्ये सर्व जिल्हास्तरीय अधिकारी देखील उपस्थित राहणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांना आपल्या काही समस्या, प्रश्न असतील किंवा विविध विषयांवर पालकमंत्र्यांना निवेदन द्यावयाचे असल्यास संबंधितांनी लेखी स्वरूपात आपली समस्या दि.१६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित राहून मांडावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी संजीव जाधवर यांनी केले आहे.

## एसटीच्या सवलतधारक प्रवाशांना मिळणार एनसीएमसी स्मार्टकार्ड

**वर्धा जनमाध्यम :** रोख व्यवहारांच्या पलीकडे जाऊन, पारदर्शकता आणि सोयीस्कर सेवा देण्यासाठी एसटी महामंडळाने नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड (एनसीएमसी) प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सवलतधारक प्रवाशांचा स्मार्टच्या माध्यमातून प्रवास सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक होणार आहे. या सेवेचा प्रवाशांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



एसटीच्या विविध सामाजिक सवलतींचा लाभ घेण्यासाठी हे स्मार्ट कार्ड अनिवार्य असणार आहे. ही केवळ तांत्रिक सुधारणा नसुन प्रवाशांच्या विश्वासाला डिजिटल बळ देणारे पाऊल आहे. सवलतीच्या अचूक नोंदी, पारदर्शक प्रतिपुर्ती आणि रोखविरहित व्यवहार या तिन्ही गोष्टी एका कार्डमध्ये सामावल्या जाणार आहे.

शालेय व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या सरल क्रमांकाशी जोडलेले कार्ड दिले जाईल. अमृत जेष्ठ नागरिक, सर्वसाधारण जेष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना आधार संलग्न कार्ड मिळेल, दिव्यांग प्रवाशांना युडीआयडी क्रमांक जोडून विशेष सुविधा असलेले कार्ड देण्यात येणार आहे. तसेच स्वातंत्र्य सैनिक, अधिस्विकृतीधारक पत्रकार आणि राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना विभागीय कार्यालय येथील मुख्यालय आगारामार्फत कार्डचे वितरण करण्यात येणार आहे. सदर कार्ड स्मार्ट असल्यामुळे इटीआयएम मशीन, अधिकृत संकेतस्थळ, मोबाईल ?प किंवा नियुक्त एजंटकडून सहज रिचार्ज होईल. कार्डची किमंत १९९ रुपये जीएसटीसह असून जुने कार्ड जमा केल्यास १४९ रुपयात उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

कार्ड नोंदणी करीता राज्य परिवहन महामंडळामार्फत व्यापक यंत्रणा उभारण्यात येणार असून जेष्ठ नागरिक आणि महिलांच्या सोयीसाठी ३ हजाराहून अधिक एजंट नियुक्त करण्यात आले आहेत. बसस्थानकांवरच नोंदणीची प्रक्रिया पार पडणार असल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. प्रवाशांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे विभाग नियंत्रक भगवान जगनोर यांनी कळविले आहे.

## बँक फोडून चोरी, दोन आरोपींकडून ८.४२ लाख जप्त

### -सुकळी (बाई) येथील प्रकार; तिसऱ्या आरोपीचा पोलिसांकडून शोध सुरू

**वर्धा जनमाध्यम :** तालुक्यातील सुकळी (बाई) येथील ँहव द घ्र्ह्रंच्या शाखेत १३ जानेवारी रोजी झालेल्या चोरीप्रकरणी पोलिसांनी महत्त्वाची कारवाई करत दोन आरोपींना अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून ८ लाख ४२ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली असून, तिसरा आरोपी अद्याप फरार आहे.





चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास बँकेच्या तिजोरीवर हात साफ करत २३ लाख ११ हजार रुपयांची रोकड लंपास केली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी कर्मचारी शाखेत पोहोचल्यावर तिजोरी फोडल्याचे आढळून आले. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून तपास सुरू केला.

बँकेतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चोरीचा प्रकार कैद झाला होता. या चित्रफितींच्या आधारे पोलिसांनी संशयितांची ओळख पटवून तपासाची दिशा निश्चित केली. तपासादरम्यान अदीक कोलाड, सुरेश उमक आणि बोक्या निंबाळकर अशी तिघांची नावे समोर आली.

पोलिसांनी अदीक कोलाड याला अमरावती परिसरातून तर सुरेश उमक याला वर्धा परिसरातून अटक केली. दोघांकडून मिळून ८ लाख ४२ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम व चोरीतील इतर बाबींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

दरम्यान, या गुन्ह्यातील तिसरा आरोपी बोक्या निंबाळकर फरार असून त्याच्या अटकेसाठी पोलिसांनी पथके रवाना केली आहेत. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सावंगी पोलीस ठाण्याचे ठाणेदार पंकज वाघोडे पुढील तपास करीत आहेत.

या घटनेमुळे बँक सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित होत असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## हिंगणघाट बाजार समितीत भिवापूर संचालक मंडळाची अभ्यासपूर्ण भेट

**हिंगणघाट । जनमाध्यम** भिवापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने हिंगणघाट कृषी उत्पन्न बाजार समिती येथे सदिच्छा व अभ्यासपूर्ण भेट दिली. यावेळी हिंगणघाट बाजार समितीचे सभापती अँड. सुधीरबाबू कोठारी यांच्या हस्ते भिवापूरचे सभापती बाळूजी इंगोले व संचालकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



हिंगणघाट यार्डमधील शेतकरी, व्यापारी व अडत्यांसाठी उपलब्ध सुविधा, पारदर्शक लिलाव पद्धती आणि विविध विकासकामांची माहिती देत अँड. कोठारी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या सुविधा भिवापूर बाजार समितीत राबविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे श्री इंगोले यांनी सांगितले.

भेटीदरम्यान दोन्ही समित्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. या संवादातून शेतकरी हिताच्या योजनांना चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## शिक्षण मंदिरात अन्यायाची राख

# ६३ महिन्यांच्या वेतनासाठी स्व. बापुरावजी देशमुख अभियांत्रिकीतील कर्मचारी रस्त्यावर

**वर्धा । जनमाध्यम :** शिक्षणाच्या मंदिरातच अन्यायाचा कर्कश आवाज घुमू लागला आहे. सेवाग्राम येथील स्व. बापुरावजी देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालय येथे तब्बल ६३ महिन्यांचे वेतन थकीत असल्याने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी (दि. १३) प्राचार्यांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन छेडत व्यवस्थापनाविरोधात संताप व्यक्त केला. पाच वर्षांहून अधिक काळ पगारच नाही, आम्ही जगायचे कसे असा प्रश्न आंदोलकांनी केला.

आधीच स्व. बापुरावजी देशमुख सुतगिरणी कर्जाच्या ओझ्याखाली जाऊन जिल्हा मध्यवर्ती बँकेने ताब्यात घेतली आहे. त्यातच अभियांत्रिकी महाविद्यालयावर सुमारे ७० कोटींचा आर्थिक बोजा असल्याची चर्चा रंगलेली असताना कर्मचाऱ्यांचे तब्बल ६३ महिन्यांचे वेतन थकीत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

महाविद्यालयातील सुमारे १२० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन रखडले असून हा प्रश्न न्यायालयातही पोहोचला आहे. न्यायालयाने व्यवस्थापन समितीला वेतन अदा करण्याच्या सूचना दिल्या असल्याचे सांगितले जाते.

मात्र त्या आदेशांकडे व्यवस्थापनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. १२ फेब्रुवारीपर्यंत वेतन द्या, अशी स्पष्ट मागणी कर्मचाऱ्यांनी केली होती. परंतु मुदत उलटून गेल्यानंतरही एक पैसाही न मिळाल्याने संतप्त कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी प्राचार्यांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले. हातात निवेदन, डोळ्यांत संताप आणि ओठांवर 'हक्काचा पगार द्या'च्या घोषणा असे चित्र महाविद्यालय परिसरात पाहायला मिळाले. घर चालवणे कठीण झाले आहे. बँकेचे हप्ते थकले, मुलांच्या शिक्षणावर परिणाम झाला. पाच वर्षे वेतन न देणे हा सरळसरळ अन्याय आहे, असा रोखठोक आरोप कर्मचाऱ्यांनी केला. वेतनप्रश्न तातडीने न सोडविल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

## हातगाडीवाल्यांना अर्थसाहाय्याचा हात

# प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना अंतर्गत कर्जवाटप

**वर्धा । जनमाध्यम :** रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या हातगाड्यांवर केवळ भाजीपाला, फळे किंवा चहाचे कप नसतात, तिथे असतात कुटुंबाची स्वप्ने, मुलांच्या शिक्षणाची आशा आणि उद्याच्या उजेडाची आस. अशा हजारो पथविक्रेत्यांच्या आयुष्यात आत्मविश्वासाचा नवा किरण उजळवणाऱ्या प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना अंतर्गत वर्धा येथे कर्जवाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

नगर परिषद वर्धाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात १५ लाभार्थींना व्यवसायासाठी कर्ज वितरित करण्यात आले. नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, अग्रणी बँकेचे व्यवस्थापक चेतन शिरभाते, महिला व बालकल्याण सभापती स्नेहा आकरे, उपसभापती मेघना त्रीमले तसेच युनियन बँकेचे व्यवस्थापक गौरव भगत यांची प्रमुख उपस्थिती लाभार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली.या योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात १५ हजार, दुसऱ्या टप्प्यात २५ हजार आणि तिसऱ्या टप्प्यात ५० हजार रुपयांचे कर्ज दिले जाते. नियमित परतफेड करणाऱ्यांना पुढील टप्प्याचे कर्ज मिळते, ही बाब पथविक्रेत्यांसाठी विश्वासार्ह ठरली आहे.


### नावात बदल

माझे पूर्वी **ZEENATUNNISA ABDUL RAUF SIDDIQUI** असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन आधार कार्ड वरील **ZINAT GULAM MUSTAFA SHEIKH** हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता:**हनुमान नगर वर्धा ४४२००१

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# राज्यातील 19 वैद्यकीय महाविद्यालये अतिरिक्त अधिष्ठात्यांच्या भरवशावर

## ■ वैद्यकीय महाविद्यालये गंभीर प्रशासकीय संकटात
## ■ वैद्यकीय वर्तुळात संताप व्यक्त



**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यातील एकूण ३७ महाविद्यालयांपैकी १९ संस्थांचा कारभार कायमस्वरूपी अधिष्ठाता नसल्याने अतिरिक्त पदभारावर चालवला जात आहे. या रिक्त जागा भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) आखलेला मुलाखतींचा कार्यक्रम ऐनवेळी गुंडाळल्याने वैद्यकीय वर्तुळात संताप व्यक्त होत आहे. ११ ते १६ फेब्रुवारीदरम्यान होणा-या या मुलाखती पुढे ढकलून आयोगाने राज्यातील वैद्यकीय शिक्षणाला जणू वेटिंगवर ठेवले आहे.

चंद्रपूर, गडचिरोलीसारखी दुर्गम भागातील महाविद्यालये असोत की नागपूर सगळीकडे प्रभारी राज सुरू आहे. सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, लातूर, जळगाव, सिंधुदुर्ग यासारख्या मोठ्या जिल्ह्यांमधील नाही. महाविद्यालयांनाही पूर्णवेळ अधिष्ठाता कायमस्वरूपी नसल्याने धोरणात्मक निर्णय घेणे, अधिकारी नवीन साधनसामग्रीची खरेदी आणि कर्मचा-यांवरील नियंत्रण यावर मर्यादा येतात. यावर वेळोवेळी आक्षेप घेण्यात आल्याने एमपीएससीने ६४ पात्र उमेदवारांच्या मुलाखती ११ ते १३ आणि १६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर कार्यालयात आयोजित केल्या होत्या. मात्र, मुलाखतीच्या एक दिवसापूर्वी ११ फेब्रुवारी रोजी आयोगाने अचानक पत्र काढत प्रशासकीय कारण देत मुलाखती अनिश्चित काळासाठी पुढे ढकलल्या. पुढील तारखा जाहीर न केल्याने उमेदवारांमध्ये संतापाची भावना आहे.

**चार दिवसांत ६४ उमेदवारांच्या मुलाखती-** उपलब्ध माहितीनुसार, ११ तारखेला १७, १२ व १३ तारखेला प्रत्येकी १६ आणि १६ तारखेला १५, अशा एकूण चार दिवसांत ६४ उमेदवारांच्या मुलाखती होणार होत्या. यातील अनेकांनी मुंबईला जाण्यासाठी रेल्वे आरक्षण केले होते. मात्र, एक दिवस आधी मुलाखती पुढे ढकलण्याचा निर्णय जाहीर झाल्याने बहुसंख्य उमेदवारांचे आर्थिक नुकसान झाल्याची माहिती समोर येत आहे.

**प्रभारी अधिष्ठात्यांसमोर अडचणींचा डोंगर-** अतिरिक्त कार्यभार असलेल्या अधिष्ठातांची मूळ विभागाचे कामकाज सांभाळून संपूर्ण महाविद्यालयाचा प्रशासकीय गाडा ओढताना दमछाक होत आहे. कायमस्वरूपी अधिकार नसल्याने नॅशनल मेडिकल कमिशनच्या (एनएमसी) निकषांची पूर्तता करणे कठीण जाते. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर आणि रुग्णांच्या सेवेवर होत असल्याचे काहींचे म्हणणे आहे.

# परमबीर सिंगांची कसून चौकशी करा

## ■ अनिल देशमुख यांची मागणी
## ■ अँटिलियासमोर स्फोटक प्रकरण



**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी माजी पोलिस आयुक्तपरमबीर सिंग यांच्यावर जोरदार टीका केली. मी गृहमंत्री असताना माझ्यावर खोटे आरोप करून बदनाम करण्याचे षडयंत्र ज्याने रचले तेच आज आरोपीच्या पिंज-यात आहेत.देशमुखांनी सांगितले की, लीलावती रुग्णालयातील ट्रस्टी आणि डाक्टरांनी परमबीर सिंग यांच्याविरोधात गंभीर स्वरूपाचे आरोप केले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, बढतीच्या आमिषाने अनेक डाक्टरांकडून प्रत्येकी २५ लाख रुपये उकळण्याचा प्रकार सुरू होता. या कथित गैरप्रकारांमुळे आणि गैरवर्तनामुळे रुग्णालय प्रशासनाने त्यांना पदावरून काढून टाकल्याचे देशमुखांनी नमूद केले. या घडामोडींमुळे सिंग यांच्या वागणुकीबाबत अनेक प्रश्न निर्माण झाल्याचेही त्यांनी म्हटले. माजी गृहमंत्र्यांनी पुढे अँटिलिया प्रकरणाचा उल्लेख करत सांगितले की, उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या निवासस्थान अँटिलियाबाहेर स्फोटकासारखी वस्तू आढळल्यानंतर तपासाच्या दिशेबाबत शंका निर्माण झाल्या होत्या. त्या वेळी तत्कालीन पोलिस आयुक्त म्हणून परमबीर सिंग सरकारची दिशाभूल करत असल्याचा संशय आल्याने तपास त्यांच्या हातातून काढून दहशतवादविरोधी पथक यांच्याकडे सोपवण्यात आला, असे देशमुखांनी स्पष्ट केले. एटीएसच्या तपासातून काही गंभीर संकेत समोर आले होते, असा दावा करत देशमुख म्हणाले की, या प्रकरणात सिंग यांची भूमिका संशयास्पद वाटल्याने त्यांची कमी महत्त्वाच्या पदावर बदली करण्यात आली. पुढे शासकीय सेवेतून त्यांना दूर करण्याची कारवाईही करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. या सर्व निर्णयांचा संदर्भ त्या वेळच्या तपासातील निष्कर्षांशी जोडला गेला होता, असे देशमुखांचे म्हणणे आहे. देशमुखांनी १०० कोटी रुपयांच्या कथित आरोपांचा उल्लेख करत सांगितले की, ही कारवाई टाळण्यासाठी माझ्यावर खोटे आरोप लावण्यात आले. आरोप होताच स्वतः चौकशीची मागणी केल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती चांदीवाल यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती. या समितीसमोर हजर राहण्याचे समन्स बजावूनही सिंग वारंवार गैरहजर राहिल्याचा आरोप त्यांनी केला.

**अटकेच्या भीतीने सिंग काही काळ फरार-** सहा वेळा समन्स बजावूनही अटकेच्या भीतीने सिंग काही काळ फरार होते. शेवटी वकिलामार्फत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात अनिल देशमुखांविरुद्ध कोणताही ठोस पुरावा नाही, असे मान्य केल्याचा दावा त्यांनी केला. या घटनाक्रमामुळे१०० कोटींच्या आरोपांची विश्वासार्हता उरली नसल्याचे देशमुख म्हणाले. या पार्श्वभूमीवर लीलावती रुग्णालयातील घडामोडींचा उल्लेख करत देशमुखांनी संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी केली. भ्रष्ट आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या अधिका-याचे रुग्णालयातील कथित कारनामे गंभीर आहेत. याबाबत सत्य बाहेर यावे, असे ते म्हणाले. पत्रकार परिषदेत त्यांनी या सर्व घटनांचा परस्परसंबंध मांडत, जनतेसमोर सत्य येण्याची गरज अधोरेखित केली.

# एक देश-एक निवडणुकीमुळे मतदारांचे अधिकार प्रभावित होणार नाहीत

## जेपीसीच्या बैठकीत माजी सीजेआय बीआर गवई यांची माहिती



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती बीआर गवई यांनी एक देश, एक निवडणूक यावर प्रतिक्रिया दिली असून म्हणाले की, एक देश, एक निवडणुकीमुळे मतदारांच्या अधिकारांवर परिणाम होणार नाही आणि संघराज्यीय संरचनेवरही कोणताही परिणाम होणार नाही. माजी सरन्यायाधीशांनी एक देश, एक निवडणूक यावर झालेल्या संयुक्त संसदीय समितीच्या बैठकीत हे सांगितले. त्यांनी असा युक्तिवाद केला की, संविधानानुसार आवश्यक असल्याप्रमाणे, निवडणुका एकाच वेळी घेण्यासाठी असा बदल (दुरुस्ती) लागू करण्याची शक्ती संसदेला आहे. एक देश, एक निवडणूक संदर्भात जेपीसी अंतिम निष्कर्षाच्या जवळ आहे. अनेक मीडिया रिपोर्ट्सनी दावा केला आहे की एक देश, एक निवडणूक वरील जेपीसीचा अहवाल मार्चच्या अखेरीस येउ शकतो. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बैठकीत हा मुद्दा उपस्थित झाला की, संविधान नागरिकांना ५ वर्षांच्या पूर्ण कार्यकाळासाठी सरकार निवडण्याचा अधिकार देतो. जर सरकार मध्येच कोसळले आणि उर्वरित कालावधीसाठी निवडणुका झाल्या नाहीत, तर यामुळे मतदारांच्या अधिकारांवर परिणाम होईल का? असे मानले जात आहे की, गवई यांनी समितीसमोर सांगितले की, संविधान (१२९ वी सुधारणा) विधेयक, २०२४ पूर्णपणे संवैधानिक कक्षेत आहे. सूत्रांनी सांगितले की, एका सदस्याने सरकारच्या जबाबदारीबद्दल प्रश्न उपस्थित केला. यावर गवई म्हणाले की, अविश्वास प्रस्तावासारखी संवैधानिक साधने तशीच राहतील. जर कोणत्याही सरकारकडे बहुमत नसेल, तर त्यांना पद सोडावे लागेल.

# महाराष्ट्रातील सुमारे 2 लाख शेतकरी किसान हप्त्यापासून वंचित राहणार

## आधार लिंक नसल्याची दिली मंत्रालयाने माहिती



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या २२ व्या हप्त्याची वाट पाहणा-या शेतक-यांसाठी महत्वाची माहिती आहे. मंत्रालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, देशभरातील ३,०१८,३६१ शेतक-यांची बँक खाती ६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत त्यांच्या आधारशी लिंक केलेली नाहीत. या शेतक-यांच्या खात्यात पंतप्रधान किसान योजनेचा २२ वा हप्ता जमा होणार नाही.

तुमचे बँक खाते आधारशी लिंक करणे अनिवार्य आहे, अन्यथा तुम्हाला पीएम किसान योजनेचा २२ वा हप्ता मिळणार नाही. मंत्रालयाने शेतक-यांची राज्यवार यादी जारी केली आहे. यादीनुसार, सर्वाधिक उत्तर प्रदेशातील सुमारे १० लाख शेतक-यांची बँक खाती आधारशी लिंक केलेली नाहीत. तर महाराष्ट्रातील १,७२,३४८ शेतक-यांनी आधार लिंक केलेले नाही.

**बँक खाते आधारशी कसे लिंक करायचे?** तुमचे बँक खाते आधारशी लिंक करण्यासाठी तुम्ही ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही पद्धती वापरू शकता.

**ऑनलाइन पद्धत-** तुमच्या बँकेच्या नेटबँकिंग वेबसाइटवर लाग इन करा. तुम्हाला तेथे आधार सीडिंग किंवा आधार अपडेट करण्याचा पर्याय मिळेल. बँकेच्या मोबाइल ॲपवर लाग इन करा आणि आधार लिंकिंग पर्याय निवडा.

**काही बँका यूआयडीएआय पोर्टलद्वारे आधार लिंकिंग देखील देतात.**

**ऑफलाइन पद्धत-** तुमच्या बँकेच्या शाखेला भेट द्या आणि तुमचे आधार कार्ड आणि पासबुक/खाते तपशील दाखवा. बँकेने दिलेला आधार लिंकिंग फार्म भरा आणि सबमिट करा. काही बँका एसएमएस किंवा एटीएमद्वारे आधार लिंकिंग देखील देतात.

आधार लिंक करणे अनिवार्य नाही, परंतु सरकारी अनुदाने आणि फायदे थेट तुमच्या खात्यात मिळणे आवश्यक आहे. लिंक केल्यानंतर, तुम्हाला तुमच्या बँकेकडून एक पुष्टीकरण संदेश (एसएमएस/ईमेल) मिळेल.



# मुंढवा व्यवहार 2021 पासून अमेडियाच्या नियंत्रणात

**पुणे :** मुंढवा भूखंड व्यवहार २०२१ पासूनच पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीच्या नियंत्रणात होता. पण हे प्रकरण अंगाशी आल्यानंतर त्याची जबाबदारी माझ्यासारख्या मध्यस्थावर ढकलण्यात आली, असा दावा या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या शीतल तेजवानीने केल्याचा दावा आहे. पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीवर मुंढवा येथील १८०० कोटींची महार वतनाची जमीन अवघ्या ३०० कोटींत खरेदी केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी आरोपांची राळ उठल्यानंतर हा सौदा रद्दबातल करण्यात आला. नंतर या प्रकरणी शीतल तेजवानी यांच्यासह अन्य एका कथित आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या पार्श्वभूमीवर विजय कुंभार यांनी शीतल तेजवानीचा दाखला देत या प्रकरणाचा सर्व व्यवहार २०२१ पासूनच पार्थ पवारांच्या अमेडिया कंपनीच्या नियंत्रणाखाली होता असा दावा केला आहे.

**प्रकरण अंगाशी आल्यानंतर माझ्यावर जबाबदारी लोटली : शीतल तेजवानी**

माझ्याविरुद्धचे प्रकरण म्हणजे अंगाशी आल्यानंतर आखलेला सुटकेचा डाव आहे. ती म्हणते, २०२१ पासून हा व्यवहार अमेडीयाच्या नियंत्रणात होता. २०२१ ची प?वर ऑफ अटर्नी सर्व पक्षांना पूर्ण माहिती असताना करण्यात आली. प्रकरणातील महत्त्वाची कागदपत्रे जाणीवपूर्वक दडवण्यात आली आहेत. माध्यमांमध्ये बातम्या आल्यानंतर दस्त रद्द दावा दाखल करण्यात आला. व्यवहार धोकादायक ठरल्यानंतर जबाबदारी माझ्यासारख्या मध्यस्थावर ढकलण्याचा प्रयत्न होतोय. २०२१ च्या पीवोए पासूनच पार्थ पवार यांना वस्तुस्थिती माहिती होती.

# लाचखोर सरकारच्या अब्रुची लक्तरे वेशीवर

## *मंत्री नरहरी झिरवाळ यांनी निष्पक्ष चौकशीसाठी तात्काळ राजीनामा द्यावा काँग्रेसची मागणी*



मुंबई : राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लाचखोरीच्या घटनेमुळे राज्य सरकारच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगल्या गेल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. या घटनेच्या निष्पक्ष चौकशीसाठी त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.

मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कारकून राजेंद्र ढेरंगे यांना ५० हजार रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने अटक केली आहे. चक्क मंत्रालयात लाचखोरीची ही घटना घडल्यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ माजली आहे. मंत्री झिरवाळ यांनी या प्रकरणाशी आपला संबंध आढळला तर आपण तात्काळ राजीनामा देउ अशी भूमिका स्पष्ट केली आहे. पण राजेंद्र ढेरंगे यांनी झिरवाळ यांचे स्विय सहाय्यक रामदास गाडे यांच्या सूचनेनुसारच ही लाच घेतल्याचा दावा केला आहे. यामुळे झिरवाळ यांच्या अडचणींत वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

**लाच स्वीकारण्याची वरिष्ठांची मागणी**

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री, नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील कर्मचा-याला मंत्रालयात लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यामुळे लाचलुचपत विभागाने मंत्री कार्यालय सील केले आहे. या घटनेने राज्य सरकारच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. चौकशीदरम्यान वरिष्ठांच्या सांगण्यावरून लाच घेतल्याचे या कर्मचा-याने सांगितल्याची माहिती समोर येत आहे. हे आणखी धक्कादायक आणि गंभीर आहे. त्यामुळे मंत्री झिरवाळ यांच्यासह त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठ अधिका-यांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. मात्र नैतिक जबाबदारीच्या दृष्टीने, आपल्या कार्याल नरहरी झिरवाळ यांनी नवी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना या प्रकरणी आपली बाजू स्पष्ट केली आहे. ते म्हणाले, काल घडलेला प्रकार साफ चुकीचा आहे. असे व्हायला नको होते. काल ज्यांना पकडण्यात आले, ते क्लार्क म्हणून काम करतात. ते मूळचे अन्न व पाणी पुरवठा विभागाचे आहेत. त्यांना उसणवारीवर घेतले होते. मी या प्रकाराला पाठिशी घालणार नाही. शासकीय किंवा कायदेशीर बाब असेल त्याला त्याचा जाब द्यावा लागेल, असे ते म्हणाले.

**आरोपी ढेरंगेला १६ तारखेपर्यंत पोलिस कोठडी**

लाचखोर क्लार्क राजेंद्र ढेरंगे याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आज कोर्टापुढे हजर केले. तिथे कोर्टाने त्याची १६ तारखेपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी केली आहे. मंत्रालयातील अन्न व औषध प्रशासन विभागाशी संबंधित लाचप्रकरण उघडकीस आल्यानंतर राजकीय व प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळणारे नरहरी झिरवाळ यांनी आपली भूमिका स्पष्ट करत अनेक मुद्यांवर सविस्तर प्रतिक्रिया दिली. या प्रकरणाशी आपला कोणताही संबंध सिद्ध झाल्यास नैतिकतेच्या मुद्यावर तात्काळ राजीनामा देण्याची तयारी त्यांनी दर्शवली. जर माझी कोणतीही लिंक आढळली, तर पदावर राहण्याचा प्रश्नच नाही, असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले.

# बांगलादेशात 20 वर्षानंतर बीएनपी पक्षाला बहुमत

## तारिक रहमान होणार पंतप्रधान



**ढाका :** बांग्लादेशमध्ये झालेल्या निवडणुकीत बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीने दमदार कामगिरी करत बहुमताच्या दिशेने मोठी झेप घेतली आहे. जवळपास २० वर्षांनंतर बीएनपी पुन्हा सत्तेत येण्याची चिन्हे दिसत आहेत. बीएनपी आघाडीने २११ जागांवर विजय मिळवला आहे. २९९ मतदारसंघांपैकी २८७ ठिकाणी मतमोजणी पूर्ण झाली असून निकाल जवळपास स्पष्ट झाले आहेत. या निवडणुकीत माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या अवामी लीग पक्षाचा सहभाग नव्हता. त्यामुळे मुख्य लढत बीएनपी आणि जमात-ए-इस्लामी बांगलादेश यांच्यात झाली. बीएनपीच्या अध्यक्ष आणि माजी पंतप्रधान दिवंगत बेगम खालिदा झिया यांचे पुत्र तारिक रहमान यांनी आपल्या बोगुरा मतदारसंघातून विजय मिळवला आहे. त्यांना सुमारे २.१६ लाख मते मिळाली. त्यांच्या प्रमुख प्रतिस्पर्ध्याला जवळपास ९७ हजार मते मिळाली. बीएनपीने आधीच जाहीर केले होते की पक्ष सत्तेत आल्यास तारिक रहमान यांनाच पंतप्रधानपद दिले जाईल. त्यामुळे त्यांचा पंतप्रधान होण्याचा मार्ग आता मोकळा झाल्याचे मानले जात आहे. तारिक रहमान यांचा जन्म २० नोव्हेंबर १९६५ रोजी बांगलादेशची राजधानी ढाका येथे झाला. ६० वर्षीय तारिक यांच्या आई बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया आहेत आणि त्यांचे वडील माजी राष्ट्रपती झियाउर रहमान आहेत. त्यांनी १९९० मध्ये राजकारणात प्रवेश केला. २००१ ते २००७ दरम्यान ते पक्षात खूप प्रभावशाली बनले. तारिक रहमान हे पडद्यामागे काम करणारे नेते म्हणून ओळखले जात होते, ज्यामुळे त्यांना डार्क प्रिन्स असे टोपणनाव मिळाले. २००७ मध्ये त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप करण्यात आले आणि त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. नंतर ते उपचारांसाठी लंडनला गेले.

# ‘एस-400’ साठी रशियासोबत 10 हजार कोटींचा करार

## पाकला दूरच रोखणार



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** संरक्षण मंत्रालयाच्या संरक्षण अधिग्रहण परिषदेने गुरुवारी अनेक प्रमुख संरक्षण करारांना मंजुरी दिली असून यामध्ये फ्रान्सकडून ११४ राफेल लढाउ विमाने खरेदी करणे आणि इतर अनेक निर्णयांचा समावेश होता. यानंतर लागलीच जगातील सर्वात प्रगत हवाई संरक्षण प्रणाली, एस-४०० बाबतही एक मोठा निर्णय घेण्यात आला. भारताने रशियाकडून एस-४०० प्रणालीसाठी १०,००० कोटी खर्चाच्या २८८ क्षेपणास्त्रांच्या खरेदीला मान्यता दिली आहे. गेल्या वर्षी ऑपरेशन सिंदूर दरम्यान जगाने एस-४०० ची शक्ती पाहिली. या क्षेपणास्त्रांच्या खरेदीमुळे एस-४०० च्या क्षमता आणखी धारदार होतील. बैठकीत अमेरिकेकडून सहा पी-८आय टोही विमानांच्या खरेदीलाही मान्यता देण्यात आली, हा करार सुमारे ३०,००० कोटींचा असल्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षीच्या ऑपरेशन सिंदूर दरम्यान, पाकिस्तानी विमानांवर आणि लक्ष्यांवर असंख्य एस-४०० क्षेपणास्त्रे डागण्यात आली होती. त्यामुळे, स्ट्रायटममध्ये घट झाली आहे. त्यामुळे, ही उणीव भरून काढण्यासाठी हा करार मंजूर करण्यात आला आहे. एस-४०० शस्त्रागारात लांब आणि लहान पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांची संख्या वाढवण्याचे लष्कराचे उद्दिष्ट आहे. गुरुवारी दिलेल्या मंजुरीसह, १२० कामी पल्याच आणि १६८ लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रे खरेदी केली जातील. ही खरेदी जलदगतीने केली जाईल. सरकारची मंजुरी अशा वेळी आली आहे जेव्हा भारताला या वर्षी जून आणि नोव्हेंबरमध्ये रशियाकडून एस-४०० क्षेपणास्त्र प्रणालीचे दोन स्क्वॅड्रन मिळतील.

**आणखी ५ एस-४०० स्क्वॅड्रनची तयारी-** रशियाकडून पँटसिर शॉर्ट-रेंज सिस्टम खरेदी करण्याबाबतही लष्कर चर्चा करत आहे. जर हा करार झाला तर भविष्यात भारताकडे १० एस-४०० स्क्वॅड्रन असतील, एस-४०० आणि पँटसिर क्षेपणास्त्र प्रणाली दोन-स्तरीय संरक्षण प्रणाली तयार करतील. पँटसिर संरक्षण प्रणाली कामिकाझे ड्रोनपासून संरक्षण करते. संरक्षणमंत्र्यांनी अंदाजे ३.६० लाख कोटी किमतीच्या संरक्षण प्रस्तावांना मंजुरी दिली.

**पाक हलवावा लागला तळ-** अहवालानुसार, एस-४०० साठी खरेदी केल्या जाणा-या क्षेपणास्त्रांमध्ये ४०० किमी, २०० किमी, १५० किमी आणि ४० किमीच्या पल्ल्याची क्षेपणास्त्रे असतील. ही सर्व जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे असतील. ऑपरेशन सिंदूर दरम्यान एस-४०० च्या क्षेपणास्त्रांनी ३१४ किमी खोलवर हल्ला केला. यामुळे पाकिस्तानला रावळपिंडी येथून आपला हवाई तळ हलवावा लागला.

# भारतीय पोलिस सेवेत सर्वाधिक ओबीसी, एससी, एसटी




## ● सरकारने जारी केली आकडेवारी
## ● 5 वर्षांत कशा पध्दतीने झाली पदभरती?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत आयएएस, आयपीएस आणि आयएफएस या देशातील सर्वाधिक प्रतिष्ठित सेवांमध्ये नोकरभरती केली जाते. याद्वारे गेल्या पाच वर्षांत(२०२० ते २०२४) आरक्षित वर्गातील किती उमेदवारांची नियुक्ती झाली? याबाबतची माहिती समोर आली आहे. सरकारने संसदेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार, ओबीसी, एससी आणि एसटी वर्गातील सर्वाधिक उमेदवारांची नियुक्ती भारतीय पोलिस सेवामध्ये झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्यसभेत कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि पेन्शन मंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. जितेंद्र सिंह यांनी लेखी उत्तराद्वारे दिलेल्या माहितीनुसार, यूपीएससी नागरी सेवा परीक्षा २०२० ते २०२४ या कालावधीत थेट भरतीद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. या आकडेवारीनुसार, आयएएस आणि आयएफएसच्या तुलनेत आयपीएसमध्ये आरक्षित वर्गातील उमेदवारांची संख्या अधिक आहे. दरम्यान, यूपीएससीमार्फत जाहीर होणा-या रिक्तपदांच्या संख्येत सातत्याने घट होत असल्याचेही समोर आले आहे. २०२४ : १,०५६ पदे, २०२५ : ९७९ पदे, २०२६ : फक्त९३३ पदे. गेल्या तीन वर्षांत जाहिरातीत येणा-या पदांची संख्या कमी होत असल्याने उमेदवारांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

**कशी आहे आकडेवारी?**

**आयएएस (भारतीय प्रशासकीय सेवा)**
ओबीसी : 245
एससी : 135
एसटी : 67

**आयपीएस(भारतीय पोलिस सेवा)**
ओबीसी : 255
एससी : 141
एसटी : 71

**आयएफएस (भारतीय वन सेवा)**
ओबीसी : 231
एससी : 95
एसटी : 48

**एकूण तीनही सेवांमध्ये**
**ओबीसी** : 731 उमेदवार
एससी : 371 उमेदवार
एसटी : 186 उमेदवार

**रिक्त पदांची स्थिती**

1 जानेवारी 2025 पर्यंतच्या सिव्हिल लिस्टनुसार सेवांमधील रिक्त पदांची स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

आयएएस
मंजूर पदे : 6,877
रिक्त पदे : 1,300

आयपीएस
मंजूर पदे : 5,099
रिक्त पदे : 505

आयएफएस
मंजूर पदे : 3,193
रिक्त पदे : 1,029

सर्वाधिक रिक्त पदे भारतीय वन सेवामध्ये असून त्यानंतर आयएएस आणि आयपीएसचा क्रम लागतो.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## एकत्रिकरणाचे चित्र

२८ जानेवारीच्या सकाळी बारामतीत दुर्दैवी विमान अपघात झाला नसता, त्यात अजितदादा पवार यांचे निधन झाले नसते, तर आज कदाचित सर्व वृत्तपत्रांत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रिकरणाच्या बातम्यांचे मथळे असते. 'कदाचित' म्हणण्याचे कारण एवढेच, की दिशा निश्चित होती; पण प्रक्रियेचे तपशील ठरत होते. दोन्ही राष्ट्रवादी एकमेकांविरोधात सर्वोच्च न्यायालयात पोहोचले असल्याने काही तांत्रिक बाबी आडव्या येऊ शकल्या असत्या. शिवाय, राजकीय घडामोडींत कधी कोणते फाटे फुटतील, हे सांगता येत नसते. त्यामुळे, एखादी गोष्ट प्रत्यक्ष घडत नाही, तोपर्यंत त्याबाबत खात्रीने बोलण्याला काही अर्थ नसतो. 'घड्याळ'वाल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे काही नेते 'अशी काही चर्चा सुरू असल्याचे आम्हाला माहीत नव्हते. तसे असते, तर दादा आमच्याशी बोलले असते' असे सुरुवातीला म्हणाले. पण, त्यानंतर संबंधितांकडून चर्चेच्या फेऱ्यांचे अनेक तपशील, चित्रफितीच दाखवल्या गेल्याने या नेत्यांकडून पुन्हा तशा प्रकारचे वक्तव्य झाले नाही. आता उघड झालेल्या एकूण तपशिलावरून अशी चर्चा सुरू होती आणि खुद्द अजितदादाच त्यासाठी आग्रही होते, असे दिसते. या चर्चेतील खाचाखोचा ते आपल्या पक्षातील सहकाऱ्यांना किती सांगत असतील, हा प्रश्न आहे. कारण, ज्यांच्या आग्रहाखातर दादा वेगळे झाले, त्या बहुतेक सगळ्या नेत्यांचा दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाला विरोध होता, हे त्यांनाही माहीत होते. त्यांचा तो विरोध आजही दिसतो आहेच. या विरोधाला काही तात्त्विक, वैचारिक आधार आहे, असे नाही. शुद्ध व्यावहारिक आहे. अजितदादांच्या वारसदारांना याची व्यवस्थित कल्पना आहे. सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्री म्हणून निवड, पदग्रहणापूर्वीचे सोपस्कार, दिल्ली भेटीसाठीचा आग्रह या वारसदारांना समजत नाही, असे नाही. पण, आत्ताच काही भूमिका जाहीर करण्याची गरज नाही. सगळ्यांचे ऐकून, प्रत्येकाची पावले कुठे पडतात हे नीट समजावून घेऊन मगच आपली भूमिका स्पष्ट करण्याचे त्यांनी ठरवले असावे. कुठेही काहीही न बोलता सरकारमधील, पक्षातील; अगदी पक्ष संघटनेतील घडी बसवण्याला त्यांनी प्राधान्य दिलेले दिसते. आजच्या घडीला हेच धोरण योग्य आहे. अजितदादांचे वारसदार नवखे किंवा अपरिपक्व आहेत, त्यांना आपल्यालाच पुढे घेऊन जायचं आहे, असा समज कोणी करून घेतला असेल, तर त्यांना लवकरच ठेच लागण्याची शक्यता यावरून दिसते. दोन राष्ट्रवादी वेगळ्या झाल्या, तेव्हांही त्याबाबतच्या चर्चा वेगवेगळ्या पातळ्यांवर कितीतरी दिवस सुरू होत्या. तेव्हांही पक्षात आणि पवार कुटुंबात अशा दोन्ही आघाड्यांवर स्वतंत्रपणे बोलणी होत होती. दोन्ही बाजूला अग्रभागी पवार कुटुंबातील व्यक्तीच असल्याने साहजिकच त्यावेळीही 'केवळ पक्षात फूट, की कुटुंबात दरी?' अशा प्रकारच्या चर्चा झाल्या होत्या. भारतीय जनता पक्षाबरोबर जाण्यासाठी जे आग्रही होते, त्यातील प्रत्येकाची त्या आग्रहामागे वेगवेगळी कारणे होती. त्याची चर्चाही त्यानंतर पुष्कळ झाली होती. पण, तो निर्णय घेण्याच्या काळात स्वतः अजितदादा किती तणावात होते, याची कल्पना भारतीय जनता पक्षातील वरिष्ठ नेत्यांसह राजकीय वर्तुळालाही आहे. दोन राष्ट्रवादी स्वतंत्र झाल्यानंतरही सुरुवातीचे काही महिने सोडले, तर नंतर दोन्ही बाजूंनी परस्परांवरचे वार थांबले होते. विधिमंडळाच्या अधिवेशन काळात दोन्ही पक्षांचे नेते आणि आमदार किती समन्वयाने वावरायचे, हे तर जगजाहीर आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दोन्ही पक्षांनी अनेक ठिकाणी आघाडी करण्याचा निर्णय घेतला होता. राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिल्लीत शहा यांची भेट घेऊन त्यांना त्याची कल्पनाही दिली होती. भाजपसारख्या तगड्या पक्षाच्या युतीत असताना त्यांच्या संमतीशिवाय असा काही निर्णय कोणी पक्ष परस्पर घेईल, हे संभवत नाही. म्हणजे, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने केलेली निवडणूक आघाडी ही भाजपला पूर्ण अवगत होती आणि त्यांची त्याला मूळ संमती होती, असं मानायला जागा आहे. भाजपचं केंद्रीय नेतृत्व राजकीय परिणामांचा विचार केल्याशिवाय आणि एखाद्या राजकीय घडामोडीचं पूर्ण तार्किक चित्र स्पष्ट असल्याशिवाय गाफीलपणे परवानगी देणंही शक्य वाटत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसमधील घडामोडींची माहिती महायुतीतल्या अन्य पक्षांच्या वरिष्ठ वर्तुळात असणार असा निष्कर्ष यावरूनच काढला जातो आहे. राष्ट्रवादीतल्या नेत्यांनी याही गोष्टीचा विचार उघड वक्तव्य करण्याआधी करायला हवा. अर्थात याविषयी आता कोणी उघड कबुली देण्याचा किंवा दुजोरा देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कारण, त्या अपघाताने सर्व समीकरणंच बदलून गेली आहेत. एकत्रिकरणाचा विचार करणारे आपापला विचार करताहेत; पण हे एकत्रिकरण ज्या राजकीय चित्राचा भाग होतं, त्या चित्रातल्या अनेक घटकांची आताच्या घडीची गरज, सोय काय आहे, याचा विचार कोणी करतं आहे, असं दिसत नाही. सुनेत्रा पवार यांच्या दिल्ली भेटीतही या विषयावर चर्चा झाल्याचं काही ठिकाणी प्रसिद्ध झालं आहे. त्याचे तपशील एक - दोन दिवसात कळतील. जर चर्चा झालीच असेल, तर बदललेल्या परिस्थितीत भाजपची भूमिका काय आहे, त्यांचा कल कुठे आहे, हे तिथे उपस्थित असलेल्यांना कळलंच असेल. राष्ट्रवादीतले प्रमुख चार-पाच नेते या एकत्रिकरणाला जो विरोध करताहेत, त्याची दखल भाजप कशी घेणार आहे, यावरच या 'चर्चेतल्या एकत्रिकरणा'चं भवितव्य अवलंबून आहे. अजितदादा या एकत्रिकरणाला तयार होते, त्यामागे राजकीय कारणांपेक्षा भावनिक कारणं जास्त होती, असं म्हणतात. ती भावनिक कारणं त्यांच्या वारसांच्या दृष्टीने किती महत्त्वाची ठरतात, हा मुद्दा आहेच. शिवाय, ही प्रक्रिया नेटाने पुढे नेण्याएवढी तीव्र इच्छाशक्ती आता कुणाकडे असण्याचं कारण नाही, ही वस्तुस्थितीही लक्षात घ्यावी लागेल. आधी कुटुंब; मग पक्ष याच क्रमाने ही दुरुस्ती व्हायची तेव्हां होईल.

# एकतर्फी करारात कसले शेतकरी हित ?

**दीर्घकाळ अमलात येणारा व्यापार करार करताना, संबंधित वस्तू उत्पादन करणाऱ्या घटकांना विश्वासात घेऊन, त्यांची मते लक्षात घेऊन, नफा तोट्याचा अंदाज घेऊन तो करायला हवा. तसे भारत - अमेरिका व्यापार करारात काहीही झालेले नाही. त्यामुळे हा करार भारतीय शेतकऱ्यांच्या हिताचा असण्याबाबतच शंका आहे.**

अमेरिकेने भारतावर पन्नास टक्के शुल्क (टॅरिफ) आकारल्यावर असे वाटले होते, की भारतातून होणारी निर्यात ठप्प होईल. परंतु टॅरिफ लावल्यानंतर निर्यातीचे आकडे पाहिले, तर निर्यात घटण्याऐवजी २० टक्क्यांनी वाढली आहे. प्रसंग आल्यावर भारताने पर्यायो बाजारपेठ शोधायला सुरुवात केली तसेच ज्या मालावर आयात शुल्क वाढवले नव्हते त्याची अमेरिकेला निर्यात वाढवली. भारत आजही अनेक शेतीमाल आयात करतो. शेतीमालाची आयात ही आपल्यासाठी नवीन नाही.

भारताला लागणाऱ्या खाद्यतेलापैकी १७ अब्ज डॉलर किमतीचे ७० टक्के खाद्यतेल आपण आयात करतो. त्यापैकी फक्त ०.२७ टक्का तेल आपण अमेरिकेकडून घेतो. यात वाढ करता येईल. तसेच ४६ अब्ज डॉलरचे बदाम आयात होते, त्यापैकी २५.२० टक्के अमेरिकेतून, १.१३ अब्ज डॉलर किमतीच्या तेलबिया आयात करतो त्यापैकी २.७ टक्के अमेरिकेतून येतात. असे अनेक शेतीमाल भारत आयात करत आलेला आहे. त्यात मसाले, पिस्ता, साखर व चॉकलेट, कोको, मद्य, तंबाखू, डीडीजीएस आदींचा समावेश आहे. भारत शेतीमाल आयातीवर साधारणपणे वर्षाला ३६ अब्ज डॉलर खर्च करतो. देशातील महागाई नियंत्रित करण्यासाठी अनेक वेळा शून्य आयात कर आकारून सुद्धा आयात केली जाते. त्यात खाद्यतेल, कडधान्ये, धान्यांचा समावेश आहे. ताने उदाहरण मागील वर्षी आयात केलेल्या कापूस गाठींचे आहेच.

### तुलनात्मक फरक

अनेक वेळा असा मुद्दा उपस्थित केला जातो, की भारताचा छोटा शेतकरी अमेरिकेच्या बलाढ्य शेतकऱ्यांबरोबर स्पर्धा करू शकणार नाही. असे असले तरी भारत शेतीमाल निर्यात करत आहे, फक्त उत्पादनाचा दर्जा सुधारण्याची गरज आहे. युरोपं अमेरिकेच्या शुद्धता चाचण्या पार कराव्या लागतील. हे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी करून दाखविले आहे, ज्या पिकात सर्वात जास्त कीडनाशकांचा, रासायनिक खतांचा व संप्रेरकांचा वापर केला जातो, त्याचेही अवशेषमुक्त उत्पादन देशातील शेतकरी घेत आहेत. अशा वेळी प्रश्न राहतो शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अनुदानातील फरकाचा! बीज, पाणी, रस्ते या सर्व पायाभूत सुविधा अमेरिकेतील शेतीला आहेत. त्याचबरोबर अमेरिकेत शेतकऱ्यांना थेट अनुदान दिले जाते. उत्पादनात घट, बाजारभावात तूट, नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई, विमा संरक्षण अशा वेगवेगळ्या प्रकारे तेथील शेतकऱ्यांना थेट अनुदान दिले जाते. अमेरिकेतील १.०४ दशलक्ष शेतकऱ्यांना २०२५ या वर्षात, ४२.४ कोटी डॉलर अनुदान दिले गेले. भारतातील शेतकऱ्यांना रासायनिक खते, वीज, पाणी, किसान सन्मान योजना, एमएसपी (किमान आधारभूत किंमत) प्रमाणे खरेदी अशा विविध प्रकारे अनुदान दिले जाते. भारतातील १११ दशलक्ष शेतकऱ्यांना ५७.५ कोटी डॉलर अनुदान दिले जाते. अमेरिकेच्या तुलनेत ही रक्कम फारच कमी आहे. त्यातील बरीच रक्कम



मधली नोकरशाहीची साखळीच फस्त करून जाते. अशा परिस्थितीत भारत अमेरिकेच्या तिजोरीशी स्पर्धा करू शकत नाही. अमेरिकेतल्या शेतकऱ्यांना बाजारभाव पडण्याची फार चिंता नाही व अमेरिका हा अतिरिक्त माल भारताच्या बाजारपेठेत स्वस्तात विकू शकते (डंप करू शकते). समतल जमीन असल्याशिवाय स्पर्धा होणे मुश्किल आहे.

### काय करता येईल?

ज्या परिस्थितीत हा करार होत आहे, ती अनेक संशयाचे बाग निर्माण करणारी आहे. असा एकतर्फी करार मान्य केला जाऊ नये. दीर्घ काळ अमलात येणारा व्यापार करार करताना, संबंधित वस्तू उत्पादन करणाऱ्या घटकांना विश्वासात घेऊन, त्यांची मते लक्षात घेऊन, नफा तोटपाचा अंदाज घेऊन तो करायला हवा. तसे भारत अमेरिका व्यापार करारात काहीही झालेले नाही. त्यामुळे हा करार भारतीय शेतकऱ्यांच्या हिताचा असण्याबाबतच शंका आहे. सर्व वस्तूंवर शून्य आयात कर आकारणे अन्यायकारक ठरेल. पीकनिहाय, वस्तुनिहाय, नफा तोट्याचा विचार करून अंतिम करार व्हायला हवेत. जीएम पिकांपासून तयार झालेली उत्पादने जर आयात होणार असतील तर भारतातील शेतकऱ्यांना सुद्धा जीएम तंत्रज्ञान वापरण्याची मुभा असली पाहिजे. भारतात जीएम पिकांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन सुरू होण्यास तीन चार वर्ष लागू शकतील, तोपर्यंत आयात कर आकारण्यात यावा, स्पर्धेत टिकण्यासाठी भारतातील शेतीमालाची उत्पादकता वाढवणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्याला अमेरिकेशी व्यापार करायचाच आहे तर एक तर्फी, दबावाखाली करार न करता, कराराशी संबंधित क्षेत्रातील जाणकारांना, तज्ज्ञांना विचारातघेऊन करार व्हायला हवा.

भारत हा कृषिप्रधान देश असला तरी भारताला कृषी धोरणच नाही. आयात निर्याती बायत निश्चितता नाही. अचानक कधी ही निर्यातबंदी, करमुक्त आयात साठ्यांवर मर्यादांचे तुघलकी फरमान काढले जातात. वायदे बाजारातून शेतीमाल वर्षानुवर्ष वगळला जातो.

ज्या पिकांच्या उत्पादन वाढीला प्रोत्साहन द्यायचे, त्यांना योग्य दर मिळेल याची व्यवस्था नाही. शेती अनुदानात प्रचंड भ्रष्टाचार होतो व

प्रत्यक्ष लाभार्थ्यांना कमी फायदा होतो. अशा अनेक समस्या कायमस्वरूपी सोडवायच्या असतील व भारतातील शेतकरी आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धाक्षम करायचा असेल तर देशाला दीर्घ मुदतीचे किंवा कायमस्वरूपी कृषी धोरण असायला हवे. देशातील प्रमुख शेतकरी संघटनांनी एकत्र बसून, भारतातील शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण ठरवायला हवे. जे मुद्दे वादग्रस्त असतील ते अर्थशास्त्र व विज्ञानाच्या कसोट्यांवर पासून स्वीकारायची तयारी ठेवली पाहिजे. केवळ विरोधासाठी विरोध ही भूमिका न ठेवता शेतकरी, ग्राहक व देशाचे हित लक्षात ठेवून कृषी धोरण ठरवायला हवे. हे करताना महत्त्वाचे म्हणजे सत्ताधारी किंवा विरोधक, कोणत्याही राजकीय गटाला आपल्या ताकदीचा वापर त्यांच्या राजकारणासाठी करता येऊ नये याची काळजी घ्यायला हवी. कारण सत्तेत आलेल्या सर्व राजकीय पक्षांनी आतापर्यंत शेती व शेतक-यांचे शोषण करण्याचीच नीती अवलंबिली आहे. इंग्रज देश सोडून गेल्यानंतर 'भारता'वर 'इंडिया'चे राज्य सुरू झाले. १९९१ मध्ये आलेली खुली व्यवस्था उद्योगांपूर्तीच मर्यादित राहिली. शेतीमाल व्यापार व प्रक्रियेवर बंधने कायम राहिलो. आता भारताला इंडियाच्या पारतंत्र्यातून मुक्त व्हायचे असेल तर देशातील शेतकरी, शेतीसंबंधी उद्योग व व्यापार करणाऱ्यांनी प्रामाणिकपणे विचारमंथन करून राजकारणशुन्य निर्णय घेण्याची गरज आहे.

**उत्तरार्ध**

**अनिल घनवट**
१९२३७०७६४६
(लेखक स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत

## सर्वसामान्यांच्या खिशाला झळ

आता होळी आणि लग्नसराईची धामधूम सुरु आहे.जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढतच चालले आहेत. शेंगदाण्याचे भाव पराकोटीला पोहचले आहेत.यात भर म्हणून कि काय खाद्यतेलाची भावही वाढले आहेत. जीवनातली एक महत्वाची वस्तू म्हणजे तूरडाळ. आज ती सुद्धा महागली आहे . मसाल्याचे सर्वच पदार्थ महागले आहेत.मसाल्याच्या दरात गेल्या दोन आठवड्यात जवळपास ५० रुपयांची वाढ झाली आहे दगडफूल, दालचिनी, खोबरे, खसखस मिरी तसेच जिरे महागले आहेत .बाजारात मालाची आवक कमी झाल्याने ही परिस्थिती उद्भवली असल्याचे सांगण्यात येत आहे.या दरवाढीमागे जागतिक घडामोडी सुद्धा कारणीभूत आहेत. जाणकारांच्या मते ही भाववाढ आणखी काही दिवस अशीच राहण्याची शक्यता आहे.या भाववाढीमुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले आहे.भाव लगेच वाढतात पण वाढलेले भाव लगेच कमी मात्र होत नाहीत . मसाल्याचे पदार्थ तसेच शेंगदाणे या खरे तर नेहमीच्या व जीवनावश्यक वस्तू आहेत.

**शांताराम वाघ**

## अकृषिक (एनए) परवानगीची अट रद्द!

राज्यातील जमिनींचे हस्तांतरण सुलभपणे व्हावे आणि बांधकाम प्रक्रियेला गती देण्यासाठी राज्य जमीन महसूल कायद्यात मोठा बदल करण्यात आला आहे. आता निवासी, वाणिज्य, व्यावसायिक इत्यादी कोणत्याही कारणांसाठी करण्यात येणाऱ्या बांधकामा करिता आवश्यक असणारी आणि जिल्हाधिकाऱ्यांकडून देण्यात येणारी जमिनीच्या अकृषिक (एनए) परवानगीची अट रद्द करण्यात आली आहे. नागरिकांना यापुढे कोणत्याही प्रकारच्या बांधकामां साठी स्थानिक प्राधिकरणाकडे अर्ज सादर करावा लागेल. एकवेळ अकृषिक शुल्क भरल्यानंतर स्थानिक प्राधिकरणा कडून बांधकाम नकाशाला मंजुरी दिली जाणार आहे. त्यामुळे वेगळ्या अकृषिक परवानगीची गरज भासणार नाही. राज्य शासनाने या संदर्भातील शासन आदेश नुकताच जारी केला आहे. या पूर्वी राज्यात कोणत्याही प्रकारच्या बांधकामासाठी जिल्हा धिकाऱ्यांकडून जमीन अकृषिक परवानगी घेणे आवश्यक होते. जमीन बिनशेती केल्याशिवाय बांधकाम करता येत नव्हते.राज्य शासनाकडून वेळोवेळी जमीन महसूल विषयक अनेक जाचक आणि गुंतागुंतीचे कायदे आणि अटी सुलभ करण्याच्या निर्णयांमुळे राज्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**प्रदीप मोरे**

## नगरे कचरामुक्त करणार?

माणसांप्रमाणे सर्व सजीव आपल्या कृतींनी आपल्या सभोवती कचरा निर्माण करण्यास जबाबदार असतात. कचरा निर्माण करण्याची त्यांची कृती असली तरी त्या कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावणे किंवा तो मर्यादित ठेवणे याबाबत कोठलाही नागरिक आपली जबाबदारी आहे असे मान्य करीत नाही.

त्यामुळेच शहरांत, खेडोपाडी, गावागावांत महानगर पालिका, नगरपरिषदा किंवा ग्रामपंचायतींच्या पातळीवर लाखो करोडो रुपये खर्चून स्वच्छता कामांसाठी केलेला खर्च बऱ्याच स्वच्छता मोहिमांवर जो खर्च केला जातो तो पूर्णतः यशस्वी झालेला दिसत नाही.त्याचवेळी इंदूर सारख्या नगरपालिकेकडून शहर स्वच्छतेसाठी केला जाणारा खर्च योग्य ठरतो कारण त्या शहराची स्वच्छता तशा प्रमाणात राखली जाते हे दिसून येते.. तसे संस्कार बिंबविण्यासाठी शालेय जीवना पासून प्रयत्नांची सुरुवात केल्यास ती अधिक परिणामकारक ठरेल असे वाटते.

**राजन पांजरी**

## पाश्चिमात्य संस्कृतीचा अवलंब

१४ फेब्रुवारीला 'व्हेलेंटाईन डे' संपूर्ण जगासह भारतीय युगल मोठ्या थाटामाटात साजरा करतात.'व्हेलेंटाईन डे' साजरा करायला हरकत नाही.परंतु आपली संस्कृती जोपासलीच पाहिजे व कोणतेही कार्य संस्कृतीलाच धरून असावे.कारण भारतीय संस्कृती ही संपूर्ण जगात आगळीवेगळी आहे. तीला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी आजच्या युवा पिढीने घेतली पाहिजे.देशातील कोणत्याही कानाकोपऱ्यातून किंवा टोकावरून निघालो तर प्रत्येक ४० किलोमीटर अंतरा नंतर आपल्याला वेगवेगळ्या भाषेचा गोडवा पहायला मिळतो.अशा परीस्थितीत संस्कृतीची जोपासना आजच्या युगातील युगलांनी करायला पाहिजे.अन्यथा भारतीय संस्कृतीचे वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही. 'व्हेलेंटाईन डे' च्या निमित्ताने आई-वडिल, बहिण-भाऊ यांचा आदरतिथ्याने सन्मान करून त्यांचा आशीर्वाद घ्यावा यातच आपली संस्कृती आहे

.यामुळे प्रत्येकाच्या आयुष्यात नवीन ऊर्जा निर्माण होवून नवचैतन्य दिसून येईल.

**रमेश लांजेवार**
मो.नं.९९२१६९०७७९

# लक्झरी पाण्याची भरारी...

कोट्यवधी भारतीय स्वच्छ पाण्यासाठी झगडत असताना, महानगरांत प्रीमियम आणि आयात केलेल्या बाटलीबंद पाण्याचा 'लक्झरी' बाजार वेगाने वाढतो आहे. पाण्याची चव, मिनरल्स आणि ब्रँड यावर चर्चा होत असताना सामाजिक असमानतेचे वास्तव अधिक ठळक होत आहे.

देशातील मोठ्या महानगरांत इटली, फ्रान्स आणि अन्य युरोपीय देशांकडून आयात केलेल्या महागड्या पाण्याची मागणी वेगाने वाढत असून, देशात एक नवीन प्रीमियम वॉटर कल्चर विकसित होत आहे. दिल्ली, मुंबई, बंगळूर, गुरुग्राम यासारख्या निवडक शहरांत आलिशान फूड स्टोअर आणि पंचतारांकित हॉटेल्समध्ये विशेष चवीचे पाणी प्राशन करण्याचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. यात सहभागी मंडळी जगभरातील नामांकित ब्रँडचे पाणी वाईन, कॉफीप्रमाणे तपासत आहेत. पाण्यातील मिनरल कंटेंट, कार्बोनेशन, खारटपणा आणि चवीबद्धल यात गांभीर्याने चर्चा होते. सध्या ही बाब भारतातील उच्चभ्रू वर्गापुरतीच मर्यादित आहे. परंतु, आगामी काळात त्याची व्याप्ती वाढू शकते.

पाण्याची चव घेण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करणाऱ्यांपैकी एक अवंती मेहता यांनी स्वत:ला भारताची सर्वात तरुण 'वॉटर सोमेलिएर' असल्याचे म्हटले आहे. 'सोमेलिएर' म्हणजे पेयतज्ज्ञ. हा शब्द वाईनतज्ज्ञांसाठी वापरला जातो आणि आता पाणी क्षेत्रातही उपयोगात आणला जात आहे. अवंती यांच्या मते, वेगवेगळ्या भौगोलिक स्थितीतून उपसलेल्या पाण्याची चव आणि पोषणमूल्य वेगळे असते. 'रॉयटर्स'च्या अहवालानुसार, या आयोजनात



फ्रान्सच्या पर्वतरांगांतील पाणी सादर करणारे 'एबिया', दक्षिण फ्रान्सची 'पेरिये', इटलीची 'सॅन पेलग्रिनो', भारतातील अरावली पर्वताचे पाणी आणणारे 'आवा' मिनरल वॉटर यासारख्या ब्रँडचा समावेश होतो. अवंती यांच्या मते, प्रत्येक ठिकाणच्या पाण्याची चव वेगळी असते, हे लोकांना कळून चुकले आहे. काही ठिकाणी कॅल्शियम अधिक असते, तर काहीत मॅग्नेशियम, तर काही ठिकाणी नैसर्गिक कार्बोनेशन. योग्य प्रकारचे पाणी निवडणे हे शरीरासाठी फायदेशीर ठरू शकते. अवंती यांचे कुटुंबीय आवा मिनरल नावाची कंपनी चालवते आणि ते भारतातील प्रीमियम वॉटर ब्रँडस्मध्ये स्वत:चे स्थान निर्माण करत आहे.

### पाणी आता विशेषाधिकार

१.४ अब्ज लोकसंख्येच्या देशात स्वच्छ पाणी हा कळीचा मुद्दा ठरत आहे. संशोधकांच्या मते, देशातील सुमारे ७० टक्के भूजल कोणत्या ना कोणत्या रूपाने दूषित झाले आहे. अनेक शहर आणि वाड्यांवर नळातून येणारे पाणी पिण्याजोगे राहिलेले नाही. डिसेंबर महिन्यात इंदूरमध्ये गलिच्छ पाणी पिल्याने १६ जणांचा मृत्यू झाला. अशावेळी बाटलीबंद पाणी भारतातील काही लोकांसाठी अत्यावश्यक बाब बनली आहे. किराणा दुकानात एक लिटरची पाण्याची बाटली २० रुपयांना मिळते. हे पाणी पेप्सी, कोका कोला, बिसलरी तयार करतात. पिण्याच्या पाण्याच्या उद्योगाची उलाढाल तब्बल पाच अब्ज डॉलर्स इतकी आहे. यात दरवर्षी २४ टक्क्यांनी वाढ होत असून, भारत या क्षेत्रात वेगाने विकसित होणारी बाजारपेठ आहे.

जागतिक पातळीवर बाटलीबंद पाण्याची उलाढाल ३० अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक आहे. चीन आणि अमेरिकेसारख्या देशांत होणारी मागणी ही प्रामुख्याने जीवनशैली अणि सुविधेच्या रूपातून होताना दिसते. तेथे दरवर्षी चार ते पाच टक्के वाढ नोंदली जात आहे. बाजारातील रिसर्च कंपनी 'यूरोमॉनिटर'च्या आकडेवारीनुसार, भारतात प्रीमियम वॉटरची मागणी २०२१ मध्ये केवळ एक टक्के असताना २०२५ पर्यंत ती वाढत ८ टक्क्यांवर पोहोचली आहे. 'युरोमॉनिटर'चे अधिकारी अमूल्य पंडित यांच्या मते, महापालिकेकडून पुरविण्यात येणाऱ्या पाण्यावरचा लोकांचा विश्वास उडत चालला आहे. केवळ बाटलीबंद पाणीच आरोग्यासाठी उपयोगी असल्याची भावना निर्माण झाली आहे. जी मंडळी नियमित बाटलीबंद पाणी खरेदी करू शकत नाहीत, ते वॉटर प्युरिफायरची मदत घेतात. मात्र, प्युरिफायरमध्ये पाणी स्वच्छ होताना त्यातील नैसर्गिक तत्त्व निघून जाते, असे निरीक्षण आहे.

### स्पार्कलिंग आणि स्प्रिंग वॉटरची मागणी

भारतात स्पार्कलिंग आणि स्प्रिंग वॉटरची मागणीदेखील वाढत आहे. टाटा समूहाने अलीकडेच स्पार्कलिंग वॉटरचा प्लांट सुरू केला आणि कंपनी भविष्यात स्प्रिंग वॉटरच्या उत्पादनातदेखील येण्याची तयारी करत आहे. टाटा अधिकाऱ्यांच्या मते, त्यांच्या पाण्याच्या उद्योगाची उलाढाल दरवर्षी सुमारे ३० टक्के वाढ नोंदवू शकते. भारतात प्रीमियम वॉटर ब्रँड 'आवा' याची विक्री ही मागील वर्षी विक्रमी पातळीवर नऊ दशलक्ष डॉलर्सपर्यंत पोहोचली होती. कंपनीच्या मते, शहरातील मध्यमवर्ग आणि श्रीमंत गटातील ग्राहकांत आरोग्य आणि चवीवरून वाढलेली जागरूकता पाहता प्रीमियम वॉटरची मागणी वाढत आहे. त्याचवेळी परकी ब्रँडस्देखील भारताकडे मोठी बाजारपेठ म्हणून पाहत आहेत.

अर्थात, या संपूर्ण ट्रेंडमागे एक कटुसत्यही दडलेले आहे. त्यात देशात कोट्यवधी नागरिक आजही सुरक्षित पाण्यापासून वंचित आहेत. हे चित्र सामाजिक असमानता दाखविणारे आहे. तज्ज्ञांच्या मते, पाण्यासारख्या मूलभूत गरजा केवळ बाजाराच्या भरवशावर सोडणे कितपत योग्य आहे? अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी सार्वजनिक पाणीपुरवठा प्रणाली सक्षम करण्यावर भर देण्याचा मुद्दा मांडला आहे. पाण्याची गळती थांबवून स्वच्छ आणि आरोग्यपूरक पाणी देणे आवश्यक असताना, लोकांना महागड्या पर्यायाची निवड करण्यास भाग पाडू नये, असेही मत नोंदविले.

पाण्याची चव चाखण्यासंदर्भात आयोजित कार्यक्रमात सहभागींनी काही अनुभव शेअर केले. त्यांच्या मते, पाण्याची चव वेगळी असली तरी त्याची किंमत आटोक्याबाहेरची आहे. याउलट श्रीमंतवर्गात त्याचे प्रस्थ वाढत येत. एकुणात, भारतात बाटलीबंद पाण्याची कहाणी आता केवळ तहान भागविण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. या पाण्यावर आरोग्य, चव, सामाजिक प्रतिष्ठा आणि आर्थिक असमानतेचे थर जमा झाले आहेत.

### बाटलीबंद पाण्याचा बाजार

भारतात चांगल्या गुणवत्तेच्या पाण्याचा बाजार सुमारे ४०० दशलक्ष डॉलर्सपर्यंत पोहोचू शकतो. भारताची लोकसंख्या आणि वाढते शहरीकरण पाहता हा बाजार आगामी काळात आणखी वाढू शकतो. उच्च उत्पन्न गटातील लोक पाणी हे आरोग्याबरोबरच सामाजिक प्रतिष्ठेला जोडत आहेत. भारतात सर्वात महाग आणि विशेष मिनरल असलेल्या बाटलीबंद पाण्याची किंमत एका लिटरसाठी ८० ते १०० रुपये आहे.


त्याचवेळी परदेशातून आयात बाटलीची किंमत २५० ते ३०० रुपयांपर्यंत आहे. या किमती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असतानाही त्याची मागणी वाढत आहे. पंचतारांकित हॉटेल्समध्ये भोजनाबरोबरच पाण्याचीदेखील विचारणा केली जात आहे, हे विशेष.

**रंगनाथ कोकणे**

# यवतमाळ पोलीस भरतीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## १६१ जागांसाठी १३,७८०हून अधिक उमेदवार मैदानात

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - जिल्ह्यातील पोलीस शिपाई व पोलिस बॅण्ड पदांच्या रिक्त जागांसाठी सुरू असलेल्या भरती प्रक्रियेला मोठा प्रतिसाद मिळत आहे. पोलीस भरती २०२४-२५ अंतर्गत १५० पोलीस शिपाई आणि ११ बॅण्डस्मन अशा एकूण १६१ जागांसाठी फेब्रुवारी २०२६ पासून मैदानी चाचणीला सुरुवात झाली आहे. या भरतीसाठी तब्बल १३,७८० पेक्षा अधिक उमेदवारांनी अर्ज केला असून प्रत्यक्ष प्रक्रियेत सुमारे १४ ते १५ हजार उमेदवार सहभागी होत आहेत.

भरती प्रक्रियेचा शुभारंभ ११ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे साडेपाच वाजता पोलीस कवायत मैदान येथे करण्यात आला. याबाबत माहिती देताना पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, उमेदवारांसाठी १,६०० मीटर व १०० मीटर धावण्याचे ट्रॅक, गोळाफेक मैदान, उंची व छाती मोजणीची व्यवस्था तसेच कागदपत्र पडताळणीसाठी स्वतंत्र टेंट उभारण्यात आले आहेत. भरतीच्या पहिल्याच दिवशी सुमारे ७५० उमेदवारांनी शारीरिक चाचणी दिली. २१ फेब्रुवारीदरम्यान सुमारे १,२०० उमेदवारांची चाचणी पार पडली. दरम्यान, १५ फेब्रुवारी (रविवार) आणि १९ फेब्रुवारी (शिवजयंती) या दिवशी प्रक्रिया बंद ठेवण्यात येणार आहे. भरती प्रक्रिया पारदर्शक ठेवण्यासाठी संपूर्ण मैदानावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. प्रत्येक उमेदवाराची बायोमेट्रिक हजेरी घेतली जात असून पात्र उमेदवारांच्या पायाला स्कॅनरयुक्त ट्रॅक पट्टी बांधण्यात येत आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून दक्षता घेतली जात आहे.भरतीदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सुमारे ५०० पोलीस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलीस परेड मैदान परिसरात मॉर्निंग वॉकला बंदी घालण्यात आली असून पोलीस अधीक्षक कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय दरम्यानचा रस्ता वाहतुकीसाठी नियमित ठेवण्यात आला आहे. गोळाफेक व धावण्यामध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची पुढील टप्प्यात लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. संबंधित तारीख पोलीस मुख्यालयामार्फत जाहीर केल्या जाणार असून ही परीक्षा मार्च महिन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. एकूण प्रक्रियेतून प्रथम टप्प्यात सुमारे १० टक्के उमेदवारांची निवड होणार असून त्यानंतर अंतिम निवड प्रक्रिया पार पडणार आहे. संपूर्ण भरती प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक आणि गुणवत्ता आधारित पद्धतीने राबविण्यात येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील तरुणांमध्ये पोलीस सेवेसाठी मोठी उत्सुकता दिसून येत असून, आगामी टप्प्यांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पोहरादेवी येथे आज संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - बंजारा काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पोहरादेवी (जि. वाशीम) येथे आज १४ फेब्रुवारी रोजी श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य पर्यटन विभाग व बनजारा विरासत संघाच्या वतीने हा सोहळा पार पडत असून राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी राज्यातील गोर बंजारा समाजबांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. मान्यवरांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन व सेवा रत्न पुरस्कार वितरण होणार आहे. सकाळी सेवा प्रसाद वाटप, दुपारी अल्पोपहार तर रात्री भजन-कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यासोबतच गायिका मंगली व गायक संजू राठोड यांच्या बहारदार संगीत कार्यक्रमासह लेझर व फायर शो सादर होणार आहे. मुख्यमंत्री दुपारी १ वाजता संत सेवालाल महाराज समाधीस्थळी दर्शन घेऊन महोत्सवात सहभागी होणार आहेत.

# • वेचक

## युवक महोत्सव – तरुणाई-२०२६ उत्साहात संपन्न



यवतमाळ - दाते कॉलेज, यवतमाळ येथे ११ ते १३ फेब्रुवारी २०२६ दरम्यान "युवक महोत्सव – तरुणाई 2026" हा तीन दिवसीय महोत्सव उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला. उद्घाटनप्रसंगी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर यांचे मार्गदर्शन लाभले, तर नगर परिषदेच्या अध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. महोत्सवात रांगोळी, मेहंदी, पुष्परचना, भावगीत, काव्य, वक्तृत्व तसेच विविध सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. समारोप सोहळ्यात म्युझिकल ऑर्केस्ट्रा व आनंद मेळाव्याने रंगत वाढवली. प्राचार्य डॉ. राजेश सिंगरू यांच्या मार्गदर्शनाखाली हा महोत्सव यशस्वीरीत्या पार पडला.

## १०४ हेल्पलाईन क्रमांकावर मिळणार जन्म-मृत्यू आणि विवाह मार्गदर्शन

यवतमाळ - जन्म, मृत्यू आणि विवाह नोंदणी ही प्रत्येक नागरिकाच्या आयुष्यातील महत्त्वाची कायदेशीर प्रक्रिया आहे. या नोंदणीबाबत नागरिकांना अचूक आणि सविस्तर माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी आरोग्य सल्ला केंद्रामार्फत १०४ हा हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आला आहे. या क्रमांकावर संपर्क साधल्यास नोंदणीची संपूर्ण प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची यादी, नोंदणीसाठीची कालमर्यादा, प्रमाणपत्र मिळण्याचा कालावधी तसेच संबंधित कायदे व नियमांविषयी मार्गदर्शन मिळणार आहे. तसेच नोंदणी करताना घ्यावयाची खबरदारी याबाबतही सल्ला दिला जाणार आहे. नागरिकांना कोणतीही अडचण येऊ नये आणि त्यांना वेळेत प्रमाणपत्र मिळावे, यासाठी ही सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी जन्म-मृत्यू आणि विवाह नोंदणी संदर्भातील माहितीसाठी १०४ या हेल्पलाईन क्रमांकाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यू डॉ. सुभाष ढोले यांनी केले आहे.

# उमरखेडच्या नगरसेविकेने नाकारला बैठकीचा मानधन भत्ता

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीत वर्ग करण्याची विनंती करीत ठेवला आदर्श



"राजकारणातून देखील सामाजिक कार्य करता येते. लोकप्रतिनिधी म्हणून सामजिक भान असणे देखील तेवढेच महत्वाचे असते. मला शासनातर्फे दिला जाणारा बैठक भत्ता जर कोण्या गरीब गरजू रुग्णांच्या कामी येत असेल तर मी स्वतः ला भाग्यवान समजते. हे कोणावर उपकार नसुन लोकांनी मला निवडूण दिल्याची छोटीशी परतफेड आहे " **– खुशबू पवन मेंढे, नगरसेविका, न.प.उमरखेड**

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - नगर पालिकेत प्रभाग क्रमांक ८ मध्ये सर्वात कमी वयात निवडून आलेल्या खुशबू पवन मेंढे यांनी परत एकदा एका निर्णयाने लोकांची मने जिंकली असुन राष्ट्र प्रथमतः या भारतीय जनता पार्टी च्या संस्काराशी सुसंगत अशी भुमिका घेऊन खुशबू पवन मेंढे यांनी मुख्याधिकारी यांना निवेदन देत आपल्याला मिळणाऱ्या मानधनाला मुख्यमंत्री सहाय्यता निधी मध्ये गरजू रुग्णांना देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम १९६५ च्या कलम ६१(१) नुसार निर्वाचित नगरसेवकांना देय असलेले बैठक भत्ते दिले जाते. परंतू नगरसेविका खुशबू पवन मेंढे यांनी मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन देत विनंती केली की, सदर रक्कम ही परस्पर मुख्यमंत्री सहाय्यता निधीत वर्ग करण्यात यावी. जेणेकरून त्याचा उपयोग गरीब गरजू रुग्णांना होईल. अश्या प्रकारचा कौतुकास्पद निर्णय घेणारी खुशबू पवन मेंढे ह्या राज्यातील पहिली नगरसेविका बनली आहे.

त्यांच्या या निर्णयामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या असुन सर्व स्तरावरून त्यांचे कौतुक होत आहे. तसेच या निर्णयामुळे त्यांनी राज्यातील लोकप्रतिनिधी पुढें आदर्श घालून दिला आहे. अश्या समाज उपयोगी नेत्यांची देशाला गरज असुन त्यांच्या या निर्णयामुळे राजकारण हे समाजकारणाचे माध्यम देखील बनू शकते हे त्यांच्या या कृतीतून सिद्ध होत आहे.

# कायद्याच्या रक्षका कडूनच कायद्याचा भंग ?

## नायब तहसीलदार यांच्यावर गंभीर आरोपनायब तहसीलदार यांच्यावर गंभीर आरोप

**जनमाध्यम प्रतिनिधी**

### अधिकाऱ्यांचा माज की सामान्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न?





पुसद - उमरखेड येथील नायब तहसीलदार विश्वंभर राणे यांच्यावर बंदुकीचा धाक दाखवून सामान्य नागरिकास मारहाण केल्याचा गंभीर आरोप झाल्याने प्रशासनातील दडपशाहीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. गौळ खुर्द येथील सुरेश दादाराव हराळ यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्याकडे तक्रार दाखल करून न्यायाची मागणी केली आहे. घटनेनुसार, ८ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास हराळ हे आपल्या १५ वर्षीय मुलासह मोटार सायकलने घरी परत असताना गौळ खुर्दजवळ रस्त्यावर उभी असलेली चारचाकी पाहून ते थांबले. त्यावेळी मद्यधुंद अवस्थेत असलेल्या नायब तहसीलदारांसह दोन जणांनी त्यांना बंदुकीचा धाक दाखवत मारहाण केल्याचा आरोप आहे. ११२ वर फोन करूनही पोलिसांकडून उलट हराळ यांनाच "शासकीय कामात अडथळा" दाखल करण्याची धमकी देण्यात आल्याचे बोलले जाते. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओत संबंधित अधिकारी कमरेला बंदूक व हातात दांडा घेऊन दिसत असल्याने संतापाची लाट उसळली आहे. प्रश्न असा आहे की, जर कायद्याचे रक्षकच कायदा हातात घेत असतील तर सामान्य नागरिकांनी न्याय कुणाकडे मागायचा?

प्रशासनाने निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली नाही, तर हा प्रकार सामान्यांमध्ये भीती व अविश्वास निर्माण करणारा ठरेल. "सत्तेचा माज" की "कायद्याचा राज" याचा निर्णय आता जिल्हा प्रशासनानेच घ्यायचा आहे. जनतेचे लक्ष या प्रकरणातील पुढील कारवाईकडे लागले आहे.

# वार्षिक स्नेहसंमेलनात चिमुकल्यांच्या कलाविष्काराने प्रेक्षक मंत्रमुग्ध



**जनमाध्यम प्रतिनिधी**

बाभुळगाव - स्थानिक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी शाळेचे तिन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन गटविकास अधिकारी उज्वला ढोले यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी बालाजी संस्थेचे अध्यक्ष डॉ. रिकबचंद तातेड जैन होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्रीकांत कापसे, प्रकाशचंद छाजेड, सतीश मानलवार, श्याम जगताप, डॉ. पल्लवी सोटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. 1862 मध्ये स्थापन झालेल्या या शाळेत सध्या नर्सरी ते इयत्ता आठवीपर्यंत शिक्षण दिले जाते. शाळेने शैक्षणिक गुणवत्तेसोबतच पटसंख्या वाढवून खाजगी शाळांना स्पर्धा दिली आहे. महादीप व शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर यश मिळविल्याची माहिती जेष्ठ शिक्षक प्रशांत भुराणे यांनी प्रास्ताविकात दिली. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी समूहनृत्य, एकलनृत्य, गायन, नाटिका व प्रश्नमंजुषा सादर करून प्रेक्षकांची दाद मिळवली. शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षकांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला. सूत्रसंचालन वैशाली बोरकर यांनी केले.

# वकिली क्षेत्रात पदवीसोबतच कौशल्य विकास करणे काळाची गरज : डॉ. राजीव बोरकर



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - येथील स्वातंत्र्य सेनानी जवाहरलाल दर्डा विधी महाविद्यालयात आयोजित कौशल्य विकास कार्यशाळेला संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक मा. डॉ. राजीव बोरकर यांनी सदिच्छा भेट दिली. कार्यशाळेला भेट दिली असता विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून, संवाद कौशल्य, वेळेचे नियोजन आणि व्यक्तिमत्व विकास यांसारख्या कौशल्यांची वकिली क्षेत्रात किती गरज आहे, याचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळा मैलाचा दगड ठरतात, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. महाविद्यालयाच्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह पाहायला मिळाला असून, भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी हे मार्गदर्शन उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# संत रविदास महाराज जयंती निमित्त शिवलिला पाटील यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम

**जनमाध्यम प्रतिनिधी**



वणी - समतेचे अग्रदूत,थोर समाजसुधारक व मानवतेचा संदेश देणारे संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त वणी येथे १४ व १५ फेब्रुवारी रोजी विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.समाजात समता, बंधुता आणि मानवतेचा विचार रुजविण्याच्या उद्देशाने हा जयंती महोत्सव उत्साहात साजरा करण्यात येत आहे.

राष्ट्रीय चर्मकार महासंघ, वणी, श्री संत रविदास महाराज समाज सुधार मंडळ,वणी तसेच श्री संत रविदास महाराज प्रबोधन केंद्र,वणी यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जयंतीनिमित्त शनिवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी शिवव्याख्यात्या युवा कीर्तनकार ह.भ.प.शिवलीलाताई पाटील यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम सायंकाळी ६ वाजता ए.एस. एल.लॉन,एस.पी.एम. शाळेमागे,वणी येथे आयोजित करण्यात आला आहे. या कीर्तनातून संत विचार, सामाजिक जागृती आणि अध्यात्मिक संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

तसेच रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता संत रविदास महाराजांच्या मूर्तीला हार व पुष्प अर्पण करून अभिवादन कार्यक्रम श्री संत रविदास महाराज प्रबोधन केंद्र,वणी येथे संपन्न होणार असून भव्य जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांना समाजबांधव,महिला,युवक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी,असे आवाहन संत रविदास महाराज जयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

**क्रमांक/म/सहा.प्रस्तु-4/कावि/१३/२०२६**
**तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड**
**दिनांक:- १५/०१/२०२६**

## जाहीरनामा

उपरोक्त विषयाचे संदर्भीय शासन निर्णय व पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार **शेख मुसा शेख खाजा रा. उमरखेड** ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी त्यांची मुलगी नामे रेशमा बेगम **यांचा जन्म मौजा** उमरखेड **ता. उमरखेड येथे दिनांक** ०४.१२.१९८५ रोजी झालेला आहे. जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **जन्मनोद** आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक ०५/०२/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कायालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**स्वा.**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**

**आर. यु. सुरडकर तहसीलदार, उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड**

क्रमांक/म.सहा./प्रस्तु-२/कावि/६९२/२०२६
तहसीलदार उमरखेड यांचे कार्यालय,
उमरखेड दिनांक :- ०२/०१/२०२६

## जाहीरनामा

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार सय्यद फरीद सय्यद छोटू रा. चिल्ली ज. यांनी अर्ज सादर केला की, त्यांचा जन्म दि. ०४/०९/१९७५ रोजी मौजा चिल्ली ज. येथे झाला आहे. तरी त्यांच्या जन्म नोंदीचा आदेश होऊन मिळणेबाबत या कार्यालयास अर्ज सादर केला आहे.

उपरोक्त प्रकरणी सय्यद फरीद सय्यद छोटु यांचा जन्म दि. ०४/०९/१९७५ रोजी मौजा चिल्ली ज. येथे झाला असल्यामुळे जन्म नोंद करण्याचा आदेश देणेप्रकरणी कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक १९/०१/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

शिक्का

**(आर.यु.सुरडकर)**
**तहसीलदार, उमरखेड**

# यवतमाळ नगर परिषदेकडून ९ कोटींचा हिशोब गायब ?

## रस्त्यांवरील खड्डे कायम, नागरिक त्रस्त – मुख्याधिकाऱ्यांची मौनव्रत भूमिका संशयास्पद

**जनमाध्यम प्रतिनिधी**




यवतमाळ - शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था, सर्वत्र पडलेले खड्डे आणि अपघातांचे वाढते प्रमाण यामुळे नागरिक हैराण झाले असताना, खड्डे बुजवण्यासाठी मिळालेल्या तब्बल ९ कोटी रुपयांचा वापर नेमका कुठे झाला, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यवतमाळ यांनी दि. २३ फेब्रुवारी २०२३ रोजी रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी यवतमाळ नगर परिषदेला ९ कोटी रुपये दिल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, प्रत्यक्षात शहरातील एकाही प्रमुख रस्त्यावर ठोस स्वरूपाची दुरुस्ती झालेली दिसत नाही.

शहरातील सरदार पटेल चौक, दत्त चौक, बसस्थानक परिसर, शिवाजी चौक ते अप्सरा टॉकीज रोड, माळीपुरा, पाटीपुरा,कळंब चौक, लोहारा,वडगाव, वाघापूर अशा यांसारख्या मुख्य मार्गांवर मोठमोठे खड्डे पडले असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने अपघातांची मालिका वाढते. दुचाकीस्वार, ज्येष्ठ नागरिक आणि शालेय विद्यार्थी विशेषतः धोक्यात येत आहेत.

९ कोटी रुपये गेले कुठे? : खड्डे बुजविण्यासाठी निधी उपलब्ध असतानाही प्रत्यक्षात कामे का झाली नाहीत. याबाबत नगर परिषदेचे मुख्याधिकारी स्पष्ट उत्तर देण्यास टाळाटाळ करीत असल्याचा आरोप होत आहे.कॉंग्रेस नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी केला आहे. निधीचा खर्च, निविदा प्रक्रिया, ठेकेदारांची नियुक्ती आणि प्रत्यक्ष कामांचा तपशील याबाबत माहिती देण्यास प्रशासन तयार नसल्याने संशय अधिकच बळावला आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, "रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे. कररूपाने लाखो रुपये नगर परिषदेकडे जातात, त्यातच ९ कोटींचा निधी मिळूनही कामे झाली नाहीत, तर हा पैसा गेला कुठे?" असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.नगर परिषद सत्ताधाऱ्यांकडूनही याबाबत ठोस भूमिका घेतली जात नसल्याचे दिसून येते. नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या दुर्लक्षामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जर निधी खर्च झाला असेल, तर त्याची अधिकृत माहिती जाहीर करावी, अन्यथा चौकशीस सामोरे जावे, अशी मागणी जोर धरत आहे.

कॉंग्रेस सह इतर नगरपरिषद उमेदवार, सामाजिक कार्यकर्ते आणि काही नागरिकांनी या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून निधीच्या खर्चाचा तपशील सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे. आवश्यक असल्यास लेखापरीक्षण (ऑडिट) करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशीही मागणी होत आहे. शहरातील रस्त्यांवरील खड्डे हे केवळ असुविधेचे नव्हे तर नागरिकांच्या जीविताशी संबंधित गंभीर प्रश्न आहे. ९ कोटींचा निधी मिळूनही परिस्थितीत सुधारणा न झाल्यास, ही केवळ निष्काळजीपणा नसून गंभीर प्रशासनिक अपयश मानले जाईल. यवतमाळकरांच्या सहनशीलतेचा अंत होण्याआधी नगर परिषद प्रशासनाने पारदर्शक भूमिका घेत नागरिकांना स्पष्ट हिशोब द्यावा, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला जात आहे.

# टिपेश्वर वाइल्ड लाईफ सेंचुरी परिसरातील ESZ मध्ये बेकायदेशीर रिसॉर्ट्स? चौकशीची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा – टिपेश्वर वन्यजीव अभयारण्यालगत घोषित इको सेन्सिटिव्ह झोन (ESZ) क्षेत्रात सुरू असलेल्या रिसॉर्ट, हॉटेल व कृषी पर्यटन प्रकल्पांविरोधात प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडे गंभीर तक्रार दाखल करण्यात आली आहे. अंकित नैताम यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, संबंधित प्रकल्पांना आवश्यक पर्यावरणीय व वनविभागीय मंजुरी आहे का, याबाबत शंका निर्माण झाली आहे. पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अंतर्गत १७ जानेवारी २०१६ रोजी जारी ESZ अधिसूचनेनुसार अभयारण्यालगत नवीन व्यावसायिक प्रकल्पांसाठी सक्षम प्राधिकरणाची पूर्वपरवानगी व पर्यावरणीय परिणाम मूल्यमापन (EIA) बंधनकारक आहे. तसेच वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार अभयारण्य परिसरात किंवा त्यालगत कोणत्याही व्यावसायिक उपक्रमासाठी पूर्वपरवानगी आवश्यक आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास दंड व कारावासाची तरतूद आहे. दरम्यान, ३ जून २०२२ रोजीच्या Supreme Court of India च्या आदेशानुसार सर्व अभयारण्यांभोवती किमान एक किलोमीटर ESZ लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर टिपेश्वर परिसरातील प्रकल्पांचे पुनर्मूल्यांकन झाले आहे का, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. तक्रारीत सर्व प्रकल्पांची संयुक्त विशेष तपासणी, परवानगीविना सुरू असलेल्या कामांवर तात्काळ कारवाई, जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी आणि ३० दिवसांत सविस्तर अहवाल जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात प्रशासनाची पुढील भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### श्रीक्षेत्र सावनेर येथे शेकडो दिंड्या हजर

**नांदगाव खंडे-** तालुक्यातील श्री क्षेत्र सावनेर येथे श्रीमद भागवत व्यसनमुक्ती सप्ताह संत बालवामन महाराज यांच्या मार्गदर्शनात व गुरु निरंजन नाथ यांच्या अमृमय वाणीतून झाला.सप्ताहत मुबंई येथील डॉ. शुभांश भोयर व डॉ. स्मिता भोयर यांचे मोफत तपासणी व ओषधीचा भाविकांनी लाभ घेतला. ह. भ. प मसाये महाराज यांचे काल्याचे कीर्तन झाले.नंतर श्रीच्या पालखीची मिरवणूक दिंडी पताका शह गावातून काढण्यात आली. यावेळी अमरावती,यवतमाळ,वार्शीम, धारणी, वर्धा सहपरिसरातील शेकडो दिंडी सहभागी झाल्या होत्या.जागोजागी कमानी सजल्या होत्या संत वामन महाराज, संत गणपत महाराज, संत खतेशोर महाराज यांच्या जयघोषात परिसर दणाणून गेला होता.हरीनामच्या गजरात श्रीची पालखी गोरक्षण परिसरात आल्यावर दहीहंडी व महाप्रसादचा भाविकांनी लाभ घेतला. सप्ताह दरम्यान संत. महंत, समाजसेवक लोकप्रतिनिधींनी भेटी दिल्या. यात प्रामुख्याने आ. प्रतापदादा अडसड,महापौर श्रीचंद तेजवानी,गटनेता चेतन गावडे,प्रशांत शेगोकार,नांदगाव खडे पोलीसस्टेशनचे ठाणेदार बिट जमादार तसेच पोलीस, महिला पोलीस यांनी चोख बंदोबस्त केला. यावेळी संत वामन महाराज संस्थानचे विश्वस्त गावकरी मंडळी यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.



### उपमहापौर सचिन भेंडे यांचा सत्कार

**अमरावती-** अंबानगरी अमरावतीचे उपमहापौर सचिन भेंडे यांचा श्री संताजी समाज विकास संस्थेतर्फे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.संस्थेचे अध्यक्ष प्रा. संजय आसोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या छोटेखानी पण उत्साहपूर्ण कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते उपमहापौर भेंडे यांना गौरविण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविणाऱ्या संस्थेच्या कार्याची दखल घेत, उपमहापौरांनी संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.आपल्या मनोगतात सचिन भेंडे यांनी सांगितले की, समाजहिताच्या उपक्रमांमुळे शहराच्या विकासाला नवी दिशा मिळते. श्री संताजी समाज विकास संस्था शिक्षण, सामाजिक जागृती आणि समाजसंघटन या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असून अशा उपक्रमांना महानगरपालिका प्रशासनाकडून सकारात्मक पाठबळ दिले जाईल.याप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी रमेशराव शिरभाते, मिलिंद शिरभाते, ॲड. चारुदत्त गुल्हाने, विलास शिरभाते, अतुल बिजवे, विजय राजगुरे, सौरभ गाडबैल, किशोर शिरभाते, संजय रायकर, हर्षल बिजवे, प्रा. गुल्हाने आदी उपस्थित होते.

# शहरासह महावितरणच्या ४२ उपविभागात दीर्घ पदयात्रा

## हजारो कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवत केला महावितरणच्या स्मार्ट मीटर व योजनांचा जागर

**अमरावती/का.प्र**

महावितरणच्या विविध ग्राहकाभिमुख योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविणे, वीज चोरी विरोधात वातावरण निर्मिती करणे, वीज ग्राहकांमध्ये वीजबिल वेळेत भरणे, स्मार्ट मीटरच्या अचूकतेबाबत जनजागृती निर्माण करणे, वीज अपघात टाळणे, तसेच महावितरणच्या कर्मचाऱ्यांमध्ये संघ भावना निर्माण होवून त्याचा फायदा वीज ग्राहकांना होईल या उद्देशाने अमरावती शहरासह महावितरणच्या ४२ विभाग-उपविभागात, दीर्घ पदयात्रा (लॉंग मार्च) काढण्यात आली.




अमरावती शहरात सायन्स कोअर मैदान येथून काढण्यात आलेल्या दीर्घ पदयात्रेचे नेतृत्व मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले. यावेळी अधीक्षक अभियंता दिपक देवहाते, दीपाली माडेलवार, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे, कार्यकारी अभियंता राजेश माहुलकर, अमित बुटे, प्रणाली विश्लेषक नितिन नांदुरकर, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने, वरिष्ठ व्यवस्थापक शिरीष शहा, व्यवस्थापक विकास बांबल यांची प्रमुख उपस्थिती होती.

महावितरणमध्ये ९ ते २३ फेब्रुवारी या काळात स्मार्ट मिटर पंधरवाडा राबविण्यात येत आहे. या पंधरवाड्यात स्मार्ट मिटरचे फायदे वीज ग्राहकांना समजावून सांगण्यात येणार आहे. या पधंरवाड्याचा भाग म्हणून आज अमरावती परिमंडळात जनजागृति दिर्घ पदयात्रेचे नियोजन करण्यात आले.सायंन्स कोअर मैदान येथून सुरू झालेली पदयात्रा पुढे रुक्मिणी नगर, कल्याण नगर, रेडीयंट हॉस्पिटल बापटवाडी, विवेकानंद कॉलोनी ते पुन्हा सायन्स कोअर मैदान येथे विद्युत सुरक्षेची शपत घेऊन पदयात्रेची सांगता करण्यात आली. पदयात्रेदरम्यान राज्य शासन व महावितरणच्या योजना ग्राहकांपर्यंत पोहचवण्यासाठी स्मार्ट मीटर, वीजबिल भरा सहकार्य करा, थकबाकी भरा, महावितरणची कटू कार्यवाही टाळा, प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजनांचा बॅनर व फलकाच्या माध्यमातून जागर करण्यात आला. अश्याचप्रकारे महावितरणच्या ८ विभाग -आणि ४२ उपविभागात दिर्घ पदयात्रा काढून महावितरणच्या विविध योजनांचा जागर करण्यात आला.

# नांदगाव खंडेश्वरमध्ये साकारणार सुसज्ज बसस्थानक

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

तालुक्याच्या ठिकाणी नांदगाव खंडेश्वर येथे सुसज्ज बस स्थानक तयार करण्यासाठी योग्य जागा शोधण्याचे आदेश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच उपजिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.अखिल भारतीय विद्यार्थी परिषद नांदगाव खंडेश्वर तर्फे करण्यात आलेल्या या मागणीला अखेर यश आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात या संदर्भात महत्त्वपूर्ण बैठकीत पार पडली. या बैठकीस अभाविप प्रांत कार्यकारणी सदस्य तेजस पाठक,नांदगाव खंडेश्वरचे नगरमंत्री ओम मोरे, श्रेणिक मोरे, विभागीय अभियंता (मा.रा.प.मं.), तहसीलदार नांदगाव खंडेश्वर व संबंधित अधिकारी उपस्थित



### अभाविपच्या मागणीला यश

होते.सध्या नांदगाव खंडेश्वर येथे सुसज्ज बस स्थानक नसल्यामुळे विद्यार्थ्यांना तसेच सर्वसामान्य प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. बसची नियमित पार्किंग व्यवस्था नसल्याने वेळापत्रकात अडचणी निर्माण होतात. प्रवाशांना रस्त्याच्या कडेला उभे राहून प्रतीक्षा करावी लागते. पावसाळा व उन्हाळ्यात कोणतीही पुरेशी सुविधा नसल्याने विशेषतः ग्रामीण भागातून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो व त्यांच्या शैक्षणिक वेळेवर परिणाम होतो.

अभाविपच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली असून, जागा निश्चित करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सुसज्ज बस स्थानक उभारण्यात आल्यास प्रवाशांसाठी प्रशस्त प्रतीक्षालय, स्वच्छतागृहे, डिजिटल वेळापत्रक फलक, सुरक्षित पार्किंग व्यवस्था तसेच इतर मूलभूत सुविधा उपलब्ध होणार असून नांदगाव खंडेश्वरच्या विकासाला मोठी चालना मिळणार

### 'संत नामदेव' ग्रंथाचे विमोचन उद्या

**अमरावती-** संतपरंपरेचा तेजस्वी वारसा जपणाऱ्या संत नामदेव बाबा (गणोरीकर) यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर आधारित संत नामदेव या पुस्तकाचा भव्य विमोचन सोहळा रविवार १५ फेब्रुवारी २०२६ रोजी अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे. आध्यात्मिक आणि साहित्यिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडणार असून शहरात याबाबत विशेष



उत्सुकता निर्माण झाली आहे.सदर कार्यक्रम नामदेव महाराज समाधी मंदिर, नवाथे चौक, नंदा मोटर्स समोर, अमरावती येथे होणार आहे. सकाळी ९.०० वाजता सोळस पूजेने कार्यक्रमाची सुरुवात होईल. मंदिर परिसरात वेदमंत्रांच्या घोषात आणि भक्तिमय वातावरणात पूजेचे आयोजन करण्यात येणार आहे. दुपारी ३.०० वाजता मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे औपचारिक विमोचन करण्यात येईल.

हे पुस्तक देवयानी सुनिल मानकर, रविनगर, अमरावती यांनी लिहिले असून संत नामदेव बाबा यांच्या साधना, समाजकार्य, अध्यात्मिक मार्गदर्शन आणि त्यांच्या सहवासातील प्रेरणादायी प्रसंगांचे सविस्तर वर्णन या पुस्तकात करण्यात आले आहे.

# माता रमाबाई आंबेडकर जयंतीनिमित्त झाली धम्म परिषद

**अमरावती/का.प्र.**

कुशावती सामाजिक प्रतिष्ठान, रमाई महिला मंडळ व नवभीम ज्योत मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले. दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमास उपासक-उपासिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

धम्म परिषदेचे उद्घाटन भंते करुणानंद महाथेरो यांच्या हस्ते करण्यात आले. परिषदेचे अध्यक्ष भंते कीर्ती आनंद बोधी तर मार्गदर्शक म्हणून भंते दर्मा थेरो (ऑस्ट्रेलिया) यांनी मार्गदर्शन केले. अखिल भारतीय भिक्खु संघाचे अनेक भिक्खू उपस्थित होते. भंते नागसेन थेरो (इंदौर), भंते पट्टीसेन (नांदेड), भंते आनंद थेरो (वटफळी) आदी भंते यांची उपस्थिती लाभली.भंते करुणानंद महाथेरो यांनी आपल्या वाणीतील प्रवचनातून धम्माचे विचार मांडले. 'मी साहेबांची रामू बोलतेय' या एकपात्री प्रयोगातून आम्रपाली बोलके यांनी माता रमाबाई यांच्या संघर्षमय जीवनाचे प्रभावी सादरीकरण केले. स्वागताध्यक्ष अरुण बनकर यांनी विहारासाठी गेट दान दिले. तसेच



### उपासक-उपासिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

जयंतीनिमित्त महिलांना १२८ प्रतिमा भेट देण्यात आल्या. राष्ट्रीय प्रबोधनकार प्रकाशनार्थ पाटणकर यांनी गीतांच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले.गावातून भव्य रॅली काढण्यात आली. त्यानंतर धम्मतत्त्वावर आधारित व्याख्यानमाला पार पडली. या सत्रात चंद्रमणी गणवीर, राहुल भाऊ वासेकर, अरुण बनकर, संध्याताई गणवीर आदी मान्यवर उपस्थित होते. दुपारच्या सत्रात विद्या सुमेध नागदिवे यांची जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, पालघर येथे लघु टंकलेखक पदावर निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. विशेष व्याख्यानात डॉ. प्रा. विद्या राईकवार (वर्धा) व अध्यक्ष डॉ. प्रा. भूषण लांजेवार (नागपूर) यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रमाबाई आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांचा उहापोह केला.रात्री बुद्ध-भीम गीतांचा वैचारिक जंगी सामना रंगला. नागपूर येथील गायक सुरज आतिश संच तसेच उत्तर प्रदेशच्या गायिका करिष्मा ताज यांनी भीम गीतांद्वारे उपस्थितांचे प्रबोधन केले. दोन दिवसीय धम्म परिषद शांततेत व उत्साहात पार पडली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रमाई महिला मंडळ, नवभीम ज्योत मंडळ व कुशावती सामाजिक प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. संचालन ओम प्रकाश पाटील यांनी तर आभार प्रदर्शन विशाल गजभिये यांनी केले.

# पत्रकारितेतील निष्ठा, निर्भीडता आणि लोकहिताचा गौरव सोहळा

**लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखली जाणारी पत्रकारिता ही केवळ बातम्या देणारी यंत्रणा नसून समाजातील सत्य, वास्तव आणि जनहिताचे प्रतिबिंब आहे. सत्यासाठी संघर्ष, अन्यायाविरोधात ठाम भूमिका आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांना व्यासपीठ देण्याचे कार्य करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान करण्यासाठी अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्रदान करण्यात येतात. यावर्षीचा हा सन्मान सोहळा म्हणजे पत्रकारितेतील निष्ठा, निर्भीडता आणि सामाजिक बांधिलकी यांचा उत्सव ठरणार आहे.अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघ गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकारांच्या हितासाठी कार्यरत आहे. संघाचे धर्मदाय कॉटन फंड समोर, वॉलकट कम्पाऊंड, अमरावती येथे अद्ययावत असे पत्रकार भवन असून, ते पत्रकारांचे हक्क, एकजूट आणि व्यासपीठाचे केंद्र बनले आहे.दरवर्षी संघातर्फे पत्रकारांसाठी विविध प्रासंगिक उपक्रम, कार्यशाळा आणि सन्मान सोहळ्यांचे आयोजन करण्यात येते.जिल्ह्यातील दैनिकांचे संपादक, प्रतिनिधी, दूरचित्रवाणीचे ब्युरो चीफ, पत्रकार, छायाचित्रकार तसेच ग्रामीण भागातील पत्रकार या संघाचे सदस्य असून राज्यातीलच नव्हे तर देशभरातील ही एकमेव संघटना आहे. राज्यभरातून पुरस्कारार्थींची निवड करून भव्य स्वरूपात होणारा हा सन्मान सोहळा म्हणजे पत्रकारितेच्या मूल्यांचा आणि परंपरेचा गौरव आहे.आज ज्यांचा जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने सन्मान होतो आहे तो सन्मान म्हणजे अमरावतीकरांसाठी मोठ्या अभिमानाची बाब ठरणार आहेच शिवाय पत्रकारांच्या एकतेचा सुद्धा परिचय देणारा हा उत्सव ठरणार आहे.**

### निर्भीड पत्रकारितेचा दीपस्तंभ-प्रकाशपोहरे, प्रबंध संपादक दै. देशोन्नती



महाराष्ट्रातील निर्भीड, स्पष्टवक्ते आणि सामाजिक बांधिलकी जपणारे पत्रकार व शेतकरी नेते म्हणून मा. श्री. प्रकाशभाऊ पोहरे यांचे नाव आदराने घेतले जाते. पत्रकारितेतील चार दशकांहून अधिक काळाचा प्रदीर्घ प्रवास करत त्यांनी सत्य, न्याय आणि लोकहित या मूल्यांना कधीही तडजोड होऊ दिली नाही.'दैनिक देशोन्नती' या वृत्तपत्राचे संपादक म्हणून त्यांनी पत्रकारितेला केवळ माहितीपुरते न ठेवता समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम बनवले.राजकीय घडामोडी असोत, पर्यावरणाचे प्रश्न असोत किंवा शेतकऱ्यांच्या व्यथा प्रत्येक विषयावर त्यांनी सखोल अभ्यासपूर्ण आणि निर्भय लिखाण केले. विशेषतः त्यांच्या 'प्रहार' या सदर स्तंभातून त्यांनी सत्तेला प्रश्न विचारले, चुकीच्या धोरणांवर कठोर शब्दांत टीका केली आणि सामान्य जनतेचा आवाज बुलंद केला. कोणत्याही दबावाला न झुकता सत्याची बाजू घेणे हीच त्यांची खरी ओळख आहे.पत्रकारिता म्हणजे केवळ बातमी नव्हे, तर समाज बदलाचे साधन आहे, ही भूमिका त्यांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत जपली. त्यामुळेच त्यांना जाहीर झालेला 'स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती राज्यसेतरीय जीवन गौरव पत्रकारिता पुरस्कार' हा त्यांच्या अखंड, निर्भीड आणि मूल्यनिष्ठ पत्रकारितेचा सन्मान आहे. हा पुरस्कार म्हणजे पत्रकारितेच्या आदर्श मूल्यांना दिलेला मानाचा मुजरा आहे.

### बातमीला अर्थ देणारे पत्रकार-विलास बड, संपादक, आयबीएन १८ मराठी



इलेक्ट्रॉनिक माध्यमातील विश्वासार्ह, अभ्यासू आणि संयमी पत्रकार म्हणून मा. श्री. विलासदादा बडे यांची ओळख संपूर्ण महाराष्ट्रात आहे. आय. बी. एन. १८ मराठी या नामांकित वृत्तवाहिनीचे वृत्तनिवेदक म्हणून त्यांनी पत्रकारितेला दर्जा, खोली आणि जबाबदारी दिली आहे.पत्रकारितेतील ३० वर्षांहून अधिक अनुभव त्यांच्या प्रत्येक बातमी सादरीकरणातून जाणवतो.बातमी केवळ वाचून दाखवणे नव्हे, तर त्या बातमीमागील संदर्भ, परिणाम आणि सामाजिक अर्थ प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले. अचूक विश्लेषण, मुद्देसूद मांडणी, भाषेवरील प्रभुत्व आणि प्रसंगावधान ही त्यांच्या पत्रकारितेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळेच प्रेक्षकांमध्ये त्यांच्याविषयी विश्वास निर्माण झाला आहे.कोणत्याही विषयावर भाष्य करताना ते समतोल भूमिका घेतात. सनसनाटीपणापेक्षा तथ्यांना प्राधान्य देणारी त्यांची पत्रकारिता आजच्या काळात दिशादर्शक ठरते. त्यांच्या या प्रदीर्घ, निष्ठावान आणि गुणवत्तापूर्ण कार्याची दखल घेत त्यांना 'स्व. जुगलकिशोरजी अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार म्हणजे इलेक्ट्रॉनिक माध्यमातील जबाबदार पत्रकारितेचा गौरव आहे.

### ग्रामीण वास्तवाचा निर्भीड आवाज-वसंत घुईखेडकर, संपादक दै. नमो महाराष्ट्र

ग्रामीण पत्रकारितेत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करणारे मा. श्री. वसंतराव घुईखेडकर हे यवतमाळ जिल्ह्यातील पत्रकारितेतील एक विश्वासार्ह नाव आहे.



दैनिक नमो महाराष्ट्र या वृत्तपत्राचे संस्थापक संपादक व प्रकाशक म्हणून त्यांनी ग्रामीण समाजाचे प्रश्न मुख्य प्रवाहात आणण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे.गेल्या ३० वर्षांपासून ते शेतकरी, कष्टकरी, ग्रामीण युवक, महिला आणि सामान्य नागरिकांचे प्रश्न सातत्याने मांडत आहेत. पाणीटंचाई, शेतीमालाचे दर, प्रशासनातील दुर्लक्ष, ग्रामीण विकासातील अडचणी यावर त्यांनी नेहमीच स्पष्ट भूमिका घेतली. मोठ्या शहरकेंद्री पत्रकारितेच्या काळात ग्रामीण भागाचा आवाज दबला जाऊ नये, यासाठी त्यांनी आपल्या लेखणीद्वारे संघर्ष केला.त्यांची पत्रकारिता ही लोकाभिमुख, वास्तववादी आणि समाजभान जपणारी आहे. त्यामुळेच त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना विभागस्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. हा पुरस्कार म्हणजे अमरावती विभागातील ग्रामीण पत्रकारितेच्या कार्याचा सन्मान आहे.

### शहरातील जनहिताचा सजग प्रहरी-प्रविण आहुजा, संपादक दै. प्रतिदिन अखबार

शहरातील नागरिकांचे प्रश्न, नागरी सुविधा, प्रशासनातील त्रुटी आणि जनहिताच्या बाबी सातत्याने मांडणारे प्रविण आहुजा हे दै. प्रतिदिन अखबारचे संपादक आहेत.



पत्रकारितेतील त्यांचा अनुभव त्यांच्या कामातून स्पष्ट दिसून येतो.शहर पत्रकारितेत त्यांनी वस्तुनिष्ठता, स्पष्टता आणि जबाबदारी यांचा समतोल राखला. सामान्य नागरिकांच्या समस्या, प्रशासनातील दुर्लक्षित मुद्दे आणि समाजहिताच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने लक्ष केंद्रित केले. त्यांची पत्रकारिता ही नेहमीच सामान्य माणसाच्या बाजूने उभी राहिली आहे. बातमीमध्ये तथ्य आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांना त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. त्यामुळेच शहरातील वाचकांमध्ये त्यांच्याविषयी विश्वास निर्माण झाला आहे. त्यांच्या या दीर्घकालीन आणि निष्ठावान पत्रकारितेची दखल घेत त्यांना जिल्हास्तरीय (शहर) पत्रकारिता पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे.

### शेतकरी आणि वंचितांचा आवाज-चंद्रकांत भड

ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी आणि शोषित समाजाच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडणारे चंद्रकांत भड हे दै. आपली मातृभूमी या वृत्तपत्राचे वरूड तालुका प्रतिनिधी आहेत. स्थानिक प्रश्नांना प्रसिद्धी मिळवून देणे हे त्यांनी आपल्या पत्रकारितेचे ध्येय मानले आहे.शेतकऱ्यांच्या अडचणी, पीकविमा, पाणीप्रश्न, ग्रामीण विकासातील त्रुटी आणि सामाजिक विषमता यावर त्यांनी निर्भयपणे लिखाण केले.



ग्रामीण भागातील वास्तव शासन आणि प्रशासनापर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले आहे.सातत्य, प्रामाणिकपणा आणि सामाजिक जाणीव ही त्यांच्या पत्रकारितेची खरी ताकद आहे. त्यामुळेच ग्रामीण पत्रकारितेतील त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना जिल्हास्तरीय (ग्रामीण) पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत आहे. पत्रकारिता क्षेत्रातील उत्तुंग व्यक्तिमत्त्व असलेल्या सर्व मान्यवरांचा आज जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने गौरव करण्यात येणार आहे. हा सन्मान केवळ व्यक्तीगत कर्तृत्वाचा नसून, मराठी पत्रकारितेची मूल्यनिष्ठ परंपरा, त्यांची जिद्द, प्रामाणिकता आणि समाजाप्रती असलेली निष्ठा यांना एका नव्या उंचीवर नेणारा ठरणार आहे.सर्व पुरस्कारप्राप्त मान्यवरांचे मनःपूर्वक अभिनंदन!

**मंगेश शं.तायडे**
सदस्य-जिल्हा मराठी पत्रकार संघ अमरावती
मो.९६७३०६०००६

# ‘व्हॅलेंटाईन डे’ पाश्चात्य विकृती



दरवर्षी १४ फेब्रुवारीला ईसाई संत व्हॅलेंटाईन यांच्या स्मरणार्थ प्रेमाचा दिवस म्हणून जगभरात साजरा केला जातो. या दिवशी आपल्या प्रिय व्यक्तीला फुले विशेषतः लाल गुलाब, चॉकलेट, गिफ्ट दिले जातात. हा दिवस पश्चिमी ईसाई धर्माचा उत्सव होता आता तो रोमँटिक प्रेमाचे प्रतीक झाले आहे. पूर्वी फक्त १४ फेब्रुवारीला व्हॅलेंटाईन डे साजरा केला जात असे आता तो रोज डे, प्रपोज डे, चॉकलेट डे, टेडी डे, प्रॉमिस डे, हग (आलिंगन) डे, किस (चुंबन) डे आणि व्हॅलेंटाईन डे म्हणून साजरा केला जातो. तर त्याचा त्यानंतरचा सप्ताह अँटी व्हॅलेंटाईन डे म्हणून साजरा केला जातो.

प्रेम ही नैसर्गिक भावना आहे म्हणूनच काही न सांगता मुलाची व्यथा आईला समजते, ठेच लागल्यावर, भीती वाटल्यावर आपल्या तोंडून आई-वडिलांचे नाव निघते. संत निरपेक्ष प्रेम करतात. गिफ्ट, फुले, चॉकलेट देऊन प्रेमाचे प्रदर्शन करत नाही हे करणे म्हणजे आपला प्रेमावर विश्वास नसल्याचे दर्शवित आहे. व्हॅलेंटाईन सप्ताह साजरे होणारे वेगवेगळे दिवस भौतिक सुख, अधर्माचारण करणारेच असतात. सनातन हिंदू धर्मात चराचरात ईश्वराचे अस्तित्व मानून सर्वांवर निरपेक्ष प्रेम प्रीती करायला शिकवते. वेगवेगळी आमिष, प्रलोभन देऊन प्रेमाची जोर जबरदस्ती केली जात नाही.

हा प्रेमाचा दिवस म्हणून साजरा केला जातो तर पुलवामामध्ये निरपराध लोकांची हत्या करणे हे प्रेमाचे कोणते स्वरूप आहे. व्यभिचार करणे, हिंदू तरुणींना फसवणे हे पण प्रेमाचे कोणते स्वरूप आहे. पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधानुकरण करण्याच्या नादात आपण त्यांचे सण उत्सव साजरे करू लागलो आहोत ही खेदाची गोष्ट आहे आणि याचे भान आज राहिलेले नाही. सनातन धर्माची महानता विदेशी लोक जाणून आपल्याकडे येऊन ते शिकून समजून घेऊन आचरणात आणत आहे आणि आत्मनंदाचा अनुभव घेत आहे. आपण करंटे आहोत जे शाश्वत, सुंदर, पवित्र आहे त्याकडे दुर्लक्ष करत आहोत आणि पाश्चिमात्य विकृती आपण जोपासत आहोत. आपला धर्म, त्याचे शिक्षण आणि आचरण करून मनुष्य जन्माचे सार्थक करणे गरजेचे आहे.

**लीना गाडगीळ**

# आठवणींची चादर ओढून प्रेमाच्या विश्वात वावरताना...

भावनांचा चाललेला कोलाहल मी शब्दात मांडतो. साचू नये मेंदूत कचरा म्हणून शब्दांनी निचरा करतो. मात्र काय करावे कळत नाही? कारण आतून शब्दांचे झरे फुटायला लागतात. अनवरत वाहतात भावना... थांबवता थांबत नाही. शब्दांच्या आश्रयाने होतात मुक्त... मात्र, आता वाटते जावे थोडे मौनात... गाठावा एकांत जिथे मनाची नसावी चलबिचल...निर्विचार, निर्विकार होऊन बघावे केवळ साक्षी बनून स्वतःला... प्रत्येक ये, जा करणारा श्वास

अनुभवत...‘व्हॅलेंटाईन डे’ साजरा करावा की नाही याविषयी बरेच मतभेद आहेत. प्रेम हे अंतरात्म्यातून फुलणारी एक तरल भावना आहे. अशा प्रेमाला व्यक्त होण्यासाठी ‘प्रदर्शनाची किंवा स्पेशल डे’ ची गरजच काय? शिवाय भारतीय संस्कृतीत इतके सणवार असताना अशा पाश्चात्य डे ची आवश्यकताच नाही असे विविध विचार प्रवाह आहेत नाही का? परंतु प्रेमाला फुलण्यासाठी, व्यक्त होण्यासाठी जो वेळ द्यावा लागतो तो असायला हवा ना...

आजच्या धकाधकीच्या जीवनात जीवन इतके गतिमान झाले आहे की, ‘लाजून हसणे अन् हसून पहाणे’ अशा गोष्टींसाठी वेळच नाही. त्यामुळे एकमेकांना ओळखायला, प्रेम व्यक्त करायला असे ‘व्हॅलेंटाईन डे’ चे निमित्त शोधले जाते. या निमित्ताने का होईना पण यंत्रमय व रुक्ष होत चाललेल्या जीवनरुपी वृक्षावर प्रेमाची पालवी फुटते. पाश्चात्यांचे अधानुकरण करणे किंवा त्यांना तिव्र विरोध करत संस्कृतीची चौकट बंदिस्त करणे या दोन्ही गोष्टी म्हणजे एकदम टोक गाठणे झाले असे होणार नाही का? अशावेळी अशा नवीन ‘डे’ज ना आपण आपल्या संस्कृतीत सामावून घेऊन आपल्या संस्काराचा रंग या पिढीच्या संकल्पनांना दिला तर...संस्कृतीच्या चौकटीची कक्षा रुंद केली तर...

खरं तर प्रेम व्यक्त करण्यासाठी कोणत्या दिवसाची वाट पहावी लागत नाही. कारण प्रेम व्यक्त करण्यासाठी चेह-यावरची लालीदेखील पुरेशी असते. तिच्या किंवा त्याच्या चेह-यावरचे हसू, नजरेचा एक कटाक्ष प्रेमाची कबुली देण्यासाठी पुरेसा असतो. पण काळाने रुपडे पालटले त्याप्रमाणे प्रेम व्यक्त करण्याच्या कन्सेप्ट बदलल्या असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. हॅशटॅगच्या जगात भावना व्यक्त करायला नानाविविध ’डे’ संस्कृती आली आहे. धावपळीच्या दुनियेत व्यक्त होण्यासाठी हे ‘डे’ मदत करतात. नेहमीप्रमाणे फेब्रुवारी महिना आला की तरुण तरुणींना वेध लागतात ते अशाच एका प्रेमाच्या दिवसाचे म्हणजेच ‘व्हॅलेंटाईन डे’ चे...

प्रेम म्हणजे एक अनोखी भावना जी आपल्या जीवनाला रंगीत बनवते. प्रेमाच्या रंगात रंगून जाणे ही एक अद्भुत अनुभूती असते. प्रेम म्हणजे एकमेकांना समजून घेणे, एकमेकांच्या खूशीत खूश असणे,



एकमेकांच्या दुःखात सहभागी होणे. तसं पाहता प्रेमाचे अनेक प्रकार आहेत. त्यातील रोमँटिक प्रेम म्हणजे दोन व्यक्तींमधील आकर्षण आणि प्रेम, पारिवारिक प्रेम म्हणजे कुटुंबातील सदस्यांमधील प्रेम, मित्रत्वाचे प्रेम म्हणजे मित्रांमधील प्रेम आणि बंध नि आत्मीय प्रेम म्हणजे स्वतःच्या आत्म्याशी असलेले प्रेम.

याच प्रेमाचे काही महत्व आहेत. प्रेम आपल्या जीवनाला अर्थ देते, आपल्याला मजबूत बनवते आणि एकमेकांशी जोडते. प्रेमात पडणे म्हणजे एक अनोखी अनुभूती असते. जेव्हा आपण प्रेमात पडतो, तेव्हा आपल्या जीवनाचा एक नवीन अध्याय सुरू होतो. याच प्रेमात पडल्याचे काही चिन्हे दिसून येतात. प्रेमात पडल्यावर हृदयाची धडधड वाढते, आपल्या चेह-यावर स्मित असते, एकमेकांना पाहण्याची इच्छा असते तसेच एकमेकांशी बोलण्याची इच्छा असते. याचप्रमाणे प्रेमात पडल्याचा अनुभव स्पष्ट जाणवतो. प्रेमात पडल्यावर आपल्याला एकमेकांप्रती आदर वाटतो, एकमेकांवर विश्वास वाटतो, एकमेकांच्या जीवनात सहभागी होण्याची इच्छा असते.

तसेच या प्रेमात काही परीक्षांना सामोरे जावं लागते. प्रेमाची परीक्षा म्हणजे प्रेमात यश आणि अपयशाची कारणे. त्यातील यशाची कारणे म्हणजेच प्रेमात यशासाठी संचार, विश्वास, समजूतदारपणा आणि सहिष्णुता महत्वाचा असतो. याच गोष्टींचा अभाव हा अपयशास कारणीभूत ठरतो. प्रेम आणि विवाहातील संबंध आणि महत्त्व पाहता प्रेम अनोखा असतो. विवाह म्हणजे दोन व्यक्तींमधील एक पवित्र बंध. प्रेमाची काळजी घेणे तितकेच महत्त्वाचे असते जेणेकरून प्रेम जपले जाईल. प्रेम जपले की ते वाढीस लागेल. ज्यामुळे प्रेम यशस्वी ठरण्यास मदत होईल.

***माझ्या मनात जे असते***
***तेच तिच्या मनात असते***
***ते जगाला दिसत नसते***
***जग उगाच भ्रमात असते***

**सुनील शिरपुरे,**
यवतमाळ
मो.-७०५७१८५४७९

# भारतीयांसाठी ‘काळा दिवस’



आतंकवाद हा आज मितीला साऱ्या जगाची डोकेदुखी बनला आहे. स्वातंत्र्यानंतर आजतागायत भारतावर अनेक दहशतवादी हल्ले झाले ज्यामध्ये सहस्त्रो निरपराध नागरिकांसह, कितीतरी पोलीस आणि सैन्य अधिकारी मारले गेले. १४ फेब्रुवारी २०१९ या दिवशी पुलवामा येथे झालेला आतंकवादी हल्ला हा सुद्धा त्यापैकीच एक होता. भारतीय तरुण व्हॅलेंटाईन डेच्या गुलाबी वातावरणात रंगलेले असताना जम्मू काश्मीरच्या एका भागात देशासाठी कर्तव्य निभावताना देशाचे ४० तरुण सैनिक शहीद झाले तर शेकडो जण घायाळ झाले. या हल्याने अनेक कुटुंब उध्वस्त झाली. शहिद झालेल्या जवानांना समर्पित आणि या हल्याचा निषेध म्हणून भारत सरकारने १४ फेब्रुवारी हा दिवस यापुढे ‘काळा दिवस’ म्हणून पाळण्याची घोषणा केली.

पुलवामा येथे या दिवशी दुपारी ३.१५ वाजता सीआरपीएफ जवानांचा एक ताफा जम्मू काश्मीर महामार्गावरून जम्मूहून श्रीनगरला चालला होता. या ताफ्यात ७८ वाहने आणि सुमारे २५०० सैनिकांची तुकडी होती. अवंतिपुराजवळील लेथपोरा येथे ताफा पोहोचताच स्फोटकांनी भरलेली एक कार ताफ्यातील एका बसला धडकली. ज्यामुळे प्रचंड मोठा स्फोट झाला. आदिल अहमद दार नावाचा २० वर्षाचा जैश ए मोहम्मद या आतंकवादी संघटनेचा तरुण ही कार चालवत होता. या स्फोटाची तीव्रता इतकी भयंकर होती कि ज्या बसवर ती धडकली त्या बसचे रूपांतर क्षणार्धात धातूच्या ढिगाऱ्यामध्ये झाले. आजूबाजूच्या वाहनांना आगी लागल्या. जैश-ए-मोहम्मद या आतंकवादी संघटनेने या हल्ल्याचे दायित्व स्वीकारले. आदिल अहमद दारचा त्यांनी एक व्हिडीओ प्रसारित केला ज्यामध्ये तो स्वतःला फ़िदायिन म्हणवून घेत आहे. या हल्ल्यानंतर देशभर संतापाची लाट पसरली. आतंकवादी आणि त्यांच्या समर्थकांवर यापुढे कोणतीही कारवाई करण्याचे स्वातंत्र्य देशाचे पंतप्रधान नरेंद मोदी यांनी या हल्ल्यानंतर सुरक्षा दलांना दिले. जगभरात आजतागायत जे आतंकवादी हल्ले झाले त्यातील सर्वात घातक हल्यांपैकी एक असा पुलवामा हल्याचा उल्लेख केला जातो. यंदाच्या १४ फेब्रुवारीला या घटनेला ७ वर्षे पूर्ण होत आहेत. तेव्हापासून दरवर्षी हा दिवस हा देशभरात ’काळा दिवस’ म्हणून पाळला जातो. आजमितीला किती तरुणांना या दिवसाविषयी माहित आहे.

जगातील अनेक देशांत १४ फेब्रुवारीला साजरा केला जाणारा ‘व्हॅलेंटाईन डे’ हा काही भारतीय सण नाही. तरीही तो देशभरात उत्साहाने साजरा केला जातो. तरुणांमध्ये या दिवसाची अधिक क्रेझ असते. या दिवसाला अधिक रोमँटिक करण्यासाठी वृत्तवाहिन्या, विविध चॅनल्सवर चालणारे डेलीसोप, बॉलिवूड कलाकार आणि त्यानिमित्ताने आपला व्यवसाय चालवणाऱ्या कंपन्या त्यामध्ये भर घालत असतात. भारतात या दिवशी प्रेमाच्या नावाखाली स्वैराचारच अधिक चालत असल्याचे मागील काही वर्षांतील घटनांवरून लक्षात आले आहे. या दिवशी गर्भनिरोधक साधनांची मोठ्या प्रमाणात विक्री होते. हॉटेल्स, लॉज या दिवशी गजबजलेले असतात, यावरून प्रेमाच्या नावाखाली आपल्याकडे काय चालते हे लक्षात येईल. प्रेमाला आजतागायत भारतीय संस्कृतीने कधीच विरोध केलेला नाही. जगाच्या पाठीवरील निरपेक्ष आणि निस्सीम प्रेमाचे सर्वोत्तम उदाहरण द्यायचे झाल्यास भगवान श्रीकृष्ण आणि राधाराणी यांच्या नात्याचा उल्लेख करावा लागेल. प्रेम म्हणजे काय हे जाणून घ्यायचे आहे त्याने एकदा तरी भागवत वाचावे. प्रेमाच्या नावाखाली या दिवशी चालणारा बाजार कित्येक मुलींचे आयुष्य उध्वस्त करतो. व्हॅलेंटाईन डे नंतर पुढील २-३ महिन्यांत गर्भपात करून घेणाऱ्या अविवाहित मुलींचे प्रमाण कमालीचे वाढलेले असते. भारतीय संस्कृतीला न शोभणाऱ्या या दिवसाचे भारतात एव्हढे स्तोम कशासाठी? १४ फेब्रुवारी या दिवशीचे भारताच्या दृष्टीने काय महत्व आहे हे आजच्या महाविद्यालयीन तरुणांना विचारल्यास त्यापैकी ९५ टक्के मुले तरी या दिवशी व्हॅलेंटाईन डे असतो हेच उत्तर देतील, कारण आपले देशाप्रतीचे प्रेम केवळ स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन या वर्षातील दोन दिवशीच जागृत झालेले असते. भारतीयांच्या रक्षणासाठी सीमेवर अहोरात्र पहारा देणाऱ्या सैनिकांप्रती आपल्या प्रत्येकांत सद्भावना केव्हा जागृत होणार? त्यांच्या त्यागाचे आणि बलिदानाचे मोल आपल्याला केव्हा कळणार ?

**जगन घाणेकर**

# लोभस लावण्यवती !

१४ फेब्रुवारी, स्वर्गीय लावण्यवती मधुबालाचा जन्मदिन. प्रेमाचे प्रतीक असलेल्या ‘व्हॅलेंटाइन डे’ दिवशी मधुबालाचा वाढदिवस, हा सुद्धा एक योगायोग आहे. जेव्हा हिंदी चित्रपटसृष्टीतील सौंदर्याविषयी चर्चा रंगते तेव्हा मधुबाला हे नाव अग्रस्थानी असते. मधुबाला ही हिंदी चित्रपटसृष्टीतील एक आघाडीची अभिनेत्रीच नव्हती तर ती भारतीय सौंदर्याचा मापदंड होती. जाणकारांच्या मते तिच्याइतकी सुंदर अभिनेत्री तिच्या आधीही व तिच्यानंतरही हिंदी चित्रपट सृष्टीत झाली नाही.

अलौकिक सौंदर्याचे देणे लाभलेल्या आणि विलक्षण अभिनय क्षमतेच्या मधुबालाने ‘बॉम्बे टॉकीज’च्या ‘बसंत’ (१९४२) या चित्रपटातून ‘बेबी मुमताज’ या नावाने रुपेरी पडद्यावर पदार्पण केले. याच चित्रपटात ‘मेरे छोटेसे मनमे छोटीसी दुनिया रे’ हे गाणं पडद्यावर गाऊन भरपूर टाळ्याही घेतल्या होत्या. ‘बसंत’नंतर सहा चित्रपटांतून ‘बालकलाकार’ म्हणून काम करताना तिने आपल्या अभिनयाची चुणूक दाखवायला सुरुवात केली होती. बेबी मुमताजचं सौंदर्य पाहून अभिनेत्री देविकारानी फारच प्रभावित झाल्या आणि त्यांनी तिचे नाव बदलून मधुबाला ठेवले. तथापि, १९४७ ला प्रदर्शित झालेल्या ‘नीलकमल’ या राजकपूर नायक असलेल्या चित्रपटाने तिला ‘व्हीनस ऑफ स्क्रीन’ केले आणि त्यानंतर जवळजवळ दीड दशक तिने हिंदी चित्रपटसृष्टीवर राज्य करताना लोकप्रियतेचे अत्युच्च शिखर गाठले. १९४९ साली आलेल्या कमाल अमरोहीच्या ‘महल’मध्ये ’आएगा, आएगा, आएगा आनेवाला’ या गाण्यामुळे मधुबाला व लता मंगेशकर दोघीही प्रकाशझोतात आल्या.

आपल्या मोहक हास्याने आणि भावोत्कट अभिनयाने तीन पिढ्यांना घायाळ केलेल्या मधुबालाने ७० हून अधिक हिंदी चित्रपटांतून भूमिका साकारल्या. महल, बरसात की एक रात, चलती का नाम गाडी, मिस्टर अँड मिसेस ५५, काला पानी, मुगल-ए-आझम आदी चित्रपटातल्या तिच्या भूमिका आजही रसिकांच्या स्मरणात आहेत. रसरशीत आणि उत्साही सौंदर्याचं प्रतीक असलेल्या मधुबालाच्या अभिनयाचे मास्टर स्ट्रोक रसिकांच्या हृदयात शिल्पा सारखे कोरले आहेत. मधुबालाने तत्कालीन प्रसिद्ध अभिनेते अशोक कुमार, राजकुमार, दिलीप कुमार, सुनील दत्त, देव आनंद, शम्मीकपूर आदींसोबत काम केले असून गीता बाली, सुरैया, निम्मी आदी प्रसिद्ध नायिकांसोबतही अभिनय केला आहे, तर ‘महलोके ख्वाब’या चित्रपटाची निर्मितीही केली आहे.

१९५० ते १९५७ पर्यंतचा काळ मधुबालासाठी थोडासा वाईट होता. या दरम्यान तिचे अनेक चित्रपट अयशस्वी झाले. मात्र, त्यानंतर १९५८ मध्ये आलेले ‘फागुन’, ‘हावडा ब्रिज’, ‘कालापानी’ आणि ‘चलती का नाम गाडी’ या चित्रपटांमुळे मधुबाला पुन्हा एकदा प्रसिद्धीच्या झोतात आली. ‘हावडा ब्रिज’ मधील मधुबालाने साकारलेली एका क्लब डान्सरची भूमिका फारच गाजली. या चित्रपटातील तिच्या अदांनी प्रेक्षक घायाळ झाले होते. तर यानंतर आलेल्या ‘चलती का नाम गाडी’ सिनेमात आपल्या अभिनयाने तिने प्रेक्षकांना खळखळून हसवलं होतं. मधुबाला आणि दिलीप कुमार ही जोडी प्रेक्षकांनी सर्वाधिक पसंत केली. तराना चित्रपटाच्या चित्रीकरणावेळी मधुबाला आणि दिलीप कुमार यांच्यातील प्रेमाचे सूर जुळू लागले होते. तथापि मधुबालाचे वडील अताऊल्लाखान यांना हे प्रेम मान्य नसल्याने ते पूर्णत्वास जाऊ शकले नाही.

त्यानंतर मुघल-ए-आझम चित्रपटाच्या चित्रीकरणा वेळी मधुबालाची तब्येत फार बिघडली. आपल्या सौंदर्याची आणि आरोग्याची काळजी राखण्यासाठी मधुबाला घरात उकळलेल्या पाण्याशिवाय काहीच खात- पित नव्हती. मात्र जैसलमेरच्या वाळवंटातील चित्रीकरण तिला मानवले नाही. शिवाय मधुबालाच्या शरीरावर जड लोह्याचे साखळदंडही लादण्यात आले होते. मात्र या पूर्ण काळात मधुबालाने एकदाही तक्रार केली नाही आणि चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण केले.

१९६० मध्ये मुगल-ए-आझम प्रदर्शित झाला आणि पहिल्या दिवसापासूनच दर्शकांनी मधुबालाचा अभिनय डोक्यावर घेतला. आजही मधुबालाचं नाव घेतलं की अनेकांच्या तोंडी पहिला चित्रपट मुगल-ए-आझमच येतो. ६० च्या दशकात मधुबालाने चित्रपटात काम करणे फार कमी केले. चलती का नाम गाडी आणि झुमरू चित्रपटाच्या चित्रीकरणावेळी किशोर कुमार आणि मधुबाला भावनिकरित्या फार जवळ आले होते. याचवेळी अताउल्लाह खान यांनी किशोर कुमार यांना मधुबाला उपचारां साठी लंडनला जात असून परत ल्यावर दोघं लग्न करू शकतात असे सांगितले. तथापि, मधुबाला ला आपल्या आजाराची चाहूल लागल्याने मधुबालाची इच्छा पूर्ण करण्यासाठी किशोरकुमार यांनी तिच्याशी लग्न केले. मात्र मधुबालाची तब्येत बिघडत गेली. यावेळी तिचे पासपोर्ट, झुमरू, बॉयफ्रेंड, हाफ तिकट(१९६१-१९६२) आणि शराबी (१९६४) हे चित्रपट प्रदर्शित झाले. तथापि, १९६४ मध्ये मधुबालाने पुन्हा जोमाने काम करायला सुरुवात केल्यानंतर चालाक चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या पहिल्याच दिवशी ती सेटवर बेशुद्ध पडली आणि हा चित्रपट बंद करावा लागला. चित्रपटत जगतातील मधुबाला यांचा प्रवास खूप कमी काळाचा ठरला. केवळ ३६ वर्षांच्या असताना २३ फेब्रुवारी १९६९ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांना विनम्र आदरांजली. (संकलित).

**प्रा. विजय कोष्टी**

# सौंदर्याची खाण

आज १४ फेब्रुवारी, बॉलिवूडची मर्लिन मनरो, सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान, चित्रपट सृष्टीतीलच नव्हे तर भारतातील सर्वात सुंदर महिला असे जीचे वर्णन केले जाते त्या मधुबाला यांचा आज जन्मदिन. आज त्यांची ९३ वि जयंती. १४ फेब्रुवारी १९३३ रोजी दिल्लीच्या एका पश्तून कुटुंबात जन्मलेल्या मधुबाला यांचे मूळ नाव मुमताज बेगम जहाँ देहलवी. असे म्हणतात की मधुबाला यांच्या जन्मानंतर एका व्यक्तीने तिच्या बाबत असे भविष्य वर्तवले होते की ती तिच्या आयुष्यात खूप ख्याती मिळवेल. पैसा अडका, धन संपत्ती मिळवेल पण तिचे आयुष्य अतिशय दुःखी असेल. या भविष्यावर विश्वास ठेवून तिचे वडील तिला मुंबईला घेऊन आले. वयाच्या नवव्या वर्षी म्हणजे १९४२ साली मधुबाला यांनी बेबी मुमताज या नावाने चित्रपटात भूमिका करण्यास सुरुवात केली. बाबुराव पटेल आणि डॉ सुशीलाराणी पटेल या दाम्पत्याचा मधुबाला वर विशेष लोभ होता त्यांनीच तिला मधुबाला हे नाव दिले. बालवयातच चित्रपटात काम करू लागल्याने मधुबाला या शाळेत जाऊ शकल्या नाहीत त्यामुळे त्यांना इंग्रजी येत नसे मात्र उर्दू भाषा येत होती. चित्रपटात भूमिका करण्यास सुरवात केल्यावर मात्र तिने इंग्रजीवर चांगले प्रभुत्व मिळवले. तिचे वडील कडक शिस्तीचे असल्याने ती कधीही चित्रपटाच्या प्रीमियरला उपस्थित राहत नसे.



१९४७ साली आलेल्या निलकमल या चित्रपटात ती पहिल्यांदा अभिनेत्री म्हणून झळकली. याच वर्षी तिचा आणखी एक चित्रपट रिलीज झाला. पुढच्या वर्षी म्हणजे १९४८ साली तिचा ‘अमर प्रेम’ नावाचा चित्रपट आला या सर्व चित्रपटात राज कपूर हे तिचे नायक होते. यानंतर बॉम्बे टॉकीजचा ‘महल’ नावाचा चित्रपट आला हा चित्रपट सुपर डुपर हिट ठरला. यानंतर मात्र मधुबाला यांनी मागे वळून पाहिले नाही. अशोक कुमार, दिलीपकुमार, देवानंद या त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्यांसह तिने भूमिका केल्या. अल्पावधीतच त्या बॉलिवूडच्या आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. त्यांनी आपल्या करियरमध्ये ६६ चित्रपटात भूमिका केल्या. बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार दिलीपकुमार यांच्यावर त्या एकतर्फी प्रेम करत असत. मुघले आझम चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान त्यांनी दिलीपकुमार यांच्याशी लग्न करण्याची इच्छा बोलून दाखवली मात्र दिलीपकुमार यांनी लग्नास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर त्यांनी गायक किशोरकुमार यांच्याशी विवाह केला. मधुबाला या किशोरकुमार यांच्या चौथ्या पत्नी होत्या. किशोरकुमार यांच्या बरोबरचे लग्न ही बाब दोघांसाठी कसेतरी जगण्यासाठी केलेली तडजोड होती त्यामुळेच दोघांचे जास्त पटत नसे. मधुबाला यांना हृदय रोग होता आणि १९५० पासून त्यांच्यावर उपचार चालू होते. पण तिने ही गोष्ट सर्वांपासून लपवून ठेवली होती. तिची तब्येत बरी नसतानाही त्यांनी निर्माते दिग्दर्शकांचे नुकसान होऊ नये म्हणून साइन केलेले चित्रपट पूर्ण केले.

या चित्रपटात असे कोठेही जाणवत नव्हते की त्या आजारी आहेत. हृदय रोगासोबत त्यांना असा एक आजार होता की ज्या आजाराने शरीरात प्रमाणापेक्षा अधिक रक्त तयार होत असे व तिच्या नाकातून व तोंडातून रक्तस्त्राव होत असे. इतक्या दुर्धर आजारातही तिने चित्रपटात काम करणे सुरूच ठेवले. मुघले आझम या चित्रपटातील एका दृश्यात तिला दोरखंडाने बांधले होते पण तिने तब्येत बरी नसतानाही ते सहन केले. ती म्हणायची अनारकलीची भूमिका करण्याची संधी पुन्हा मिळणार नाही. ती इतकी प्रोफेशनल होती की आपले काम अतिशय तन्मयतेने करत असत. प्रसंगी जेवण झाले नाही तरी चालेल, थर्ड क्लासने प्रवास करावा लागला तरी चालेल पण काम वेळेच्या वेळी पूर्ण करण्याचा तिचा आग्रह असे. तिच्या याच कामाच्या निष्ठेमुळे ती महान अभिनेत्री बनली. अमेरिकेच्या थिएटर आर्टस या जगप्रसिद्ध मासिकेने तिचा जगातील सर्वात मोठी अभिनेत्री म्हणून गौरव केला होता. तिच्या सौंदर्याची जादूच अशी होती की बघणारा हरखून जायचा. पण हेच आरस्पानी सौंदर्य तिच्यासाठी मात्र शापित ठरले.

वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. २३ फेब्रुवारी १९६९ साली त्यांनी जगाचा निरोप घेतला. मधुबालाला व्हीनस ऑफ स्क्रीन असे म्हटले जाते मात्र तिच्या याच आरस्पानी सौंदर्याला अल्पायुष्याचा शाप होता. आज त्या जाऊन ५७ वर्ष झाले मात्र तिच्या सौंदर्याची आणि अभिनयाची जादू आजही कायम आहे. सौंदर्याची खाण बॉलिवूडची शान असलेल्या मधुबाला यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**

# सर्वोपचार रुग्णालयात उद्धट वागणुकीवरून खळबळ

## आ. पठाण यांची माघार, तरीही व्यवस्थेला इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

*जिल्ह्यातील सर्वोपचार रुग्णालय, अकोला पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. गुरुवारी अचानक केलेल्या पाहणीदरम्यान अनेक गंभीर त्रुटी निदर्शनास आल्याचा दावा आ. पठाण यांनी केला. रुग्णांना मिळणाऱ्या सुविधांचा दर्जा, स्वच्छतेची अवस्था, डॉक्टरांची अनुपस्थिती तसेच वॉर्डमधील नर्सेस, वार्डबॉय आणि सुरक्षा रक्षकांकडून मिळणाऱ्या कथित उद्धट वागणुकीच्या तक्रारींमुळे वातावरण चांगलेच तापले.*



मागील काही महिन्यांपासून रुग्णालयातील एकूणच व्यवस्था कोलमडल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने येत होत्या. विशेषत: रुग्णांना दिल्या जाणाऱ्या जेवणाच्या दर्जाबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत होती. काही ठिकाणी अन्न निकृष्ट दर्जाचे असल्याचे, तर काही वॉर्डमध्ये स्वच्छतेचा अभाव असल्याचे पाहणीत समोर आले. अनेक वेळा डॉक्टर वेळेवर उपलब्ध नसल्याच्या तक्रारीही रुग्णांनी केल्याचे आ. पठाण यांनी प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे. पाहणीदरम्यान मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. रुग्णांना देण्यात येणारे जेवण प्रत्यक्ष तपासून त्यामध्ये तातडीने सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले. वॉर्डनिहाय पाहणी करताना काही ठिकाणी रुग्णांच्या तक्रारी, तर काही ठिकाणी प्रशासनाच्या मर्यादा आणि मनुष्यबळाची कमतरता समोर आल्याचे सांगण्यात आले. रुग्ण व नातेवाईकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेण्यात आल्या.

दरम्यान, एका वॉर्डमध्ये महिला रुग्ण व तिच्या नातेवाईकांनी तेथे उपस्थित असलेल्या नर्स व सुरक्षा रक्षकांकडून मिळणाऱ्या कथित उद्धट वागणुकीबाबत तक्रार केली. त्यानंतर आ. पठाण यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना कणखर शब्दांत जाब विचारला. या घटनेनंतर काही कर्मचारी संतप्त झाल्याची माहिती समोर आली. याबाबत नर्स स्टाफकडूनही प्रतिक्रिया समोर आली असून, 'आमदार महोदयांनी उद्धट भाषेचा वापर केला,' असा आरोप काही कर्मचाऱ्यांनी केल्याची चर्चा आहे. त्यावर प्रत्युत्तर देताना आ. पठाण म्हणाले, 'मी जनतेला परिपूर्ण आरोग्य सेवा मिळावी यासाठी कर्मचाऱ्यांना धारेवर धरले. जर माझ्या बोलण्यामुळे कोणाला वाईट वाटले असेल, तर मी माघार घेतो व दिलगिरी व्यक्त करतो. मात्र, उद्या जर गरजू रुग्णांना योग्य आरोग्य सेवा मिळाली नाही, तर संबंधित आरोग्य कर्मचाऱ्यांना कार्यवाहीसाठी माझ्यासमोर उभे राहावे लागेल.' 'तुम्ही गरजू रुग्णांना खरी सेवा न देता उलट उद्धट भाषेचा वापर करता, हे योग्य आहे का? रुग्णांशी आरोग्य कर्मचारी माफी मागतील का?' असा थेट सवालही त्यांनी उपस्थित केला. लोकप्रतिनिधी म्हणून रुग्णांच्या तक्रारी विचारणे हा आपला अधिकार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रुग्णसेवा विस्कळीत होऊ नये आणि कामकाजावर परिणाम होऊ नये, या उद्देशाने आपण माघार घेत असल्याचे त्यांनी जाहीर केले असले तरी, व्यवस्थेला स्पष्ट इशारा दिला आहे. रुग्णालयातील विविध सेवा पुरविण्याचे कंत्राट एकाच कंपनीला देण्यात आल्याचा मुद्दाही त्यांनी ऐरणीवर आणला. जेवण व्यवस्था, स्वच्छता, सुरक्षा आदी सेवांबाबत संबंधित कंपनीची जबाबदारी निश्चित करण्यात येणार असून, आगामी अधिवेशनात या कंपनीलाही जाब विचारला जाईल, असा इशाराही आ. पठाण यांनी दिला. या संपूर्ण घडामोडींमुळे सर्वोपचार रुग्णालयातील व्यवस्थापन, कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांच्यातील तणाव उघडपणे समोर आला असून, आता प्रशासन कोणती ठोस पावले उचलते याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# रमाई आवास योजनेचा कारभार 'थंड बस्त्यात'

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरी भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नागरिकांना घरबांधणीसाठी आर्थिक मदत देणाऱ्या रमाई आवास (म.न.पा.) योजनेचा कारभार मागील दहा वर्षांपासून थंड बस्त्यात पडल्याचा गंभीर आरोप वंचित बहुजन युवा आघाडीने केला आहे. यासंदर्भात झालेल्या बैठकीत समितीच्या इतिवृत्तावरून आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोणे यांना प्रश्नांची सरबत्ती करत प्रशासनाला तात्काळ कार्यवाही करण्याची तंबी दिली.

आघाडीच्या माहितीनुसार, सन २०१० ते २०१६ या कालावधीत मंजूर १२२५ घरकुलांपैकी तब्बल १२३ घरकुले नियमबाह्य प्रक्रियेच्या कारणास्तव गेल्या दहा वर्षांपासून प्रलंबित आहेत. तसेच ३६१.१३ लाख रुपयांचा निधी अद्याप अखर्चित असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले. विशेष म्हणजे २०१६ पासून २०२६ पर्यंत नव्या उद्दिष्टाची मागणीच महापालिका प्रशासनाने शासनाकडे केली नसल्याचा आरोप करण्यात आला.



### १० वर्षांपासून १२३ घरकुले प्रलंबित

आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, योग्य निवारा हा भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ अंतर्गत जीवनाच्या मूलभूत अधिकाराचा भाग असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. ?

अशा परिस्थितीत पात्र लाभार्थ्यांना घरकुलापासून वंचित ठेवणे म्हणजे त्यांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन असल्याचा आरोप त्यांनी केला.

'दहा वर्षांपासून योजनेबाबत कोणतीही ठोस उपाययोजना न करणे संतापजनक आहे. तात्काळ कामकाजात सुधारणा करून प्रलंबित घरकुले मंजूर करावीत, अन्यथा वंचित बहुजन युवा आघाडी तीव्र आंदोलन छेडेल,' असा इशारा यावेळी देण्यात आला.

यावेळी जिल्हाध्यक्ष श्रीकांत घोगरे, जिल्हा महासचिव राजकुमार दामोदर, सचिन शिराळे, आकाश जंजाळ, सुरज दामोदर, आकाश गवई, जय तायडे, नागेश उमाळे, आशिष सोनोने, राजेश बोदडे, गोलू खिल्लारे, नितीन प्रधान, सचिन डोंगरे, अमोल वानखडे, सारनाथ मोहोड, संतोष इंगळे, अंकुश इंगळे, सेवानंद इंगळे, अमोल शिरसाट आदी उपस्थित होते.


# कार्यालय नगर परिषद तेल्हारा, जि. अकोला

## स्वच्छता विभाग

### जाहिर ई-निविदा सूचना (दुसरी वेळ)

मुख्याधिकारी नगर परिषद तेल्हारा जि. अकोला तर्फे याद्वारे जाहिर ई-निविदा सूचना आमंत्रित करण्यात येत आहे.

कामाचे टेंडर id 2026_DMA_1277987_1 आहे. सदर निविदेची अटी शर्ती व इतर सविस्तर माहिती http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर पावयास उपलब्ध आहे.

**स्वा/ -**
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, तेल्हारा


# शनिवारी रियल इस्टेट सल्लागार अभिकर्ता वेल्फेअर युनियनचा संवाद कार्यक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

राष्ट्रीय स्तरावर कार्यरत व महानगरात सेवारत असणाऱ्या भारतीय रियल इस्टेट सल्लागार अभिकर्ता वेल्फेअर युनियनच्या वतीने रिअल इस्टेट कायदे विषयक जनजागरण संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता कृषी विद्यापीठातील कृषक भवनात आयोजित या संवाद कार्यक्रमाचे उद्घाटन आ. रणधीरभाऊ सावरकर, जिल्हाधिकारी सौ वर्षा मीना, महापौर शारदा खेडकर, नरडकोचे महानगर अध्यक्ष व युनियनचे मार्गदर्शक सुनील इन्नानी यांच्या उपस्थिती त होत आहे. या संवाद कार्यक्रमात इस्टेट, निर्माण व्यवसायिक, सल्लागार, इस्टेट अभिकर्ते, बिल्डर्स व विकासक आदींचा समन्वय संवाद होऊन या क्षेत्रातील होणारे बदल, कायदेविषयक भूमिका आदींचा आदींवर मंथन होणार आहे. या संवाद सोहळ्याचे समापण सायंकाळी ७ वाजता खा अनुप धोत्रे, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, मनपा आयुक्त डॉ सुनील लहाने यांच्या उपस्थितीत होणार आहे. भा.री.इ.स.ए.वे युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष राजवीर सिंह, राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष इंजि संजय कृपान, राष्ट्रीय उपाध्यक्ष संजय खोब्रागडे, प्रदीप मनवर, राष्ट्रीय सचिव मोहन बडवाईक यांच्या मार्गदर्शनात महानगरात पहिल्यांदाच होत असणाऱ्या या रिअल इस्टेट कायदेविषयक जनजागरण संवाद कार्यक्रमात जिल्ह्यातील इस्टेट व्यावसायिक, सल्लागार, अभिकर्ते, बिल्डर्स व विकासक यांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा असे आवाहन युनियनचे जिल्हाध्यक्ष आतिष तायडे, कार्यकारी अध्यक्ष निलेश देशपांडे, उपाध्यक्ष अजय गवळी, श्याम डोंगरे, सचिव विठ्ठल चिंतामणे, सहसचिव प्रमोद घोरड, कोषाध्यक्ष वीरेश ढोके, सहकोषा ध्यक्ष आशिष देवकते, मीडिया प्रमुख पवन वानखडे, उपप्रमुख अजय आवंडेकर, जनसंपर्क अधिकारी शिवाजी गावंडे, सदस्य वासुदेव पावशे, प्रमोद गवई, प्रमोद शेंडे आदींनी केले आहे.

# नरनाळा महोत्सवात 'इन्व्हेस्टर्स मीट'

## पर्यटन क्षेत्रातील संधींबाबत मंथन

■ प्रतिनिधी | अकोला ■

नरनाळा निसर्ग महोत्सवात गुंतवणूकदारांची परिषद (इन्व्हेस्टर्स मीट) दि. १७ फेब्रुवारी रोजी दु. २ वा. शहानूर येथे आयोजित करण्यात आली असून, पर्यटन विकासाच्या शक्यता, संधींबाबत माहिती देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील गुंतवणूकदारांनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासन आणि अकोट वन्यजीव विभाग, मेळघाट व्याघ्र प्रकल्प यांच्या सहकार्याने नरनाळा महोत्सवाचे आयोजन दि. १५ ते १७ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले आहे. मेळघाटचे वनवैभव व ऐतिहासिक महात्म्य लाभलेला नरनाळा किल्ला परिसरात पर्यटन विकासाच्या अनेक शक्यता व नानाविध संधी आहेत. त्याबाबत परिषदेद्वारे माहिती देण्यात येणार आहे. या परिषदेत गुंतवणूकदारांना हेरिटेज टुरिझम, इको-टुरिझम, साहसी पर्यटन, हॉस्पिटॅलिटी. पायाभूत सुविधा, पर्यटनस्थळ विकास, व्यवसाय सुलभता, संबंधित योजना याबाबत जाणून घेता येणार आहे. तरी अधिकाधिक गुंतवणूकदारांनी या परिषदेत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना, राहूलसिंह टोलिया व जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.


## PUBLIC NOTICE

This public is to inform the public everywhere that my client Shri. Manoj Kisanrao Rawade has submitted application for loan before IDFC FIRST BANK. The purchaser deed relating to below mention property vide sale deed No. 4463/2010 dated 03/11/2010 which was given by M/s Aakar Developers through partners Dipak Madhav Nilawar and 6 others has executed in favor of Vandana Jugalkishor Atal. The above sale deed was misplaced.

Description of Property - Shop No. 10 First floor of Triveneshwar complex, which is constructed on Nazul sheet no. 26-D, Nazul Plot No. 6/1B having shop admeasuring area 210 Sq. Ft., which is bounded as under :- East - passage, West - Parking space, North - Shop No. 11, South - Shop No. 9.

The Sale deed No. 4463/2010 dated 03/11/2010 was missing, however if anyone has any rights, burden, mortgage, lien and interest or any other rights on the above immovable property, he should file an objection in writing with documentation within 7 days from the date of publication of this notice. If no objection is received in time the IDFC FIRST BANK in grant the loan as per policy. Thereafter no rights and interest will be valid. Please note this.

Akola
Dt. 13/02/2026

**Adv. Amruta Sathe (Yeole)**
Shop No. 5, Behind Jangid Bhawan,
Gayatri Nagar, Kaulkhed Road, Akola
Mob No. 7020598039



## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री मनोज किसनराव रावडे यांनी IDFC FIRST BANK यांच्या कडुन खालील मालमत्तेवर कर्ज घेण्याकरिता अर्ज सादर केला आहे. सदर मालमत्तेसंबंधीचे खरेदी दस्त क्र. ४४६३/२०१० दि. ०३/११/२०१० जे की, मे. आकार डेव्हलपर्स तर्फे भागीदार दिपक माधवराव निलावार व इतर ६ यांनी सौ. वंदना जुगलकिशोर अटल यांना खरेदी दिलेले दस्त गहाळ झाले आहे.

**मालमत्तेचे वर्णन :-** कसबे अकोला P. T. G. P. R. S. D. M. N. P. अकोला टिळक रोडवरील लक्कडगंज वस्तीतील नजुल शिट क. २६-डी, नजुल प्लॉट ६/१ बी, वरील त्रिवेणेश्वर कॉम्प्लेक्स या नावाने बांधलेल्या इमारतीतील पहिल्या मजल्यावरील दुकान क. १० ज्याचे क्षेत्र २१० चौ. फुट बांधकाम स्लॅब पर्यंत मालकी हक्क व जागेसह असलेली मालमत्ता त्यास चतु: र्सिमा ज्याची चर्तुसिमा पुर्वेस : पॅसेज, पश्चिमेस : पार्किंगजी जागा, उत्तरेस : दुकान नं. ११, दक्षिणेस : दुकान नं ९.

वरील मिळकतीवर श्री मनोज किसनराव रावडे यांनी IDFC FIRST BANK यांच्या कडुन कर्ज घेण्याकरिता अर्ज सादर केला आहे. उपरोक्त मालमत्ते संबंधीची खरेदी दस्त क. ४४६३/२०१० दि. ०३/११/२०१० जे की, मे. आकार डेव्हलपर्स तर्फे भागीदार दिपक माधवराव निलावार व इतर ६ यांनी सौ. वंदना जुगलकिशोर अटल यांना खरेदी दिलेले दस्त गहाळ झाले आहे. तरी वरील स्थावर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, ताबा व ईसार व इतर कोणत्याही प्रकारचा अधिकार असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात (७) दिवसाच्या आत लेखी कागदपत्रासंह हरकत नोंदवावी जर कोणाचीही कसल्याच प्रकारची हरकत वेळेत आली नाही तर IDFC FIRST BANK नियमाप्रमाणे कर्ज पुरवठा करून नमुद मालमत्तेवर बोजा चढवतील. त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व उजर चालणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

अकोला
दि. १३/०२/२०२६

**पक्षकारातर्फे अधिवक्ता**
ॲड. अमृता साठे (येवले).
दुकान नं. ५ जांगिड भवनच्या मागे,
गायत्री नगर, कौलखेड रोड, अकोला


### माहेश्वरी समाज ट्रस्टने ने केला चांडक व मोहता यांचा सन्मान

**अकोला :** उल्लेखनीय उपलब्धीवर माहेश्वरी समाज ट्रस्टतर्फे जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक व ॲड. मोतिसिंह मोहता यांचा सन्मान केला. राज्य शासनाने सर्वोत्कृष्ट पोलीस अधीक्षक म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांना पुरस्कृत केल्याबद्दल अकोला माहेश्वरी समाज ट्रस्टने त्यांचा सन्मान केला. पोलीस अधीक्षक कार्यालयात पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत समाज ट्रस्टचे अध्यक्ष विजयकुमार तोष्णीवाल व प्रधानमंत्री विजयकुमार राठी यांनी दुपट्टा व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला.


## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८८/२०२६ — प्रोसेस नं. १८२५/२०२६
चौ.ता. २०/०३/२०२६ — दिनांक : ०९/०२/२०२६

**अर्जदार :** १. रितिका विरेंद्र कुमार श्रीवास्तव २. प्रगती विरेंद्र कुमार श्रीवास्तव ३. अंकिता विरेंद्र कुमार श्रीवास्तव ४. निकीता विरेंद्र कुमार श्रीवास्तव ५. विरेंद्र कुमार मंगलप्रसाद श्रीवास्तव सर्व रा. श्री गजानन डुप्लेक्स नं. ४, तुकाराम हॉस्पिटल जवळ, रिंग रोड, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रतिमा विरेंद्र श्रीवास्तव
**पत्ता :-** रा. श्री गजानन डुप्लेक्स नं. ४, तुकाराम हॉस्पिटल जवळ, रिंग रोड, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रतिमा विरेंद्र श्रीवास्तव यांचे दि. २१/१२/२०१९ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


### श्री शिवजयंतीनिमित्त दोन दिवस भव्य सांस्कृतिक कार्यक्रम

**अकोला :** सांस्कृतिक कार्य संचालनालय व जिल्हा प्रशासनातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि. १८ व १९ फेब्रुवारी रोजी अकोला येथे भव्य सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे शौर्य, पराक्रम व त्यांच्या जीवनातील उदात्त मानवी मूल्यांची नवीन पिढीमध्ये रूजवणूक व्हावी या हेतूने त्यांच्या अतुलनीय शौर्यावर व कर्तृत्वावर आधारित भव्य सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. दि. १८ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित भव्य नाट्यप्रयोग होणार असून, दि. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवरायांच्या जीवनावर आधारित भव्य सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. हे दोन्ही कार्यक्रम जुन्या शहरातील गोडबोले प्लॉटमध्ये शंकरराव खंडेलवाल महाविद्यालयाच्या पद्मानंद सभागृह येथे सायं. ५ ते रा. ९ या वेळेत होणार आहेत.

# मनपा उत्तर झोन कार्यालयाजवळील अतिक्रमणावर कारवाई

## 'होटेल न्यू क्वालिटी फॅमिली रेस्टॉरंट'चे बांधकाम हटवले

■ प्रतिनिधी | अकोला ■



शहरातील अतिक्रमण विरोधातील मोहिमेला वेग देत अकोला महानगरपालिका प्रशासनाने उत्तर झोन कार्यालय परिसरात मोठी कारवाई केली. रेल्वे स्टेशनजवळील उत्तर झोन कार्यालयाच्या रस्त्याच्या जागेत अतिक्रमण करून उभारण्यात आलेल्या 'होटेल न्यू क्वालिटी फॅमिली रेस्टॉरंट'वरील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने, उपायुक्त विजय पारतवार तसेच पूर्व झोन कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त राजेश सरप यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. रस्त्याच्या जागेवर अतिक्रमण झाल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार अतिक्रमण विभागाने संबंधितांना पूर्वसूचना देऊन ही कारवाई केली. कारवाईदरम्यान सहाय्यक आयुक्त राजेश सरप, विठ्ठल देवकते, सहाय्यक अतिक्रमण निर्मूलन अधिकारी चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा, कनिष्ठ अभियंता अक्षय बोर्डे, राहुल राऊत, पूर्व झोनचे मुख्य स्वच्छता निरीक्षक शैलेश पवार यांच्यासह अतिक्रमण विभागातील कर्मचारी उपस्थित होते. यावेळी अतिक्रमित बांधकाम पाडून जागा मोकळी करण्यात आली.

शहरातील मुख्य रस्ते, सार्वजनिक जागा आणि शासकीय मालमत्तांवरील अतिक्रमणे हटविण्याची मोहीम यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. नागरिकांनी अनधिकृत बांधकाम टाळून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ७८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


# शिव गौरा विवाह महोत्सवाची तयारी पूर्ण

## आज राजेश्वर मंदिरात होईल मेहंदी संस्कार

■ प्रतिनिधी | अकोला ■

शिव गौरा विवाह महोत्सव समितीच्या वतीने महाशिवरात्री १५ फेब्रुवारीला संध्याकाळी स्थानिक रिझर्व माता मंदिर मैदानावर आयोजित भव्य शिवगौरा विवाह महोत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. विवाह स्थळी प्रेक्षकांसाठी बसण्यासाठी भव्य पंडाल उभारण्यात आला आहे. शिव गौरा विवाह उत्सव विहंगम झांकीच्या रूपात जिवंत स्वरूपात सादर करण्याचा मानस आहे.

महोत्सवात आज शनिवार १४ फेब्रुवारीला संध्याकाळी ६:३० वाजता स्थानिक राजेश्वर मंदिरात भक्तीभावाने गणेश पूजन होईल. त्यानंतर विवाहाच्या पूर्वसंध्येला माता गौराला मेहंदी लावण्याच्या प्रतीक म्हणून उपस्थित मातृशक्तींना मेहंदी लावली जाईल. त्यानंतर भव्य भजन संध्या होईल.



मुख्य उत्सव रविवार १५ फेब्रुवारीला महाशिवरात्रीच्या दिवशी दुपारी ४:३० वाजता राजेश्वर मंदिरापासून भगवान शिवाची भव्य वरात रिझर्व माता मंदिर प्रांगणापर्यंत काढली जाईल. या शिववरातीमध्ये वीरभद्र, नंदी, भूतिया आदी शिवगण झांकीच्या रूपात सहभागी होतील. ही वरात जयहिंद चौक, सिटी कोतवाली, गांधी रोड मार्गे रिझर्व माता मंदिरापर्यंत पोहोचेल आणि तिथे रात्री ८:३० वाजता भव्य शिव-गौरा विवाह होईल. सोमवार १६ फेब्रुवारीला रिझर्व माता मंदिर प्रांगणात या शिव गौरा विवाहाचा भव्य महाप्रसादासह समारोप होईल. या भव्य शिव विवाह उत्सवात सर्व महिला-पुरुष भक्तांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन शिव गौरा विवाह महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# महापशुधन एक्स्पोच्या लोगोचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते अनावरण

**वर्धा /जनमाध्यम**
महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्यावतीने १३ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत बिड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे अखिल भारतीय पशु-पक्षी महापशुधन एक्स्पो प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या एक्स्पो प्रदर्शनाच्या लोगोचे अनावरण जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले.

यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ.जगदीश बुकतरे, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय सहाय्यक आयुक्त डॉ. संजय खोपडे व इतर प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परळी वैजनाथ येथे होणारे हे प्रदर्शन देशातील जातीवंत आणि आधुनिक तंत्रज्ञान याचा संगम असणार आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसायातील जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान घरबसल्या पाहायला मिळणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पशुपालक, उद्योजक आणि शेतकरी बांधवानी मोठ्या संख्येने प्रदर्शनास भेट देऊन आपले ज्ञान व उत्पन्न वाढवावे, असे सांगितले.



राज्य व राज्याबाहेरील जातीवंत गायी, म्हशी, शेळ्या-मेंढ्या, आणि पक्ष्यांच्या विविध प्रजातींचे दर्शन या प्रदर्शनीत घडणार आहे. आधुनिक डेअरी फार्मींग, चारा नियोजन आणि प्रक्रिया उद्योगांचे भव्य स्टॉल्स असणार आहे. पशुधनाचे आरोग्य, लसीकरण आणि वैज्ञानिक संगोपन यावर तज्ञ पशुवैद्यकांची विशेष व्याख्याने आयोजित करण्यात आली असल्याचे डॉ. जगदीश बुकतरे यांनी सांगितले.

लोगोच्या अनावरणा नंतर संपूर्ण जिल्ह्यात प्रदर्शनाची व्यापक प्रसिध्दी मोहिम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय संस्था, पंचायत समिती आणि सार्वजनिक ठिकाणी बॅनर व पोस्टर्सच्या माध्यमातून जनजागृती केली जाणार आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही घरपोच माहिती देण्याचे नियोजन विभागाने केले आहे. तरी, जिल्ह्यातील सर्व पशुपालक बांधवांनी या महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे, असे पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# तुटपुंज्या मानधनावर संसार कसा चालवायचा

## सिटूचा जिल्हाधिकारी कार्यालयावर रोखठोक मोर्चा

**वर्धा /जनमाध्यम**
केंद्र व राज्य शासनाच्या कामगारविरोधी धोरणांच्या निषेधार्थ सिटूच्या नेतृत्वाखाली वर्ध्यात जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. देशभरातील दहा केंद्रीय कामगार संघटनांच्या एकदिवसीय संपाच्या पार्श्वभूमीवर हा मोर्चा काढण्यात आला होता. राज्य सचिव कॉ. यशवंत झाडे व जिल्हा सचिव कॉ. भैय्याजी देशकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कामगारांनी सहभाग घेतला.विठ्ठल मंदिर रोड येथील संघटनेच्या कार्यालया तून मोर्चाची सुरुवात झाली. बढे चौक, सोशलिस्ट चौक, निर्मल बेकरी, किराणा ओळ, सरकारी दवाखाना, पोस्ट ऑफिस चौक, आंबेडकर चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडकला. घोषणाबाजीने परिसर दणाणून गेला. शेवटी मोर्चाचे रूपांतर सभेत झाले.सभेत बोलताना कॉ. झाडे यांनी आशा-गटप्रवर्तक, अंगणवाडी सेविका-मदतनिस, शालेय पोषण आहार कर्मचारी, अंशकालीन स्त्रीपरिचर, कंत्राटी कामगार यांचे प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याची खंत व्यक्त केली. सन २०१८ पासून मानधन वाढ नाही, मासिक पेन्शन नाही, ग्रॅच्युइटी नाही. २५०० ते ३००० रुपयांत कुटुंब चालविणे शक्य आहे का असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

मोर्चेकऱ्यांनी कामगार विरोधी चार कायदे रद्द करणे, किमान वेतन २६ हजार रुपये लागू करणे, सर्व योजना कामगारांना शासकीय कर्मचा ऱ्यांचा दर्जा देणे, जानेवारी ते जून २०२५ पर्यंतचे थकीत वेतन तातडीने अदा करणे, शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्जमाफी, सार्वजनिक क्षेत्रातील खाजगीकरण थांबविणे, स्मार्टमीटर योजना बंद करणे आदी मागण्या केल्या.

# संक्षिप्त

## दुचाकीच्या धडकेत वृद्ध गंभीर जखमी

**पुलगाव :** नाचणगाव रोडवर भरधाव दुचाकीने धडक दिल्याने जानराव सोनुले (६७, रा. घारफळ, जि. यवतमाळ) गंभीर जखमी झाले. कामानिमित्त पुलगाव येथे आलेल्या सोनुले यांनी किराणा घेऊन पायदळ रस्ता ओलांडताना हा अपघात घडला. धडकेनंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी दुचाकी चालक वेदांत सावरकर (रा. कासारखेड, जि. अमरावती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## मुलाकडून वडिलांना काठीने मारहाण

**गिरड :** कौटुंबिक वादातून मुलाने वडिलांना काठीने मारहाण करून जखमी केल्याची घटना आसोला येथे घडली. पुरुषोत्तम तळवेकर (६५) असे जखमीचे नाव आहे. पत्नीशी वाद घालत असताना मुलगा सचिन तेथे आला. वाद वाढल्यानंतर संतापाच्या भरात त्याने वडिलांवर काठीने हल्ला केला. जखमींवर उपचार सुरू असून गिरड पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**पुलगाव :** पिंपळगाव शिवारात भरधाव ट्रॅक्टरने दुचाकीला धडक दिल्याने रोशन आढावू (रा. पिंपळगाव वडाळा) जखमी झाला. तो पुलगावकडे जात असताना विरुद्ध दिशेने येणाऱ्या विना क्रमांकाच्या ट्रॅक्टरने त्याच्या दुचाकीला धडक दिली. जखमीवर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी ट्रॅक्टर चालक गणेश कोल्हे (रा. मारडा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मद्यधुंदाकडून युवकास मारहाण

**खरांगणा :** ग्रामपंचायत कार्यालयाजवळ मद्यधुंद अवस्थेत शिवीगाळ करणाऱ्या व्यक्तीस विरोध केल्याने युवकास काठीने मारहाण करण्यात आली. सचिन भलावी (रा. बोरगाव सावळी) जखमी झाला आहे. दिनेश गजभिये यांनी त्याला शिवीगाळ करू नको असे सांगितल्याने वाद निर्माण झाला. तक्रारीवरून खरांगणा पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

## नाकाबंदीत ५ गोवंशांची सुटका

**खरांगणा :** गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी एकबुर्जी ते पाचोड मार्गावर नाकाबंदी करून कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या ५ गोवंशांची सुटका केली. एमएच ३२ एजे ४९६७ क्रमांकाचे वाहन अडवून जनावरे व वाहनासह ६ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पोते नेताना पडल्याने कामगाराचा मृत्यू

**देवळी :** एम. आर. जिनिंग येथे सरकीचे पोते वरच्या माळ्यावर नेताना पाय घसरून खाली पडल्याने विशाल आंबेकर (३८, रा. टिळकनगर) यांचा मृत्यू झाला. कामादरम्यान तोल जाऊन ते खाली कोसळले. सहकाऱ्यांनी रुग्णालयात नेले;

मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले. देवळी पोलिसांनी घटनेची नोंद घेतली असून तपास सुरू आहे.

# आदिवासी महिला सक्षमीकरण योजनेच्या नावावर फसवणूकीस बळी पडू नये

## आदिवासी विकास विभागाचे आवाहन

**वर्धा /जनमाध्यम**
राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजनें तर्गत आदिवासी लोकांकडून पैसे घेऊन अर्ज भरण्यात येत आहे, अशी तक्रार आदिवासी विकास विभाग कार्यालयास प्राप्त झाली आहे. त्यामध्ये योजनेचे नाव वापरुन गट व वैयक्तिक रित्या पैसे घेऊन आदिवासी जनतेची फसवणूक केली जात आहे. त्यामुळे अशा फसवणूकीला बळी पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजनेंतर्गत मंजूर यादीमध्ये समाविष्ट असलेल्या महिला लाभार्थ्यास १०० टक्के अनुदान देण्याची तरतूद आहे. त्यानुसार लाभार्थी निवड करुन निवड यादीमध्ये समाविष्ट महिला लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदान दिले जाते. यासंबंधी बाहेरील व्यक्तीने पैशाची मागणी केली अथवा कुठलीही अडचण आल्यास थेट प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयास संपर्क साधावा. सदर प्रकरणाच्या विरोधात पोलिसांकडे तक्रार करुन प्रकल्प कार्यालयाद्वारे कार्यवाही करण्यात आली

# जिल्हा सामान्य रुग्णालयात युनानी दिन साजरा

**वर्धा /जनमाध्यम**
राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत ११ फेब्रुवारी हा हकिम अजमल खान यांचा जन्म दिवस जागतिक युनानी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयात युनानी दिवस साजरा करण्यात आला.

यावर्षीच्या जागतिक युनानी दिनाची थीम 'युनानी पध्दतीमे नवाचार और साक्ष्य' अशी आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या आयुष विभागात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ व आयुष अधिकारी संदीप नखाते यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आलेल्या युनानी दिन कार्यक्रम प्रसंगी हकिम अजमल खान यांच्या फोटोला अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कल्पना




सुनतकरी यांनी हार अर्पण अभिवादन केले.यावेळी सामान्य रुग्णालयाच्या युनानी वैद्यकीय अधिकारी डॉ. रेहान खान, डॉ. शगुत्फा अहमद, डॉ. सिमा लोहकरे, डॉ.अश्विनी डोणे, डॉ. योगिता भेंडे, शंकर तायडे, मनिषा कलवडे, अरुणा भागवत, दिव्या कनेरी, प्रमादे इटनकर आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. कल्पना सुनतकरी यांनी युनानी दिवसाचे महत्व सांगून युनानी चिकित्सा पध्दतीवर मार्गदर्शन केले. व युनानी पध्दतीचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

युनानी दिनानिमित्त उपजिल्हा रुग्णालय आर्वी, हिंगणघाट, ग्रामीण रुग्णालय, पुलगाव येथील आयुष विभागात देखील विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.


## कार्यालय ग्राम पंचायत नांदोरा (ड)
## पंचायत समिति देवळी, जिल्हा परिषद वर्धा

# निविदा सूचना

सर्व नोदणीकृत कंत्राटदारास सूचित करण्यात येते की, ग्राम पंचायत नांदोरा (ड) येथे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात १५ वा वित्त आयोग अंतर्गत मंजूर प्राकलनानुसार कामाकरिता पंजीबद्ध कंत्राटदाराकडुन निविदा मागविण्यात येत आहे. कोरी निविदा फॉर्म प्रसिद्धीच्या दिनांकापासून दिनांक १४/०२/२६ ते २१/०२/२६ पर्यन्त कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.

| अ. क्र. | योजनेचे नाव | कामाचे नाव | प्राकलनीय किमत व तांत्रिक मंजूरी क्रं. | निविदा फी | सुरक्षा ठेव १% | कामाचा कालावधी | निविदा स्वीकृतीचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५ वा वित्त आयोग अंतर्गत पाईप नाली बांधकाम करणे | पाईप नाली बांधकाम करणे | २४४००० /-Ts. No. ३८ १५ वाविआ/ २५-२६ | १०००/- | २४४०/- | ६ महीने | दि. २१/०२/२६ ला दुपारी ५ पर्यन्त | दि. २४/०२/२६ किवा मासिक सभेच्या दिवशी |
| २ | १५ वा वित्त आयोग अंतर्गत ओपन रोड बांधकाम करणे | ओपन शेड बांधकाम करणे | २१८००० /-Ts. No. ३९ १५ वाविआ/ २५-२६ | १०००/- | २१८०/- | ६ महीने | दि. २१/०२/२६ ला दुपारी ५ पर्यन्त | दि. २४/०२/२६ किवा मासिक सभेच्या दिवशी |
| ३ | १५ वा वित्त आयोग अंतर्गत सोलर सिस्टम बसविणे | सोलर सिस्टम बसविणे | २००००० /-Ts. No. १३४२ १५ वाविआ/ २५-२६ | १०००/- | २०००/- | ६ महीने | दि. २१/०२/२६ ला दुपारी ५ पर्यन्त | दि. २४/०२/२६ किवा मासिक सभेच्या दिवशी |

**टीपः** अटी व शर्ती ग्राम पंचायतचे सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

**सरपंच**
ग्राम पंचायत नांदोरा (ड)

**सचिव**
ग्राम पंचायत नांदोरा (ड)
पं.स. देवळी जि.प.वर्धा


# आज राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**वर्धा /जनमाध्यम**
जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये दि.१४ मार्च रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालत मध्ये मोठ्या प्रमाणात प्रकरणे ठेवून निकाली काढावी, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हेमंत गायकवाड तसेच जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस.ए.एस. एम.अली यांनी केले आहे.

न्यायालयात तडजोड पात्र प्रलंबित प्रकरणे आपसी सामंजस्यातून तडजोडीद्वारे निकाली काढण्यासाठी लोक अदालत हे प्रभावी माध्यम ठरले आहे. यामुळे पक्षकारांना वेळ, खर्च आणि मानसिक त्रास टाळता येतो. दोन्ही पक्षकारातील संबंध सलोख्याचे राहतात. तसेच लोक अदालतीमुळे न्यायालयातील प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्यामध्ये मोठ्या प्रमाणात यश प्राप्त झाले आहे.

न्यायालयात दाखल असलेली सर्व तडजोड पात्र प्रलंबित प्रकरणे, दिवाणी दावे तसेच वाद दाखलपूर्व तडजोड पात्र प्रकरणे येत्या राष्ट्रीय लोकअदालतीत तडजोडीने निकाली काढण्यासाठी ठेवण्यात येणार आहे. जिल्हा मुख्यालयासह जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयामध्येही सकाळी १० वाजता लोक अदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे.या लोक अदालतीमध्ये दिवाणी व तडजोड पात्र फौजदारी प्रकरणे, एनआय ॲक्टची प्रकरणे, भूसंपादन, कौटुंबिक, मोटार वाहन अपघात दावा, एमएसईबीची प्रकरणे, दरखास्त, ग्राहक तक्रार न्याय निवारण प्रकरणे, कामगार न्यायालयातील प्रकरणे, न्यायालयातील प्रलंबित बॅंकेशी संबंधित प्रकरणे तसेच वाद दाखलपूर्व प्रकरणांमध्ये टेलिफोन, मोबाईल कंपनी संबंधित, राष्ट्रीयकृत बॅंक, पतसंस्था, ग्रामपंचायत तसेच नगरपरिषद येथील पाणीपट्टीचे प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ठेवण्यात येणार आहे.लोक अदालतीत पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची संधी मिळते तसेच दोन्ही पक्षकारांना मान्य असलेली तडजोड पक्षकारांच्या सहमतीने होते. राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये झालेल्या न्याय निवाड्याचे, तडजोडीचे समाधान दोन्ही पक्षकारांना होते. त्यामुळे राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये मोठ्या प्रमाणात तडजोडीसाठी प्रकरणे ठेवावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव विवेक देशमुख यांनी केले आहे.


जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक,प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती -४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा ४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक -प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त)-अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती **वर्ष** -१४ **अंक**- ८०
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालयः- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन -९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com
abhiramdeshpande@gmail.com


**वर्धा /जनमाध्यम**
फुले-शाहू-डॉ. आंबेडकरांचा वैचारिक व शैक्षणिक वारसा पुढे नेणाऱ्या अनूपकुमार सरांच्या कृतिशील, प्रामाणिक आणि प्रेरणादायी कार्यासाठी संपूर्ण समाजाने त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे. आर्थिक सहकार्य करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पाहिलेले उच्च शिक्षित बहुजन समाजाचे स्वप्न नालंदा अकॅडमीच्या माध्यमातून साकार करावे, असे आवाहन प्रा. डॉ. माधुरी झाडे यांनी केले.

रमाई फाऊंडेशन तर्फे नालंदा अकॅडमी, वर्धा येथे रमाबाई आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी




# नालंदा अकॅडमीच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांचे स्वप्न साकार करण्याचा संकल्प

देवराव कांबळे (माजी जिल्हा व सत्र न्यायाधीश) तर नालंदा अकॅडमीचे संचालक अनूपकुमार मंचावर उपस्थित होते.

प्रा. झाडे म्हणाल्या, अवघ्या ३७ वर्षांच्या आयुष्यात रमाईंनी संसाराची जबाबदारी कष्ट, काटकसर आणि स्वाभिमानाने पेलली.

# 'रमाईंच्या त्यागातून उभी राहणारी ज्ञानाची क्रांती' - डॉ. झाडे

स्वकियांच्या मृत्यूच्या वेदना सहन करतही त्यांनी डॉ. बाबासाहेबांना शिक्षण व सामाजिक कार्यासाठी उर्जा दिली. दुःखातून धैर्य घडवणारी ती त्यागमूर्ती होती.

अनूपकुमार यांनी पीपीटीच्या माध्यमातून नालंदा अभियान कॅम्पसच्या बांधकामाचा आढावा घेतला. आंबेडकरी समाजाच्या विश्वास व आर्थिक पाठबळामुळेच हे कार्य शक्य झाले.

समाजाच्या योगदानातून उभी राहणारी ही शैक्षणिक संस्था देशात ऐतिहासिक ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्षीय मनोगतात देवराव कांबळे यांनी संविधानातील वैज्ञानिक दृष्टीकोन व २२ प्रतिज्ञांचे पालन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्त्या देवेंद्राताई वासनीक यांनी ५० हजार रुपयांचे धम्मदान जाहीर केले, तर फाऊंडेशनतर्फे १ लाख रुपयांचे सहकार्य देण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. ज्ञानेंद्र मुनेश्वर यांनी केले.

# चिखलातून मुक्तीचा मार्ग, बळीराजाच्या वहिवाटीला नवे पंख

## आ. सुमित वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली 'पाणंद रस्ते समिती' गठीत

**आर्वी /जनमाध्यम**
पावसाळ्यात गुडघाभर चिखल, उन्हाळ्यात धुळीचे लोट आणि पीक काढणीच्या वेळी शेतमाल वाहतुकीची जीवघेणी कसरतष्ठ आर्वी, आष्टी व कारंजा तालुक्यातील शेतकऱ्यांची ही वर्षानुवर्षांची वेदना आता दूर होण्याची आशा निर्माण झाली आहे. 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना' अंतर्गत आर्वी विधानसभा मतदारसंघासाठी समिती जाहीर करण्यात आली असून त्या समितीचे अध्यक्ष आमदार सुमित वानखेडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



या निर्णयामुळे शेतशिवारातील रस्त्यांचे काम वेगाने मार्गी लागणार असून शेतकऱ्यांची वहिवाट सुखकर होणार आहे. पेरणीपासून काढणीपर्यंत खत, बियाणे, मजूर व शेतमालाची ने-आण करताना होणारी त्रासदायक परिस्थिती आता बदलण्याची चिन्हे आहेत.

समितीत तहसीलदार, गटविकास अधिकारी, भूमी अभिलेख अधिकारी, बांधकाम विभागाचे अभियंते यांच्यासह प्रगतीशील शेतकऱ्यांचाही समावेश करण्यात आला आहे. अशोक विजयकर (आष्टी), प्रशांत काकपुरे (साहूर), राजेंद्र पावडे (रोहणा), सचिंद्र कदम (देऊरवाडा) आणि जगदीश डोळे (मेटहिरजी) हे सदस्य म्हणून काम पाहणार आहेत.

लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या थेट समन्वयातून रखडलेले पाणंद रस्ते पूर्णत्वास जाऊन बळीराजाच्या जीवनात खऱ्या अर्थाने सुकरतेचा नवा अध्याय सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# जागतिक कौशल्य स्पर्धेच्या राज्यस्तरीय फेरीत अमरावतीची बाजी

## विजेत्यांच्या जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते सत्कार

### चार विजेत्यांनी उंचावला जिल्ह्याचा नावलौकिक



**अमरावती/प्रतिनिधीः-** जागतिक कौशल्य स्पर्धेच्या राज्यस्तरीय फेरीत जिल्ह्यातील चार उमेदवारांनी यश संपादन केले आहे. या कामगिरीमुळे कौशल्य विकास क्षेत्रात जिल्ह्याने गरुडझेप घेतली असून, ही बाब जिल्ह्यासाठी गौरवास्पद असल्याचे मत जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी व्यक्त केले.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता कार्यालयात आयोजित एका विशेष कार्यक्रमात जिल्हाधिकारी येरेकर यांच्या हस्ते या यशस्वी उमेदवारांचा त्यांच्या पालकांसह गुणगौरव करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. समाजात स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी कौशल्याशिवाय दुसरा पर्याय नाही. आज अनेक नवीन संधी विद्यार्थ्यांना खुणावीत आहेत. तरुणांनी विविध क्षेत्रात आपली कौशल्ये विकसित करावीत, असे येरेकर म्हणाले. या विजेत्यांना पुढील प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रवासासाठी जिल्हा प्रशासनाकडून सर्वतोपरी मार्गदर्शन व मदत करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

या स्पर्धेत अमरावतीला दोन प्रथम आणि दोन द्वितीय क्रमांकाची पारितोषिके मिळाली आहेत. यामध्ये फार्मसीची विद्यार्थिनी असलेल्या सारथा (निशा) बंड हिने केवळ कुकिंग या छंदाच्या जोरावर राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकावून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तसेच आदर्श लिहारे याने सॉफ्टवेअर टेस्टिंगमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. पुण्या-मुंबईच्या स्पर्धकांसमोर सुरुवातीला मनात शंका होती, मात्र निकालानंतर आपणही कोणापेक्षा कमी नाही हा विश्वास मिळाल्याचे आदर्शने आपल्या मनोगतात सांगितले.

शशांक लोखंडे यांनी इलेक्ट्रॉनिक्समध्ये आणि विराज पुसदकर यांनी केमिकल लॅबोरेटरी असिस्टंट या विषयात द्वितीय क्रमांक पटकावून जिल्ह्याची शान वाढविली आहे.'कौशल्यांचे ऑलिम्पिक' मानली जाणारी ही स्पर्धा दर दोन वर्षांनी होते. २०२६ ची जागतिक स्पर्धा शांघाई (चीन) येथे आयोजित केली जाणार आहे. या स्पर्धेची पूर्वतयारी म्हणून राज्यभरात ६३ क्षेत्रांत स्पर्धा घेण्यात आल्या होत्या, ज्यामध्ये अमरावतीच्या १५ उमेदवारांनी प्रतिनिधित्व केले होते. आता या चारही विजेत्यांची निवड पुढील प्रादेशिक फेरीसाठी झाली असून, जिल्हा कौशल्य विकास कार्यालयाने घेतलेल्या विशेष मेहनतीबद्दल विजेत्यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

### जिल्हा महिला लोकशाही दिन येत्या सोमवारी

**अमरावतीः** जिल्हा महिला लोकशाही दिन सोमवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ रोजी (महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी) सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. तरी संबंधितांनी अहवालासह व्यक्तिशः उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.


MAHAVITARAN

**E-TENDER NOTICE**

The Executive Engineer, Achalpur Division. on behalf of MSEDCL invites tender through E-tendering for Work Contract for Checking/Testing single phase energy meter and Three phase meter by Accucheck meter with corresponding data downloading, record generation and printing of statement of abstract as per same format under Achalpur Dn. T-27, hiring of diesel vehicle at filter unit for minimum weight charge for transportation of Tempo Truck having loading/unloading upto 2 MT under Achalpur Dn. T-28 & Annual tender for the work of transportation and Loading & unloading of materials upto 7 MT & above 7 MT heavy line material such as PSC poles, RSJ poles, Transformers, Oil Drums, Conductor/Cable Drums and 1ph & 3ph energy meters form various stores to Achalpur Dn Stores and work sites T-29 Res. The tender document will be available on web site from 16.02.2026 the last date of submission of tender is 23.02.2026 up to 18.00 Hrs. please visit our website http://works.mahadiscom.in/eTender/etender.

Executive Engineer
MSEDCL, O&M Dn., Achalpur

PRO No. 48



**नगर परिषद कार्यालय, उमरखेड, जि.यवतमाळ**
**दरपत्रक (आरोग्य विभाग)**

ज्याअर्थी नगर परिषद उमरखेड आरोग्य विभागाकरीता शहरातील दैनंदिन स्वच्छतेकरीता खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. तरी इच्छुक पुरवठादार यांचेकडून ऑफलाईन दरपत्रक मागविण्यात येत आहे. याकरीता न.प.चे प्रपत्र तयार केले असून ते आरोग्य विभागामध्ये दिनांक १६.०२.२०२६ ते दिनांक २०.०२.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. जे ईच्छुक पुरवठादार त्यांनी आपली मोहरबंद, द्विलिफाफा पध्दतीने खालील दर्शविलेल्या अनामत रकमेसह दिनांक २३.०२.२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत भांडार विभागाकडे सादर करावी.

| अ.क्र. | साहित्याचे वर्णन | कोरे प्रपत्र किंमत | अनामत रक्कम | पुरवठा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | खारे, दांडा खारे, गाळ गाड्या | २००/- | २०००/- | १५ दिवस |

**अटी व शर्ती -**

१. दरपत्रकातील सर्व अटी व शर्ती कोरे प्रपत्रासोबत कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

२. पुरवठा धारकाने प्रपत्रात प्रती नग दर सादर करावे.

**स्वाक्षरी/-**
**मुख्याधिकारी,**
**न.प.उमरखेड**


# परतवाडा येथे 'अॅडव्हान्स ब्युटी पार्लर' प्रशिक्षण

## - ३२ महिलांना प्रमाणपत्रांचे वाटप



**अमरावती/प्रतिनिधीः-** अचलपूर तालुक्यातील परतवाडा येथे 'अॅडव्हान्स ब्युटी पार्लर' प्रशिक्षण बॅचचा निरोप समारंभ नुकताच उत्साहात पार पडला. १ जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या या एक महिन्याच्या विशेष प्रशिक्षणाचा समारोप प्रमाणपत्र वितरण सोहळ्याने करण्यात आला. या उपक्रमाचा एकूण ३२ महिला लाभार्थ्यांनी लाभ घेतला.

कार्यक्रमाला विभागीय व्यवस्थापक प्रवीण कोळेश्वर, उपव्यवस्थापक ऋषिकेश कथलकर, एमसीडी प्रकल्प अधिकारी राजेश सुने, आयोजक गणेश बहाड आणि प्रशिक्षिका जोत्स्ना राऊत उपस्थित होते. यावेळी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सर्व ३२ महिलांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

विभागीय व्यवस्थापक प्रवीण कोळेश्वर यांनी महिलांना मार्गदर्शन करताना स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्याचे आवाहन केले. तसेच, व्यवसाय उभारणीसाठी 'अमृत' आणि 'एमसीडी' मार्फत सर्वतोपरी पाठबळ दिले जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

प्रकल्प अधिकारी राजेश सुने यांनी लाभार्थ्यांना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती देऊन या योजनेच्या माध्यमातून अर्थसाहाय्य मिळवून आपला व्यवसाय यशस्वी कसा करावा, याचे तंत्र समजावून सांगितले.

कार्यक्रमादरम्यान लाभार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना या प्रशिक्षणामुळे आत्मविश्वास वाढला असल्याचे सांगितले. प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरल्याची भावना महिलांनी व्यक्त केली.काही महिलांनी स्वतःचा व्यवसायदेखील सुरू केला आहे.

# काटआमला येथे 'गावभेट' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## -ग्रामस्थांच्या समस्यांवर प्रशासनाचा थेट संवाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** शासनाच्या विविध कल्याणकारी योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी आणि प्रशासनाने थेट जनतेच्या दारी जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशान्वये 'गावभेट' उपक्रम राबविण्यात येत आहे. अमरावती तालुक्यातील काटआमला येथे 'गावभेट' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या पुढाकाराने राबविण्यात आलेल्या या उपक्रमात ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या अडचणी प्रशासनासमोर मांडल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच प्रज्ज्वल मिलके होत्या. यावेळी प्रा. अनिरुद्ध पाटील यांनी महिलांच्या समस्या व कायदेविषयक मार्गदर्शन केले. शेतीतज्ज्ञ प्रा. आर. के. पाटील यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना मार्गदर्शन केले.


**स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा**

दिनांक ६/०२/२०२६

आज दि. ०६.०२.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **सादिक खान रशिद खान** अर्जात नमूद जन्म दिनांक **०४/०६/१९७३** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) आम्ही आमच्या समोर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी वरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अ.खालीक अ.मजीद (ग्रा.पं.सदस्य) | ५) अ.खालीक अ.मजीद (ग्रा.पं.सदस्य) |

शिक्का

निबंधक,
जन्म मृत्यू नोंदणी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी



**जाहीर नोटीस**

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी**

आर.एम.जे.सी.क्र.८२/२०२६ ने.ता.१७.०३.२०२६

**अर्जदार -** १. शैलेंद्रकुमार मनोहरराव टिपरे, वय ५९ वर्षे, धंदा - शेती
२. देवेंद्र मनोहरराव टिपरे, वय ५५ वर्षे, धंदा - शेती
३. दिनेश मनोहरराव टिपरे, वय ५३ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.आसोना. पो.निंभी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

सर्व लोकांस नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ ते ३ चे वडील नामे **मनोहर उर्फ सुखदेव अजाबराव टिपरे** हे दिनांक **०५.१२.२०२१** रोजी तर आई **उषाताई मनोहरराव टिपरे** ही दि.०१.०९.२०१५ रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झाले आहे. अर्जदार हे मृतकाचे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त मृतकाला दुसरे कोणीही वारस नाही. मयतांचे वारसांना विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामाकरीता वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

अर्जदारांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळण्यास वि.दिवाणी न्यायाधीश साहेब, मोर्शी येथे अर्ज केला असून अर्जावर कोणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी प्रसिध्दी तारखेपासून एक महिन्याचे आत वि.कोर्टात आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा तुमचे गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होवून निर्णय दिल्या जाईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक ११.०२.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४०/२०२६
**श्री.प्रमोद अधिक पाच -वि- निरंक**
पुढील ता.१२.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Pramod Chunnilal Tandiye, Age 59 Yrs. Occu.: Kirana Store R/o Near Ambedkar Putla, Shivshakti Nagar, Sai Nagar, Amt.
2. Ishwar Chunnilal Tandiye, Age 64 Yrs. Occu.: Labour R/o.Sutgirni Road, Shivshakti Nagar, Sai Nagar, Amravati.
3. Ashok Chunnilal Tandiye, Age 61 Yrs. Occu.: Labour R/oSutgirni Road, Near Ambedkar Statue, Sai Nagar, Amravati.
4. Prakash Chunnilal Tandiye, Age 57 Yrs. Occu.: Labour R/o.Shivshakti Nagar, Near Ambedkar Statue, Rukhmini Nagar, Amravati, Tq. Dist. Amravati
5. Ravindra Chunnilal Tandiye, Age 55 Yrs. Occu.: Labour R/o Shakti Nagar, Sutgirni Road, Sai Nagar, Tq.Dist.Amravati.
6. Sangeeta Subhash Dahile, Age 51 Yrs. Occu.: Household R/o Tuljaram Patang Merchant, Raja Bazar, Tq.Dist.Aurangabad

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **चुन्नीलाल तिलवचंद तंडीये** हे दिनांक 15.04.1989 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **शांताबाई चुन्नीलाल तंडीये** ही दि.**०२.०७.२०१५** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाली. अर्जदार **प्रमोद अधिक पाच विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रमोद अधिक पाच विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०५.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती



**जाहीर नोटीस**

**जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, अमरावती**

क्र./न.भू.-१/अपील अर्ज २५२६/२०२४ अमरावती दिनांक १०.०२.२०२६

प्रति,
१. श्री.हरिभाऊ झोलाजी अमझरे
२. श्री.अर्जुनराव झोलाजी अमझरे
दोन्ही रा.वृंदावन कॉलनी, चांदूर बाजार, जि.अमरावती — **अपिलार्थी**

-- विरुध्द --

१. प्रविण पंजाबराव पारीसे, रा.मु.पो.हिरुरपूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. श्री.अशोक रामचंद्र कसर रा.मु.पो.हिरुरपूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. श्रीमती नर्मदाबाई रामचंद्र कसर, रा.मु.पो.हिरुरपूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. श्रीमती आशा रामचंद्र कसर, रा.मु.पो.हिरुरपूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
५. उषा रामचंद्र कसर, रा.मु.पो.हिरुरपूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
६. राजेंद्र रामचंद्र कसर, रा.मु.पो.हिरुरपूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
७. संजय रामचंद्र कसर, रा.मु.पो.हिरुरपूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
८. रोषण अरुण पारधी, रा.मु.पो.हिरुरपूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
९. आशिष अरुण पारधी, रा.मु.पो.हिरुरपूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
१०. उप अधीक्षक, भूमि अभिलेख, चांदूर बाजार, जि.अमरावती — **उत्तरार्थी**

**विषय -** **मौजे हिरुरपूर्णा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती येथील गट नं.२४१ चे बाबत अपिल अर्ज**
संदर्भ - अपिलार्थीयांचा अर्ज दिनांक २८.०३.२०२४

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजा हिरुरपूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील गट नं.२४१ चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे, परंतु उत्तरार्थी हे सुनावणी वेळी उपस्थित राहत नसल्यामुळे उत्तरार्थी यांना याद्वारे कळविण्यात येते की, दिनांक १८.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर रहावे. आपण वरील तारखेस सदर अपिल कामी न्यायासनासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दिनांक १०.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी दिले आहे.

शिक्का

**(महेशकुमार शिंदे)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख**
**अमरावती**



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११८/२०२६
**श्रीमती रत्नाबाई अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.२६.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Smt.Ratnabai Rameshrao Dharmale, Age 65 Yrs. Occu.: Household
2. Sunil Rameshrao Dharmale, Age 46 Yrs. Occu.: Agril. Both R/o Telipura Nandgaon Peth, Tq.Dist.Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रमेश विठोबा धर्माळे,** हे दिनांक 13.09.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **रत्नाबाई अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रत्नाबाई अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०५.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती



**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अमरावती यांचे कार्यालय**

जन्म/मृत्यू बाबत जाहीरनामा (रा.मा.क्र.एम.आर.सी-८१/जळका शहापूर/५२/२०२५-२६

**अर्जदार -** रत्नमाला शिवदास शेंडे (रत्नमाला बाबुलाल पांडे)
रा.जळका शहापूर, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- निबंधक जन्म/मृत्यू आरोग्य विभाग**
ग्रामपंचायत, जळका शहापूर ता.जि.अमरावती

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील पत्त्यावर कायम रहिवासी आहेत. अर्जदार रत्नमाला शिवदास शेंडे (रत्नमाला बाबुलाल पांडे) रा.जळका शहापूर, ता.जि.अमरावती यांची जन्माची दिनांक ०२.०७.१९६६ रोजी जळका शहापूर, ता.जि.अमरावती येथे झाला. निबंधक जन्म मृत्यू विभाग जळका शहापूर, ता.जि.अमरावती येथे जन्माची नोंद घेतली नाही. अर्जदाराला उपरोक्त जन्म प्रमाणपत्राची गरज असल्यामुळे जन्माची नोंद महानगरपालिका अधिनियम १९६९ मधील कलम १३(३) व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम ९(३) नुसार जन्माच्या नोदणीचा आदेश होण्याबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी कोणास सदर कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार अमरावती येथील दाखल अर्जातील श्री.अमरदीप ज्ञानेश्वर गवई, रा.जुनी वस्ती माळा कॉलनी, चंद्र नगर जवळ बडनेरा ता.जि.अमरावती यांच्या आजोबा नामे पुंडलिक मारोतराव वानखडे यांच्या मृत्यूची दिनांक ०२.०७/१९६६ रोजी मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूच्या दिनांकास किंवा त्याबाबत हरकत असल्यास ता.२३.०२.२०२६ पर्यंत स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत येऊन हरकत न घेतल्यास सदरहू अर्जदार यांची साक्ष घेवून जन्म नोद सदरकार्यालयात घेण्याचा आदेश किंवा तसे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ......०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

दिनांक .....०२.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, अमरावती**



**जाहीर नोटीस**

अर्ज नं.००५/कलम ३६(१)(अ)/२०२६
खारकर एज्युकेशन सोसायटी, अमरावती, ता.जि.अमरावती
रजि.नं.एफ-१६६०/अमरावती

वरील अर्जदाराने वरील नमुद न्यासाची नोंदणी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती येथे केलेली आहे.

खारकर एज्युकेशन सोसायटी, अमरावती, ता.जि.अमरावती एफ-१६६० या संस्थे अंतर्गत चालू असलेले कला महाविद्यालय, वाढोणा (रामनाथ) ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती (१८७) हे महाविद्यालय आधार सामाजिक बहुउद्देशीय संस्था, लेहगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती नोंदणी क.एफ-१३०५०/अमरावती या संस्थेला हस्तांतरीत करणेबाबत.

त्याअर्थी या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदरहू मालमत्तेवरील हस्तांतरणास कोणालाही आक्षेप असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत मा.धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांचे कार्यालयात जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योग्य रितीने सुचना दिलेल्या वकीलामार्फत खालील सही करणार यांचे समोर दिलेल्या पत्त्यावर दाखल करावे. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १२.०२.२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी व धर्मादाय सह आयुक्तांच्या शिक्क्यानिशी ही नोटीस दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**अमरावती**



प्रो.नं.४७७/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर,
दर्यापूर१२.०२.२०२६२७.०१.२०२५

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क्र./६८/२०२६ दिनांक १७.०३.२०२६

**जाहीर नोटीस**

**अर्जदार -** १. राधेशाम राममुर्ती बरडे, वय ६५ वर्षे, धंदा - शेती
रा.विदर्भ मिल कॉलनी, अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती
२. अशोक राममुर्ती बरडे, वय ५३ वर्षे, धंदा - शेती
३. मनोज राममुर्ती बरडे, वय ५० वर्षे, धंदा - शेती
अ.नं.२ व ३ रा.माहुली धांडे, ता.दर्यापूर, जि.अमरावती
४. रेखा राधेश्याम वरधैया, वय ५४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.कोंढाळी, ता.काटोल, जि.नागपूर

--- विरुध्द ---

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **राममुर्ती शिवचरण बरडे** हे दिनांक **०९.०१.२०२६** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. **मालमत्तेचे वर्णन** मयत **राममुर्ती शिवचरण बरडे** यांचे नांवे मौजा नांदुरा, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेत गट क.११९, १ हे.८१ आर. आ.रु.९.०० येणेप्रमाणे मिळकत आहे. या मिळकतीची बाजारभाव किंमत २०,०००/- रु.आहे. तसेच मौजा माहुली धांडे, ता.दर्यापूर येथील ग्रा.पं.मालमत्ता नं.१६२, क्षेत्रफळ ७८० चौ.फुट (७२.४६०० चौ.मि.) येणेप्रमाणे मिळकत आहे. याची बाजारभाव किंमत १०,०००/- रु.आहे.

आज दि.१२.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१९/२०२६
**श्रीमती प्रमोदिनी -वि- निरंक**
पुढील ता.१२.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Smt.Pramodini Narendra Roodkar Age 83 Yrs. Occu.: Retired R/o C/o G.G.Adhau 1, Shrikant New I.T.I.Colony Near Kanta Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अरुण नरेंद्र रुडकर,** हे दिनांक 17.11.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **प्रमोदिनी विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रमोदिनी विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०९.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान एस.बी.कळदारते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२२६/२०२६
**सुधीर व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२०.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. सुधीर प्रभाकर भोसले, वय ३५ वर्षे, व्यवसाय - मजुरी
२. सौ.ममता सरविंगसिंग पवार, वय ३८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
अर्जदार नं.१ व २ रा.केकतपूर, पो.केकतपूर, ता.जि. अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत प्रभाकर निराधीन भोसले व लता प्रभाकर भोसले** हे अनुकमे दिनांक **०२.०४.२०१५ व ०३.०२.२००१** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार सुधीर व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुधीर व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०९.०२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१४/२०२६
**श्रीमती संगीता अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.१२.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Smt.Sangita Rajesh Chakare, Age 45 Yrs. Occu.: Household R/o Lakadganj, Badnera, Amravati. Tq. Dist. Amravati
2. Miss.Nidhi Rajesh Chakre, Age 23 Yrs. Occu.: Student R/o Lakadganj, Badnera, Amravati. Tq. Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **राजेश गणेशराव चक्रे,** हे दिनांक 13.12.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **संगीता अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **संगीताअधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०९.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १५९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### बॉक्सिंग (महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

**अमरावती-** लवली प्रोफेशनल युनिर्व्हसिटी, जालंधर (पंजाब) येथे ०९ ते १४ मार्च, २०२६ दरम्यान होणा-या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉक्सग (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.चमूंमध्ये महात्मा फुले कला व विज्ञान महाविद्यालय, पातुरची कु. रुपाली डोंगरे, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीची कु. विजेता देव, एस.एस.जी.एम.सी.ई. शेगांवची समिक्षा दाबेराव, श्री शिवाजी महाविद्यालय, अकोलाची पलक झांबरे, रितिका बोसे, गायत्री माटे व पुर्वा गावंडे, श्री आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालय, अकोलाची रेयती उंबरकर, श्री संत गजानन महाराज कला महाविद्यालय, बोरगांवमंजूची कु. गौरी मुरुमकर व कांचन सुरंशे हिचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग जिल्हा क्रीडा कार्यालय, अकोला येथे २५ फेब्रुवारी ते ०६ मार्च, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे,असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

### चिंचखेडा उमरापूर येथे शिवजयंतीचे आयोजन



**अमरावती-** भातकुली तालुक्यातील चिंचखेडा उमारापूर येथे सालाबाद प्रमाणे याहिवर्षी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त विविध उपक्रमाचे आयोजन केले असून १७ फेब्रुवारी ला सायंकाळी समजप्रबोधनकर व सत्यपाल महाराज यांचे शिष्य संदिपमहाराज गिते यांचा यांचा समजप्रबोधनाचा कार्यक्रम तर १८फेब्रुवारी ला पंजाबराव देशमुख रुग्णालय अमरावती च्या सहकार्याने डॉ. सचिन ककडे, शेफी शेख यांच्या मार्गदर्शनात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले, असून शिबिराचे उदघाटन बच्चू कडू यांच्या हस्ते तर स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ (महाराष्ट्र राज्य )चे प्रसार प्रमुख अमरावती जिल्हाध्यक्ष संजय सरवटकर यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे. तर १९ फेब्रुवारीला शिवउत्सवा निमित्त गावात रॅली कडून विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाला परिसरातील जनतेने जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जगदंबा मित्रमंडळ चिचखेड उमरापूर यांनी केले आहे.

### प्रमोद पांडे 'समाजरत्न' पुरस्काराने सन्मानित



**अमरावती-** शिवजयंती निमित्त दरवर्षी दैनिक चालू वार्ता व स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ (महाराष्ट्र राज्य ) यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्या जाणाऱ्या 'समाजरत्न २०२५' पुरस्कारासाठी अमरावती येथील माजी नगरसेवक व जेष्ठ सामाजिक युवा कार्यकर्ते प्रमोद पांडे यांची निवड झाली. त्यांना शिवजयंती दिनी १९फेब्रुवारीला दैनिक चालू वार्ता मुख्य कार्यालय, हडसपर, पुणे येथे जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे व जरांगेपाटील यांच्या हस्ते देण्यात येणार आहे.स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ (महाराष्ट्र राज्य )चे राज्य प्रसार प्रमुख व अमरावती जिल्हाध्यक्ष संजय सरवटकर यांनी प्रमोद पांडे यांचे पत्रकाद्वारे अभिनंदन केले. प्रमोद पांडे हे गेल्या तीस वर्षापासून सामाजिक, पत्रकारिता तसेच राजकीय क्षेत्रात अग्रेसर असून या पुरस्काराच्या माध्यमातून त्यांना त्यांच्या कार्याची पावती मिळाली असल्याची प्रतिक्रिया सर्व स्तरातून येत आहे. त्यांना या उल्लेखनीय कार्याबद्दल मिळालेल्या समाजरत्न २०२५' पुरस्काराबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.



### राष्ट्रीय सेवा योजनानिमित्य शिबिराचे उद्घाटन

**अंजनगाव बारी-** मोझरी येथे सेंट थॉमस प्रशासकीय महाविद्यालय, अमरावती यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) शिबिराचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दीपक वासनिक तर उद्घाटक म्हणून आकाश राठोड,या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून निर्गुण निश्चित अमोल बांबल, सुभाष सोनारे तसेच नंदा उपस्थित होते. कार्यक्रमात सत्कारमूर्ती म्हणून पद्मश्री जनार्दन पंत बोथे गुरुजी यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे मार्गदर्शन करताना बोथे गुरुजी यांनी NSS स्वयंसेवकांना भविष्याबाबत सजग राहण्याचे आवाहन केले. प्रमुख अतिथी अमोल बांबल यांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांची सेवा करावी, कारण त्यातूनच समाजसेवेचा मार्ग सुलभ होतो, असे प्रतिपादन त्यांनी केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष दीपक वासनिक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत महत्त्वाची चळवळ असल्याचे सांगितले. उद्घाटक आकाश राठोड यांनीही विद्यार्थ्यांना समाजकार्यामध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.या शिबिराचे आयोजन प्राचार्य संजीवनी मनवरे (सेंट थॉमस प्रशासकीय महाविद्यालय, अमरावती) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. सुमेध गावंडे व प्रा. शांता गाडगे यांनी शिबिराचे नियोजन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राध्यापक कल्पना राऊत, प्राध्यापक प्रणय मनवरे, प्राध्यापक स्वप्नील इखार, प्राध्यापक शिल्पा गजभिये, प्राध्यापक निलेश डोंगरे, पंकज गजभिये, आकाश मेश्राम व बाळू सोळंके यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. शिबिराच्या उद्घाटनामुळे स्वयंसेवकांमध्ये समाजसेवेची नवी ऊर्जा निर्माण झाली.

---

#### अचलपुरात जिल्हास्तरीय क्रीडा-सांस्कृतिक महोत्सवात नियोजनाचा अभाव; पहिल्याच दिवशी गोंधळ

# १३ नगरपरिषद व नगरपंचायतींचे अधिकारी-कर्मचारी सहभागी

**अचलपूर/वार्ताहर**

नगर विकास विभागाकडून अचलपूर येथील धारणी रोडवरील अंबिका लॉन परिसरात १३ फेब्रुवारी रोजी अमरावती जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा उद्घाटन सोहळा पार पडला. मात्र पहिल्याच दिवशी कार्यक्रमात नियोजनाचा अभाव स्पष्टपणे जाणवला.जिल्ह्यातील एकूण १३ नगरपरिषद व नगरपंचायतींचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले असतानाही पार्किंगची कोणतीही ठोस व्यवस्था नसल्याने चारचाकी व दुचाकी वाहने धारणी रोडवर उभी करण्यात आली.

त्यामुळे काही काळ वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली. कार्यक्रमस्थळी सहभागी अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी बसण्याची व्यवस्था अपुरी होती. पेंडॉलची उभारणी न केल्याने अनेकांना भर उन्हात उद्घाटनाची प्रतीक्षा करावी लागली. चेंजिंग रूम, पिण्याचे पाणी व मूलभूत सोयींचाही अभाव असल्याची तक्रार सहभागी कर्मचाऱ्यांनी केली. विशेष म्हणजे, स्थानिक पत्रकारांना निमंत्रण न दिल्याची बाब समोर आली असून काही नगराध्यक्ष व नगरसेवकांना कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी उशिरा निमंत्रण मिळाल्याची चर्चा आहे. त्यामुळे आयोजनाबाबत नाराजी व्यक्त होत आहे.कार्यक्रम



पत्रिकेत उद्घाटक म्हणून अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांचा उल्लेख करण्यात आला होता. तर समारोप व बक्षीस वितरणासाठी अमरावतीचे जिल्हाधिकारी उपस्थित राहतील, असे नमूद होते. मात्र उद्घाटन प्रसंगी अमरावती जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर हे प्रमुख उपस्थित होते. विभागीय आयुक्त समारोप सोहळ्यास उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली. पत्रिकेतील या घोळामुळेही कर्मचाऱ्यांत चर्चा रंगली आहे.

उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी आशिष येरेकर, अचलपूर नगरपरिषद नगराध्यक्ष सौ. रुपाली माथने, नगर विकास विभागाचे सहायक आयुक्त डॉ. नितीन कापडणीस, चांदूरबाजारच्या नगराध्यक्ष सौ. मनीषा नागलिया, अंजनगाव सुर्जीचे नगराध्यक्ष अविनाश गायगोले, धामणगाव रेल्वेच्या नगराध्यक्ष रचना अडसड, अचलपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी धीरज कुमार गोहाड आदी मान्यवर उपस्थित होते.१३ व १४ फेब्रुवारी या दोन दिवसीय महोत्सवात क्रिकेट, टेबल टेनिस, कॅरम, बुद्धिबळ, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, कबड्डी आदी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.या महोत्सवासाठी अचलपूर, चांदूरबाजार, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे, भातकुली, शेंदूरजना घाट, चिखलदरा, दर्यापुर, मोर्शी, धारणी, नांदगाव खंडेश्वर व तिवसा आदी नगरपरिषद व नगरपंचायतींचे शेकडो अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले आहेत.भव्य जिल्हास्तरीय आयोजन असतानाही मूलभूत सुविधांचा अभाव व स्थानिक पत्रकारांना डावलल्याने अचलपूर नगरपरिषद प्रशासनाच्या नियोजनाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

---

## जिल्हास्तरीय 'एकनाथ श्री दौड' मॅरेथॉनचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**



राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री आणि एकनाथ शिंदे तसेच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त अमरावती जिल्हा युवा सेनेच्या वतीने भव्य जिल्हास्तरीय 'एकनाथ श्री दौड' मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. युवा सेना लोकसभा अध्यक्ष अमरावती प्रविण दिधाते यांच्या पुढाकारातून १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ६ वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड येथून स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. या स्पर्धेत अमरावती जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

स्पर्धा दोन गटांत होणार असून १५ वर्षांखालील मुले-मुलींसाठी २.५ किमी अंतराची शर्यत संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन–शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यालय–गर्ल्स हायस्कूल चौक – इरविन चौक – सांस्कृतिक भवन या मार्गाने पार पडेल.तर १५ वर्षांवरील महिला व पुरुषांसाठी खुल्या गटातील ५ किमी शर्यत संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन – पंचवटी चौक – आरटीओ कार्यालय – मॉंसाहेब जिजाऊ पुतळा – बियाणी चौक – जिल्हाधिकारी कार्यालय – गर्ल्स हायस्कूल चौक – इरविन चौक – सांस्कृतिक भवन या मार्गाने होणार आहे.स्पर्धेतील सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार असून विजेत्यांना रोख रक्कम, पारितोषिके व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. नोंदणीसाठी चेतन गोगे (मो. ८९९९७९२९५२) व सत्यम खांदाडे (मो. ७६६६३८४३८२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळविले आहे.

## सह्याद्रीवर सोमवारी एल्गार मराठी गज़ल संमेलन वृत्तांत

**अमरावती** - शहरात नुकत्याच पार पडलेल्या तिसऱ्या अखिल भारतीय एल्गार मराठी गज़ल संमेलनाचा दूरदर्शन वृत्तांत १६ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजता सह्याद्री वाहिनीवरून प्रसारित केला जाणार आहे. स्व. सुरेश भट स्मृती प्रतिष्ठान आणि स्व. वसंतराव पालेकर स्मृती प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या मराठी गज़ल संमेलनात देशभरातून शेकडो साहित्यिक सहभागी झाले होते. या वृत्तांताचे पुनःप्रसारण १७ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता केले जाणार आहे. वृत्तांताचे संहितालेखन आणि निवेदनस्वर नितीन भट यांचा असून कार्यक्रमाचे कार्यकारी निर्माता मनोज जैन असून निर्मिती साह्य मिलिंद नेटके यांचे आहे. सह्याद्री वाहिनीवरील कार्यक्रमाचा आस्वाद घेण्याचे आवाहन संमेलनाचे स्वागताध्यक्ष नाना लोडम यांनी केले आहे.

एल्गार

## समाजशास्त्र विभागाची मेळघाटातील विविध गावांमध्ये जनजागृती मोहीम

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाच्यावतीने मेळघाटमधील आदिवासी गावांमध्ये मोठया प्रमाणात जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना विविध प्रकारची माहिती देण्यात आली.

मेळघाटातील धारणी व चिखलदरा तालुक्यातील घटांग, सेमाडोह, हरिसाल, धारणी, खा-याटेम्ब्रू, मोथा, पंचबोल, चिखलदरा अशा विविध गावांना भेटी देण्यात आल्या. गावागावांमध्ये आदिवासी बांधव तसेच युवकांना शासनाच्या विविध योजना, कार्यक्रम कीर्तनकार मंडळी तसेच विद्यार्थी व प्राध्यापकाच्या माध्यमातून, साऊंड सिस्टिमच्या माध्यमातून ग्रामस्थांना माहिती देण्यात आली. त्याचबरोबर आरोग्य, शिक्षण, महिला व बालकल्याण, रोजगार, सामाजिक सुरक्षेच्या योजनांबाबत जनजागृती करण्यात आली.



विद्यार्थी व प्राध्यापकांनी गावातील आदिवासी महिला व पुरुषांशी संवाद साधून त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्या जाणून घेतल्या. तसेच त्यांच्या जीवनशैली व सद्यस्थितीचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला. यामुळे आदिवासी समाजासमोरील वास्तव परिस्थिती समजून घेण्यास मदत झाली.या जनजागृती मोहीमेमध्ये समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. के. बी. नायक, अंशदायी शिक्षक डॉ. प्रशांत भगत, डॉ. रोहिणी देशमुख, प्रा. साधना इंगोले, शिक्षकेतर कर्मचारी प्रवीण घर्डीणकर यांच्यासह संशोधक विद्यार्थी राजकुमार सयाम, रमेश पवार, गोपाल वानखडे, दिलीप धावणे तसेच विभागातील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. या जनजागृती मोहीमेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आदिवासी समाजातील वास्तव अनुभवण्याची संधी मिळाली. समाजाभिमुख शिक्षणाची ही परंपरा भविष्यातही कायम राहील, असे मत यावेळी संशोधक, तसेच विद्यार्थी व प्राध्यापकांनी व्यक्त केले.

---

## श्री.हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयात 'पेटंट लिटरेसी अँड ड्राफ्टिंग' विषयावर कार्यशाळा

**अमरावती/का.प्र.**



श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, अमरावती येथे संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागाच्या वतीने नुकताच 'पेटंट लिटरेसी अँड ड्राफ्टिंग' या विषयावर द्विदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश पेटंट व औद्योगिक डिझाईन संदर्भात जनजागृती करणे, पेटंट डेटाबेसचा प्रत्यक्ष (हँड्स-ऑन) वापर शिकविणे, एखाद्या कल्पनेची पेटंटयोग्यता व मौलिकता तपासणे तसेच पेटंट अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया समजावून देणे हा होता.

या कार्यशाळेला लॉक युअर आयडिया प्रा. लि पुणे च्या संचालिका एड. योगिता पवार यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. यावेळी संगणक विभाग प्रमुख डॉ. अंजली राऊत अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या.कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी 'पेटंट, पेटंटचे प्रकार आणि पेटंट सर्चिंग' या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

याशिवाय शैक्षणिक क्षेत्रात पेटंटचे महत्त्व व केस स्टडीचाही समावेश करण्यात आला. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी 'इंडस्ट्रियल डिझाईन आणि पेटंट ड्राफ्टिंग' या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. इंडस्ट्रियल डिझाईन म्हणजे काय, त्याची नोंदणी प्रक्रिया, डिझाईन शोध नोंदणीकृत डिझाईन चे फायदे, कल्पनेपासून शोधा पर्यंतचा प्रवास, अकादमिक व पेटंट लेखनातील फरक, पेटंट अर्जाची रचना, इन्व्हेन्शन डिस्क्लोजर फॉर्मची तयारी व पेटंट अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया यावर एड. योगिता पवार यांनी सखोल मार्गदर्शन केले. संगणक विभागाच्या प्रा. प्राजक्ता चापके यांच्या समन्वयातून आयोजित या कार्यशाळेला पीएचडी, एम इ, बीइ सह चार शाखेतील एकूण ६१ विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकास व ज्ञानात भर पडणार असून या स्तुत्य उपक्रमासाठी मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, मंडळाचे कार्याध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, कोषाध्यक्ष डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव प्रा. विकास कोळेश्वर, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस दाळु, प्लेसमेंट विभागाचे प्रा. प्रणव चेंडके यांनी अभिनंदन केले.

## २३ फेब्रूवारीला विद्यापीठाचा बेचाळीसावा दीक्षांत समारंभ



**अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा बेचाळीसावा दीक्षांत समारंभ दि. २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी विद्यापीठ परिसरात संपन्न होत आहे. या समारंभाच्या निमित्ताने पदवीकांक्षी विद्यार्थ्यांना पदवी ससन्मान प्रदान केली जाते. पदवी मिळाल्यानंतर फोटो काढण्याची विद्यार्थ्यांना सोय व्हावी, यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठ परिसरात ज्या फोटो स्टुडिओधारकांना पदवीधारकांचे फोटो काढण्यासाठी स्टुडिओ उभारावयाचे असतील, त्यांना नाममात्र १०१/- रूपये शुल्कासह विद्यापीठ परिसरात फक्त विशिष्ट जागा उपलब्ध करून देण्यात येईल, इतर सर्व व्यवस्था मात्र संबंधित फोटो स्टुडिओधारकांना करावयाची आहे.ईच्छुक स्टुडिओधारकांनी दि. २१ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत जनसंपर्क अधिकारी यांचेशी जनसंपर्क विभागात संपर्क साधून आपले अर्ज सादर करावेत, यानंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.दि. २२ फेब्रुवारी, २०२६ रोजी दु. १.०० वाजता जनसंपर्क विभागामध्ये प्लॉटची ईश्वरचिठ्ठी काढण्यात येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

# भारताला आर्थिक महाशक्ती बनवण्याची जबाबदारी यूवकांवर

### रायसोनी विद्यापीठ, अमरावतीच्या ६ व्या दीक्षांत समारोहात वक्त्यांचे मत

**अमरावती/वार्ताहर**

भारत स्वावलंबी आणि विकसित राष्ट्र बनण्याचे स्वप्न लवकरच साकार होऊ शकते. देश विश्वातील आर्थिक महाशक्ती बनू शकतो आणि जगाचे नेतृत्वही करू शकतो. हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा देशातील युवा वर्ग यासाठी ठोस प्रयत्न करेल.

जी. एच. रायसोनी अमरावती विद्यापीठाच्या ६व्या दीक्षांत समारोहात वक्त्यांनी ही एकमताने राय व्यक्त केली.संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड, अमरावती येथे हा समारोह पार पडला. रायसोनी एज्युकेशनचे कार्यकारी संचालक श्रेयश रायसोनी यांनी समारोहाचे अध्यक्षस्थान भूषविले.प्रमुख पाहुणे म्हणून आयआयएम




नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री, लक्ष्मीनारायण इनोव्हेशन टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. अतुल वैद्य उपस्थित होते. तसेच विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, कुलसचिव डॉ. स्नेहिल जैस्वाल आणि परीक्षा नियंत्रक डॉ. विनायक डकरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.डॉ. मेत्री यांनी भाषणात सांगितले की, भारताला आत्मनिर्भर आणि विकसित राष्ट्र बनवण्यासाठी केंद्र सरकारने २०४७ पर्यंतचे उद्दिष्ट ठेवले आहे. युवा वर्ग ज्या प्रकारे देशाच्या विकासात योगदान देत आहे, त्यामुळे हे स्वप्न लवकर पूर्ण होण्याची शक्यता आहे. युवांच्या सामर्थ्यामुळे भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. २०४७ पर्यंत भारत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनू शकतो आणि जगाचे नेतृत्वही करू शकतो. युवांना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने स्टार्टअप इंडिया, मेक इन इंडिया यांसह अनेक योजना राबवल्या आहेत. यामुळे जगात भारताची स्थिती मजबूत झाली असून संपूर्ण जग भारताकडे आशेने पाहत आहे.

डॉ. अतुल वैद्य यांनी युवांना कौशल्य विकासावर अधिक भर देण्याचे आवाहन केले. देशाच्या विकासात योगदान देणाऱ्या महापुरुषांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, त्यांच्या समर्पणामुळे भारताचा मान जगात वाढला आहे.समारोहाचे अध्यक्ष श्रेयश रायसोनी यांनी सर्व पदवीधर विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.


कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांनी विद्यापीठाच्या प्रगतीची माहिती दिली आणि भविष्यातील योजनांची माहिती दिली. आभार प्रदर्शन कुलसचिव डॉ. स्नेहिल जैस्वाल यांनी केले.मेधावी विद्यार्थ्यांचा सन्मान दीक्षांत समारोहात विविध परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ५८ मेधावी विद्यार्थ्यांना ३६ सुवर्ण, २२ रजत पदक व पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विविध अभ्यासक्रमांतील यशस्वी विद्यार्थ्यांना डिग्र्या प्रदान करण्यात आल्या.

यात ३६ विद्यार्थ्यांना डिप्लोमा, ७७३ विद्यार्थ्यांना स्नातक, ६७१ विद्यार्थ्यांना स्नातकोत्तर आणि ४२ विद्यार्थ्यांना पीएच.डी. डिग्री देण्यात आली. इंजिनीअरिंग अभ्यासक्रमातील ३२१, वाणिज्य व व्यवस्थापन संकायातील २१६, विधी अभ्यासक्रमातील ९८, फार्मसीमधील ९० स्नातक आणि ३२ डिप्लोमा धारकांचा समावेश आहे. हॉटेल मॅनेजमेंटमध्ये १३ स्नातक आणि ४ डिप्लोमा, तर स्कूल ऑफ सायन्स अंतर्गत ७४८ विद्यार्थ्यांना डिग्र्या प्रदान करण्यात आल्या.

# मादी बिबट मृतावस्थेत आढळल्याने खळबळ

## मृत्यूचे गूढ कायम, निजामपूर स्मशानभूमी परिसरातील घटना

**अचलपूर/प्रतिनिधीः-** तालुक्यातील निजामपूर येथे आज सकाळी एका झाडाखाली मादी बिबट्या मृतावस्थेत आढळून आल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. मारुती मंदिराच्या मागील बाजूला असलेल्या स्मशानभूमीजवळ हा प्रकार उघडकीस आला. या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती.





निजामपूर येथील स्मशानभूमी परिसरातील एका झाडाखाली नागरिकांना बिबट्या निपचित पडलेला दिसला. जवळ जाऊन पाहिले असता तो मृत असल्याचे लक्षात आले. ही बातमी गावात वाऱ्यासारखी पसरली आणि बघ्यांची एकच गर्दी उसळली. तातडीने याची माहिती वन विभाग आणि पोलीस प्रशासनाला देण्यात आली.

माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी आणि डॉक्टरांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. वृत्त लिहेपर्यंत वन विभागाकडून पंचनाम्याची प्रक्रिया सुरू होती. सदर बिबट्या ही मादी असून, तिच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही.

'मी सध्या सुट्टीवर असलो तरी या घटनेची माहिती मला मिळाली आहे. वन विभागाचे अधिकारी घटनास्थळी पोहचले असून पंचनामा व पुढील तपास सुरू आहे. तपासानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल.'

**-दिनेश वाळके,**
वनपरिक्षेत्र अधिकारी, अचलपूर


**गावात भीतीचे वातावरण-**
सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या तीन महिन्यांपासून या परिसरात बिबट्याचा वावर होता. याबाबत ग्रामस्थांनी ☞(पान २ वर)

# सुर्यगंगा नदीपात्रात आढळला अज्ञात मृतदेह

## -शेंदोळा खुर्द येथील घटना

**तिवसा/प्रतिनिधीः-** तिवसा तालुक्यातील शेंदोळा खुर्द गावाच्या हद्दीतून वाहणाऱ्या सुर्यगंगा नदी पात्रात अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. ही घटना शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजताच्या सुमारास उघडकीस आली.

नेहमीप्रमाणे शेतकरी व शेतमजूर सकाळी शेतीच्या कामासाठी शेताकडे जात असताना नदीपात्रात झाडा-झुडपांच्या कडेला मानवी मृतदेह दिसून आला. हा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असल्याचे लक्षात येताच नागरिकांनी तत्काळ घटनेची गावात माहिती दिली आणि पोलिसांना देखील कळविले. घटनास्थळी ग्रामस्थांची मोठी गर्दी जमली होती. प्राथमिक पाहणीत मृतदेह गेल्या सहा ते सात दिवसांपासून नदीपात्रात असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.



मृतदेह अत्यंत कुजलेल्या अवस्थेत दिसून येत आहे. त्यामुळे मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटू शकलेली नाही.

घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह नदीपात्राबाहेर काढला. मृतदेह शवविच्छेदनाकरिता तिवसा उपजिल्हा शासकीय रुग्णालय येथे पाठविण्यात आला आहे.ही हत्या की अपघाती मृत्यू अथवा आत्महत्येचा प्रकार, याबाबत सध्या कोणताही ठोस निष्कर्ष समोर आलेला नाही. मृत इसमाची ओळख पटविण्यासाठी पोलिसांकडून आसपासच्या गावांतील बेपत्ता व्यक्तींची माहिती तपासली जात असून पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे.

# नांदगाव बाजार समितीत नवीन हरभऱ्याची आवक

## -मुहूर्ताला मिळाला ५२५१ रुपयांचा भाव!




**नांदगाव खांडेश्वर/प्रतिनिधीः-** स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीत रब्बी हंगामातील नवीन हरभऱ्याची पहिली आवक झाली. मुहूर्तावर आलेल्या हरभऱ्याला ५२५१ रुपये भाव मिळाला. धानोरा मोगल येथील शेतकरी वैभव मुंडवाईक यांनी हंगामातील नवीन हरभरा आज विक्रीसाठी बाजार समितीत आणला. हा शेतमाल सतीश गिड्डे यांच्या अडत मध्ये आला असता व्यापारी सचिन लड्डा यांनी ५२५१ रुपये असा उच्चांकित भाव देऊन खरेदी केला. यावेळी हंगामाच्या ☞(पान २ वर)

# ओव्हरलोड ट्रकचा विद्युत तारेला स्पर्श

## -आगीचे गोळे खाली पडले -गर्दीच्या ठिकाणी मोठी दुर्घटना टळली

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** स्थानिक वीज वितरण कंपनीच्या कार्यालयाजवळील बोराळा रस्त्यावर एका ओव्हरलोड ट्रकचा विद्युत तारांना स्पर्श झाल्याने रस्त्यावर आगीचे गोळे रस्त्यावर पडले. यामुळे नागरिक भयभीत झाले होते.

अधिक माहितीनुसार,काल दिनांक १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी आठ ते साडेआठ वाजताच्या दरम्यान बोराळा रस्त्याकडून अंजनगाव मार्गावर मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड असलेला ट्रक क्रमांक MH-४१ AU ५२७५ ने वीज वितरण कंपनीच्या कार्यालयाच्या बाजूला असलेल्या बोराळा रस्त्यावरील एल टी ४४० होल्ड असलेल्या विद्युत तारांना स्पर्श केला. ट्रक मध्ये असलेल्या रुईच्या गठानांचा प्रचंड ओव्हरलोड मालाचा स्पर्श झाल्याने रस्त्यावर विजेच्या आगीचे खाली गोळे पडले.



त्यामुळे रस्त्यावरील येणाऱ्या जाणाऱ्या वाहनधारक तसेच रस्त्यावरील नागरिक आणि महिलांमध्ये एकच भीती निर्माण झाली होती. या ओव्हरलोड ट्रकमुळे झालेल्या विद्युत तारांच्या स्पर्शामुळे मोठा अपघात घडण्याची शक्यता सुद्धा निर्माण झाली होती. ज्या ठिकाणी ही घटना घडली त्या ठिकाणी आजूबाजूला दुचाकी वाहने सुद्धा उभी होती. रस्त्यावर येणारे जाणारे स्त्री-पुरुष लहान मुलं सुद्धा होते. अतिशय गंभीर स्वरूपाची घटनादिनांक १२ फेब्रुवारी रोजी होता होता टळली. विद्युत तारेच्या स्पर्शाने स्टेट बँकेची डीपी सुद्धा बंद पडली होती. घटनेच्याच बाजूला वीज वितरण कार्यालय असल्याने तेथील कर्मचारी दीपक गावंडे, ऋषिकेश ☞(पान २ वर)

# सुपर हॉस्पिटलमधील एमआरआय मशीन सुरू करा

## -प्रहारची मागणी,जिल्हा शल्यचिकित्सकांना निवेदन

**अमरावती/प्रतिनिधीः-** सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये मागील सात महिन्यापूर्वी लावण्यात आलेली एमआरआय मशीनला अजून पर्यंत शासकीय आधिकृत परवानगी न मिळाल्याने चालू करण्यात आली नाहा. ही मशीन लवकरात लवकर सर्वसामान्यांसाठी सुरू करण्यात यावी अशी मागणी प्रहार जनशक्ती पार्टीच्या वतीने आज शुक्रवार १३ फेब्रुवारी रोजी जिल्हा शल्यचिकित्सकांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, सात महिन्यापूर्वी जिल्हा सामान्य रुग्णालयाला मिळालेली एम आर☞(पान २ वर)



### मनपाची पहिली आमसभा २० फेब्रुवारीला

# स्थायी समिती सदस्य व स्वीकृत नगरसेवकांची होणार नियुक्ती

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेची पहिली आमसभा येणाऱ्या शुक्रवार २० फेब्रुवारी रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये घेण्यात येणार आहे. पहिल्या सभेत स्थायी समितीचे १६ सदस्य आणि ८ स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. महापौर श्रीचंद तेजवानी यांनी सभापती म्हणून पहिली सभा बोलावली आहे. शासनाच्या निर्णयानुसार १९ फेब्रुवारीला शिवजयंती नंतर २० रोजी आमसभा होत आहे. यामध्ये स्थायी समितीचे १६ सदस्य आणि ८ स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. महाशिवरात्री नंतर राजकीय वातावरण तापणार आहे.



मागील सभा ६ फेब्रुवारी रोजी झाली होती. या सभेमध्ये महापौर श्रीचंद तेजवानी आणि उपमहापौर सचिन भेंडे यांची नियुक्ती झाली होती. महानगरपालिकेच्या संख्याबळाकडे लक्ष दिले तर मनपामध्ये भाजपाचे २५, युवा स्वाभिमानचे १५,काँग्रेसचे १५,एमआयएमचे १२, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ११,शिवसेना शिंदे ३, बसपा ३,उबाठा २ आणि वंचित बहुजन आघाडीचे १ नगरसेवक निवडून आले आहे.

**अशी होणार सदस्याची निवड-** महानगरपालिकेमध्ये नोंदणीकृत गटनेतांच्या वतीने दिलेल्या पत्रानुसार स्विकृत आणि स्थायी समिती सदस्यांची नावे महापौर घोषित करतील. ही संपूर्ण प्रक्रिया नियमांचे अधिक राहून होणार आहे. स्थायी समितीचे १६ सदस्य निवडून येतील. यामध्ये भाजपाचे ५, युवा स्वाभिमान - काँग्रेसचे ३-३, एमआयएम चे २, राष्ट्रवादी अजित पवारचे २ आणि १६☞(पान २ वर)

# रब्बीसाठी ३१ हजार हेक्टर सिंचन क्षेत्राचे नियोजन

## उर्ध्व वर्धा कालवा सल्लागार समितीची बैठक

### जिल्हाधिकारी येरेकर यांची पाणी आरक्षणास मंजुरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन येथे उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या कालवा सल्लागार समिती व पाणी आरक्षणाची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत सन २०२५-२६ या वर्षासाठी उर्ध्व वर्धा प्रकल्पातून सोडण्यात येणाऱ्या पाणी आवर्तनाचे नियोजन आणि बिगर सिंचन पाणी आरक्षणाबाबत चर्चा करून विविध निर्णयांना मंजुरी देण्यात आली.



उर्ध्व वर्धा प्रकल्पाचे लाभक्षेत्र अमरावती आणि वर्धा या दोन्ही जिल्ह्यांत असून, प्रकल्पाच्या डाव्या व उजव्या दोन्ही कालव्यांमधून रब्बी हंगामासाठी पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अधीक्षक अभियंता मनीष राजभोज यांनी बैठकीत माहिती दिली की, रब्बी हंगाम २०२५-२६ साठी एकूण ३१ हजार हेक्टर सिंचन क्षेत्राचे नियोजन करण्यात आले आहे. आतापर्यंत या दोन्ही कालव्यांद्वारे ३ पाणी पाळ्यांची आवर्तने पूर्ण झाली असून, त्यातून १० हजार हेक्टर क्षेत्रावर सिंचन झाले आहे. उर्वरित २ आवर्तने मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून, जलसंपदा व कृषी विभागाने समन्वय साधून उन्हाळी पिकांच्या क्षेत्रात वाढ करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी येरेकर यांनी यावेळी दिले.

या बैठकीत सन २०२५-२६ या वर्षासाठी बिगर सिंचन पाणी आरक्षणासही मंजुरी प्रदान करण्यात आली. यामध्ये पिण्यासाठी ६१.९११ दलघमी, औष्णिक ☞(पान २ वर)

# तलवार घेऊन दहशत पसरविणारा गजाआड

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक एमआयडीसी व माया नगर चौकात हातात तलवार घेऊन लोकांमध्ये दहशत पसरविणारा आरोपी बादल किशोर लुंड (वय २६, माया नगर, सूतगिरणी रोड ) याला गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. त्याच्या कडून लोखंडी तलवार किं. १५०० रुपये जप्त करण्यात आली आहे.



माहितीनुसार अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्यावर कार्यवाही करणे करिता गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करत असताना गुप्त माहिती मिळाली की एक रेकॉर्डवरील गुन्हेगार हातात लोखंडी तलवार घेऊन एमआयडीसी व माया नगर चौकात लोकांना धाक दाखवून दहशत पसरवीत आहे. यावरून पोलिसांनी तेथे कार्यवाही करून आरोपी बादल किशोर लुंड (वय २६, मायानगर) याला ताब्यात घेतले. विचारपूसमध्ये त्याने सदर तलवार बगिया टि पॉईंट जवळ झाडा झुडपामध्ये लपवून ठेवल्याची माहिती दिली. पोलिसांनी ☞(पान २ वर)

# शेगाव नाका परिसरातील दोन स्टॉलला आग

**अमरावती/प्रतिनिधीः-** शेगांव नाका मार्गावर ,न्यू कॉटन मार्केट जवळ २ चपलेच्या स्टॉलला आग लागल्याने २ लाखांचे नुकसान झाल्याची घटना शुक्रवार १३ फेब्रुवारीला सकाळी १०.३५ वाजता सुमारास उघडकीस आली आहे. अग्निशमन विभागाच्या सतर्कतेने मोठा अनर्थ टळला. माहितीनुसार न्यू कॉटन मार्केट जवळ मोहम्मद साद घाणेवाले व रितेश पटवर्धन यांचे चपलेचे स्टॉल आहे.या दोन्ही स्टॉलमध्ये शुक्रवारी सकाळी अचानक आग लागल्याने ☞(पान २ वर)



# तापडिया मॉलमध्ये दहशतवाद विरोधी पथकाचे मॉकड्रिल

## -महाशिवरात्री, शिवजयंती निमित्य सतर्कता

**अमरावती/प्रतिनिधीः-** येणाऱ्या महाशिवरात्री, शिवजयंती ,होळी , धुळीवंदन, रमजान ईद तसेच व्हीव्हीआयपी यांच्या सुरक्षा आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या उद्देशाने पोलीस विभागाच्या वतीने गोपाल नगर येथील तापडिया मॉलमध्ये दहशतवाद विरोधी पथकाची मॉक ड्रिल घेण्यात आली. या दरम्यान कोणतीही मनुष्यहानी होऊ न देता एका अतिरेकयाला ताब्यात घेतले व एकास जागीच ठार केले. त्यांनी ओलीस ठेवलेले १ व्हीआयपी व दोन नागरिकांची सुखरूप सुटका केली. दहशतवाद विरोधी



मोबाईल जलद प्रतिसाद पथकाचे उपनिरीक्षक ☞(पान २ वर)

# अकॅडमी ग्राउंड परिसरात एमडीसह युवकाला अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात अमली पदार्थाविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेत गुन्हे शाखेला आणखी एक यश मिळाले आहे. नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) बाळगणाऱ्या १९ वर्षीय युवकाला पोलिसांनी ताब्यात घेतले. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.




गोपनीय माहितीनुसार अकॅडमी ग्राउंड परिसरात संशयित हालचाली सुरू असल्याचे समजताच गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचला. छाप्यात समीर खान शमीम खान (रा. गवळीपुरा) याला अडवून तपासणी☞(पान २ वर)

# डॉ.राजेंद्र गोडे शैक्षणिक परिसरात सांस्कृतिक कार्यक्रम RHYTHM - २०२६

### -बॉलीवूड गायिका असीस कौर यांची 'कॉन्सर्ट नाईट' १६ फेब्रुवारीला

**अमरावती/प्रतिनिधीः-** शैक्षणिक, संशोधन आणि वैद्यकीय क्षेत्रात सदैव अग्रेसर असणारे डॉ. राजेंद्र गोडे शैक्षणिक परिसर, अमरावती द्वारे दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी संगीताचा आनंद लुटण्यास उत्सुक असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. डॉ. राजेंद्र गोडे शैक्षणिक परिसरा तर्फे १६ फेब्रुवारी २०२६ रोजी एक भव्य 'कॉन्सर्ट नाईट' (संगीत संध्या) आयोजित करण्यात आली आहे. विशेष आकर्षण म्हणजे या संगीतमय कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायिका असीस कौर आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या आवाजाने उपस्थित रसिकांना व विद्यार्थ्यांना एक अविस्मरणीय अनुभव देणार आहेत.



भव्य संगीत सोहळ्याचे आयोजन संस्थेची सांस्कृतिक समिती आणि डॉ. राजेंद्र गोडे शैक्षणिक परिसरातील सर्व महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने अत्यंत उत्साहात करण्यात आले आहे. परिसरातील विविध शाखांमधील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग या कार्यक्रमाला लाभणार असून, हा सोहळा संपूर्ण शैक्षणिक परिवारासाठी एकत्र येण्याचा आणि आनंद साजरा करण्याचा सुंदर प्रसंग ठरणार आहे.

विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक जाणीव विकसित करणे, कला आणि संगीत यांचे जीवनातील महत्त्व पटवून देणे, तसेच त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन☞(पान २ वर)

# बैलबंडीला दुचाकीची धडक; तरुण ठार, मित्र जखमी

## -डवरगाव फाट्याजवळ अपघात

**वरुड/प्रतिनिधीः-** वावरुळी ते मांगरुळी मार्गावरील डवरगाव फाट्याजवळ गुरुवारी १२ फेब्रुवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला, तर त्याचा मित्र जखमी झाला. बेनोडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

विशाल राजेंद्र लोखंडे (वय २४, रा. आलोडा) असे मृत तरुणाचे नाव असून शुभम राजेंद्र ठाकरे (वय २२, रा. नांदगाव) हा जखमी झाला आहे. विशाल हा फोटोग्राफीचा व्यवसाय करीत होता. दोघेही एमएच-२७ बीजी ०५७० क्रमांकाच्या दुचाकीने आलोडा येथून वावरुळी–मांगरुळी मार्गे प्रवास करत होते. डवरगाव फाट्याजवळ समोर जाणाऱ्या बैलबंडीवर त्यांच्या दुचाकीची जोरदार धडक बसली. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी ☞(पान २ वर)